कथासंग्रह

# आडवळणाची वाट



लेखक

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेश्वर)

कोमल प्रकाशन

# आडवळणाची वाट

कथासंग्रह

ॲड. यशवंत बाबुराव कदम
– नमनेश्वर

कोमल
प्रकाशन

# आडवळणाची वाट

**(कथासंग्रह)**

हे पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल टीम ई साहित्य प्रतिष्ठान

लेखक- **ॲड. श्री यशवंत बाबुराव कदम**

आणि प्रकाशक- **कोमल प्रकाशन**

यांचे मनःपुर्वक आभारी आहे.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण ॲड. श्री. यशवंत बाबुराव कदम यांना **ybkadam14@gmail.com** या ई मेल पत्त्यावर किंवा **9892046868** या phone क्रमांकावर कळवाव्या ही विनंती.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237
(Whatsappवर विनामूल्य ई पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

**आडवळणाची वाट /कथासंग्रह**
Aadvalnachi Vaat / Kathasangrah
पहिली आवृत्ती : १ मे २०२३

ISBN No. : ?

**लेखक :**
© अॅड. यशवंत बाबुराव कदम
बी-११०१, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई - ४०० ०६६.
भ्रमणध्वनी : ९८९२०४६८६८/९६१९३६०६६१

**प्रकाशक :**
१) कोमल प्रकाशन
३०२, कृष्ण श्रद्धा, पांचाळनगर,
नालासोपारा (प.), जि. ठाणे.
मोबाईल : ९१३७६ ६५९६८/९९८७७ ७६८९९
२) ई-साहित्य प्रतिष्ठान

**मुखपृष्ठ :**
नरेश ठाकूर
मोबाईल : ९८२०३८०२९९

**अक्षर जुळणी :**
चैतन्य आर्टस्, दादर, मुंबई - ४०० ०२८.
मोबाईल : ९२२३४७८४८९

**मुद्रक**
----

**मूल्य**
रु.१६०/-

**'आडवळणाची वाट'** या माझ्या कथासंग्रहातील कथांमध्ये वाचकांना काही प्रसंग, नावे, काही सत्य घटना आढळून आल्यास, माझ्या कथेतील वास्तव चित्रण, व्यक्तिदर्शन आणि घटना प्रसंग यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, असेल तर तो केवळ योगायोग समजावा... **अॅड. यशवंत बाबुराव कदम, नमनेश्वर**

# अल्प–परिचय

**ॲड.यशवंत बाबुराव कदम**

बी.ए., एल एल बी. ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई

**जन्मतारीख** : १४ ऑगस्ट १९४८

**मूळगांव** : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी

**प्राथमिक शिक्षण** : ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई

**महाविद्यालयीन शिक्षण** : रुईया महाविद्यालय, मुंबई
न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई

**नोकरी** : आयकर खाते (मुंबई) येथून वरीष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त
सध्या – मुंबई उच्च न्यायालयात वकिली

***

खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग
काव्यमंच, मुंबई
कोकण मराठी साहित्य परिषद
मराठा मंदिर साहित्य संघ, मुंबई
लोटिस्मा, चिपळूण आणि अनेक सामाजिक संस्था

***

**प्रकाशित साहित्य** :

१. सद्गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय १९७५
२. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह २००८
३. जीवनगाणे (काव्यसंग्रह) ५ जून २०१०
४. अंतरंगत (काव्यसंग्रह) २८ फेब्रुवारी २०१०
५. घे भरारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह २०११
६. जय दुर्गे (आरती संग्रह) २०११
७. भक्तिरंग (काव्यसंग्रह) २०१२
८. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) ११ जानेवारी २०१३
९. तांडव (चरित्र) ११ जानेवारी २०१३
१०.जय दुर्गे (आरती संग्रह) चौथी आवृती
११.श्री कुस्वामीनी आई भवानी वाघजाई देवस्थान, श्री क्षेत्र टेरव मंदिराचा समग्र इतिहास, ८ मे २०१३

१२.बोलके झाड (कथासंग्रह) मार्च २०१६
१३.महामानव... (प्रातिनिधिक कविता संग्रह) मार्च २०१६
१४.दसपटीच्या श्रीरामवरदायिनीचा ऌतिहास (संपादित एप्रिल २०१६)
१५.आकाशाचे पंख (कथा संग्रह) १८ फेब्रुवारी २०१७
१६.अंतरीचा दीप (अभंगगाथा) १२ एप्रिल २०१८
१७.गडगीचा डोह (कथासंग्रह) २० मे २०१८
१८.देव माणूस (व्यक्तिचित्र) मे २०१८
१९.लोहितचे मानसपुत्र : संत शंकरदेव यांचे चरित्र (मार्च २०१९)
२०.हरिपाठ चिंतन (मार्च २०१९)
२१.वळणावळणाची वाट (कादंबरी) १६ डिसेंबर २०२२
२२.मावळतीच्या सावल्या (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२३.गरुडझेप (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२४.ऊनपावसाचा खेळ (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२५.लंडनचा किनारा (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२६.आडवळणाची वाट (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२

**आगामी पुस्तके** :
- चांदण्याचा पाऊस (ललित लेख)
- मावळतीच्या साक्षीने (कविता संग्रह)
- शब्द स्फोट (हिंदी काव्यसंग्रह)
- क्षितीजा पलीकडच्या प्रवासात (मराठी काव्यसंग्रह)
- आध्यात्मिकतेचा अन्वयार्थ – एक अभ्यास (ज्ञानदेव आणि तुकाराम)

**पुरस्कार** : 'जीवन गौरव पुरस्कार' – वंदना प्रकाशन उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल.
लोटिसमाचा कविवर्य द्वारकादास शेंडे कथा पुरस्कार २०१८ बोलके झाड या कथा संग्रहाला. गो. नि. दांडेकर यांच्या नावाचा कथेला तृतीय पुरस्कार २०१८ कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'गडगीचा डोह' या कथा संग्रहाला विशेष पुरस्कार, २०१८.

# अर्पण पत्रिका

''**आडवळणाची वाट**'' हा माझा कथासंग्रह
मी माझे जीवश्य: कंठस्य
श्री. शशिकांत बाबाजीराव सुर्वे
आणि सौ. निलीमा शशिकांत सुर्वे
यांना अर्पण करीत आहे...

**– ॲड. यशवंत बाबुराव कदम**
**नमनेश्वर**

# मनोगत

आपले जीवनच मुळी आडवळणाच्या वाटेसारखे चढ–उतार, वाकडे तिकडे धक्के देत पुढे सरकत रहाते. त्याचा शेवट कधी सुखात वा दु:खात होतो. पण ते सारे आपण स्वीकारतो, मनात नाराजी न ठेवता कारण ज्याने जन्म दिला तोच परमात्मा आपला जन्मदाता, पालन–पोषण कर्ता आपल्याला एक एका श्वासाने पुढे शेवटच्या श्वासपर्यंत मार्गस्थ करतो.

मधला काळ हा खरा जीवन जगण्याचा. त्यामध्ये अनेक घटनांची रेलचेल असते. प्रेम, आनंद, सुख, दु:ख यांची. त्यांची 'आडवळणाची वाट' आपण चोखाळत पुढे पुढे जातो. हेच ते पराधीनत्व. कधी नाराजीने तर कधी आनंदाने पण प्रत्येक प्रसंगांना टक्कर देत आपल्या ध्येयापर्यंत जीवनातल्या आडवळणाच्या जगण्याच्या वाटेवर.

आज माझा आडवळणाची वाट हा ८ वा कथा संग्रह प्रकाशित होत आहे. या पुर्वीच्या बोलके झाड, आकाशाचे पंख, गडगीचे डोह, त्यानंतर मावळतीच्या सावल्या, गरुडझेप, ऊनपावसाचा खेळ, लंडनचा किनारा, आडवळणाची वाट आणि वळणावळणाची वाट ही कादंबरी प्रकाशीत होत आहे.

माणूस हा परस्वाधीन म्हणजे परमात्म्याच्या इच्छेने चालतो वाटचाल करतो. पण त्याला मीपणाचा गर्व असतो. माझे तसे नाही. मी ही सारी कृपा माझ्या पांडूरंगाची आहे असे ठामपणे सांगतो. कारण मी एक सामान्य, त्या पांडूरंगाच्या इशाऱ्यावर, तोच चालवणारा, तोच बोलविता, तोच चालविता आणि तोच लिहिणारा धनी... माझा पांडुरंग आहे. हे सारे अक्षरब्रह्म तोच साकार करणारा आहे. कारण मागच्या दोन जीवघेण्या आजारातून सावरलो आणि हे लिखाण झाले ही त्याची कृपा.

या कथा संग्रहात पाच कथांचा समावेश आहे. त्यातील कथा बीजे ही काही वेळा लेखकांच्या जीवनात घडलेली, स्वप्नवत योजलेली पण नियतीमुळे फसलेली. पण कालांतराने पुन्हा जोडलेली अशी आहेत. अशी आडवळणाची वाट कथा. यानंतरची कथा ही माझ्या आईची, त्यात तिचे मातृप्रेम, नंतरची भूक आणि पांडूरंग पावला आणि नंतरची उतराई. ही तशीच भावस्पर्शी, प्रेमातून व तिच्या पुर्न भेटीतून व्यक्त झालेली आहे. या कथा वाचकाना नक्कीच भावतील अशी आशा करतो.

या संग्रहातील सगळ्या कथा गेल्या चार-पाच वर्षात म्हणजे माझ्या गडगीच्या डोहाच्या प्रकाशनानंतरच्या आणि कोरोनाच्या काळात लिहिलेल्या आहेत. पण प्रकाशनासाठी डिटीपीच्या कैचीत अडकलेल्या. कारण या काळात मी माझ्या गावी चिपळूणला होतो. तेथे काहीही सुविधा उपलब्ध नव्हत्या. परंतु मुंबईला आल्यावर माझ्या भगिनी नंदा साळवी यांच्या खूप सहाय्य झाले. त्याचप्रमाणे कमलाकर राऊत आणि शिवाजी गावडे यांचीही मला खूप मदत झाली.

या कथा संग्रहाला प्रस्तावना माझे साहित्यिक व समीक्षक मित्र शिवाजी गावडे यांची लाभली आहे, त्यांचा मी आभारी आहे. त्याचप्रमाणे माझे मित्र कवी, समीक्षक श्री.कमलाकर राऊत यांचेही प्रोत्साहन आणि सहकार्य लाभले. त्यांचाही मी आभारी आहे.

माझे प्रकाशक कोमल प्रकाशनचे शेट्टे यांचाही मी आभारी आहे.

हा कथा संग्रह ई-साहित्य प्रतिष्ठान या साईटवर प्रकाशित होत आहे.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ ज्यांनी तयार केले ते माझे मित्र नरेश ठाकूर याचा मी आभारी आहे.

शेवटी माझ्या रसिक वाचकांना हा कथा संग्रह आवडेल अशी आशा करतो आणि थांबतो.

**ॲड.यशवंत बाबुराव कदम**
**नमनेश्वर**

# प्रस्तावना

कोकण मराठी साहित्य परिषदेत हिरीरीने तसेच मराठा मंदिर साहित्य शाखेत सतत सक्रिय असलेले साहित्यिक ॲड. यशवंत कदम (नमनेश्वर) यांनी कवितांबरोबरच कथेंमध्येही उंच भरारी घेतली आहे. त्यातील **'आडवळणाची वाट'** हा त्यांचा नवीन कथासंग्रह प्रकाशित होत आहे.या कथासंग्रहात एक दीर्घ कथा आणि चार लघुकथा असा साहित्य ऐवज सामावलेला आहे.

यातील पहिलीच 'आडवळणाची वाट' (पुनर्भेट) ही मुखपृष्ठ शीर्षक कथा असून, ती वर्गात असलेली पूर्वाश्रमीची अंजली सावंत आणि संजय सत्रे यांच्या प्रेमाची कथा आहे. वाचताना मध्यंतरापर्यंत ती अतृप्तप्रेमाची कथा वाटते परंतु मध्यंतरानंतर ती योगायोगाने तृप्त प्रेमाची कथा होते. असे वळण घेण्यात कथाकार यशस्वी झाला आहे.यात अंजली म्हणजेच डॉक्टर अंजली देशपांडे हिची गाडी बंद पडल्यावर ती गॅरेजजवळ संजय सत्रेला भेटते आणि त्यानंतर त्यांची पुन्हा ओळख होते. शाळेत असताना तिच्या प्रेमात भरकटून गेल्यामुळे संजय अभ्यासात गटांगळ्या खातो.त्याला साधे ग्यारेजवाला होता येते. पण अंजू मात्र डॉक्टर बनते. तिच्या प्रेमामुळेच संजय याला काय काय भोगावे लागते त्याचे कथानक या दीर्घ कथेत येते. ती पुन्हा भेटल्यामुळे तो आठवणींच्या डोहात बुडून जातो आणि पुन्हा ती मिळावी यासाठी जेजे प्रयत्न करतो तसेच तीही करते. त्यांच्या दोघांचे प्रेम मिळविण्यासाठी चाललेले प्रयत्न, प्रेमाची नशा, अस्वस्थता अशी प्रेमातील आडवळणे कथाकाराने यात सूक्ष्मतेने टिपली आहेत.एकंदरीत डॉ.अंजू, संजय, संजयची पत्नी सुमा, अंजूच्या वर्गात शिकत असलेला त्याचा मुलगा प्रवीण या पात्रांच्या भोवतालीच ही कथा फिरतेआहे.कालांतराने याचा संशय संजयची पत्नी सुमा हिला येतो आणि त्यांच्या प्रेमात पुन्हा कसा अडथळा येतो याची ही रोमहर्षक कथा असली तरी शेवटी योगायोगाने म्हणजेच सुमाचा कॅन्सरने मृत्यू झाल्यावर ती तृप्त प्रेमाची कथा होते .ती आपल्यालाही गुंतवून टाकते. कथाकार गोष्ट सांगता सांगता यातून प्रेमात भरकटल्यावर तरुणांना काय काय भोगावे लागते याचा निर्देश वाचकांना देतोय. तसेच प्रेमात पडल्या नंतरच्या त्यागामुळे संजयचा मुलगा प्रवीण याचे कसे भले होऊन तो कसा यशस्वी होतो हे सांगितले आहे हे या कथेचे वैशिष्ट्य आहे.

या कथेतील काही वाक्ये आपले लक्ष वेधून घेतात त्याने पुस्तक जवळ केले पण ती अक्षरेही त्याच्याकडे रोखून पहात आहेत असा भास त्याला होत होता, दोघेही आज आनंद, दुःख या मिश्रणात भिजून गेले होते; दोन दिशांना दोन पक्षी मनात हृदयात गहिवर घेऊन मार्गस्थ झाले. आकाशातले दोन तारे जवळ यावेत आणि

प्रकाशाचा स्तर वाढावा; त्याच्या सहवासाचे आणि ती आडवळणाची वाट स्पष्ट दिसावी असे तिला वाटत होते. आपल्या मनात फुललेला प्रेमाचा सुगंध सहवासासाठी अधीर झालेला असतो. कधी तो लवकर भेटीतून व्यक्त होतो तर कधी वळणे घेत घेत दूर दूर जातो आणि मग दोन ध्रुवांवर मनातल्या मनात कुढत राहतो. कधी संयोग होतो व कधी तुटतात. दोन्ही तारे पुढच्या जन्मी एकमेकांना भेटतील या आशेवर माणूस जगत असतो. नारळाच्या कवडी जशा दुभंगतात तसा प्रपंच दुभंगतो आणि घराची पूर्ण वाताहत होते त्याची जाणीव स्त्रिला प्रथम होते; पुरुष म्हटले तर तो उनाडच त्याची उधळण्याची हाव कधीच शमत नाही. यातून कथाकाराची प्रतिभाशक्ती आणि योग्य शब्दात कथानक रांगवण्याची हातोटी दिसून येते.

'आईची माया' या लघूकथेत त्यांनी आईचे ऑपरेशन आणि त्या काळात रंजना या नर्सने दिलेली साथ हीचे कथानक रेखाटले आहे. यात आईला रंजनाचा कसा लळा लागला होता याची जाणीव आपल्याला स्पर्शून जाते. 'भूक' या कथेत भुकेच्या ओढीने शंतनुचे बांधनातून कसबीने मासे पकडणे कसे असायचे याचीही दारुण कथा शब्दबध्द केली आहे. माणसाच्या भुकेची तीव्रता आणि किंमत काय असते हे यात सांगून जाते. 'पांडुरंग पावला' यात गंगाराम याची पांडुरंगाकडे परीक्षेत पास करण्याची गयावया रेखाटली आहे.या पांडुरंगामुळे तो मॅट्रिक पास झाला असे त्याला वाटते परंतु कोरोनामुळे निकाल ९५ टक्के लागल्याने तो यशस्वी झाला होता. पुढे त्यामुळेच तिथल्या सावकाराने त्याच्या शिक्षणाची जबाबदारी उचलली; पण त्याने गंगारामच्या घरातली पांडुरंगाची मूर्ती स्वतःकडे आणली. त्या मूर्तीचे मंदिर बांधण्याचे गाववाल्यांचे मनसुभे फसले. पण त्यांनी सावकाराचे निधन होताच आणि गंगाराम मुंबईला नोकरीसाठी आहे हे पाहून सावकाराच्या घराचे टाळे तोडून त्याचेच मंदिर बांधले. नंतर त्या मंदिराची वाताहत लागली. हे कळल्यावर गंगारामने मुंबईतून पुन्हा येऊन साफसफाई करून मंदिर बांधले. त्यामुळे त्यांच्या गावाची भरभराट झाली. याची ही पांडुरंगाच्या श्रद्धेमुळे झालेली किमया यात शब्दबध्द केली आहे. यातून देवावर श्रद्धा असल्यास माणूस कसा यशस्वी होतो याचे निदर्शन कथाकार करतो आहे. यातील शेवटची कथा आहे 'उतराई' या कथेत. ७० वर्षाचे सॉलिसिटर श्रीराम अमेरिकेतून मुंबईत येतात आणि त्यांना उल्का या प्रेयसीची आठवण होते आणि ते तिचा शोध घ्यायला लागतात याची ही रोमहर्षक कहाणी रेखटली आहे. उल्काच्या आयुष्यातील दुःख आणि पडझड पाहून त्याला गहिवरून येते. तो पूर्वीपासून आपले प्रेम तिच्यावर असल्याचे तिच्या वडिलांना सांगतो. योगायोगाने उल्काचे घर खाली करायचे असते तेव्हा तो त्यांच्या कुटुंबाला आसरा देतो. तिथून पुन्हा त्यांचे प्रेम पुन्हा फुलून येते.तिचे आजारी असलेले वडीलही ठीक केले जातात. एकंदरीत पूर्वीच्या

प्रेमामुळेच श्रीरामकडून उल्काच्या कुटुंबाचे जीवन सुकर होते. आणि कहाणी सुफलसंपूर्ण होते.

कुणाचेच आयुष्य सरळ नसते. प्रत्येकाच्या जीवनाची वाट वळणावळणाची, घडल्या – बिघडल्याची असते.ज्याला त्याला सुख – दुःखाला सामोरे जावे लागते आणि हेच तर कथांचे बीज असते. कथाकार ॲड.यशवंत कदम यांनी त्यांच्या आजूबाजूला जे घडले – बिघडले, दिसले– जाणवले ते 'आडवळणाच्या वाटा' या कथांमधून सूक्ष्मतेने टिपले आहे.त्याचप्रमाणे आजूबाजूला घडलेल्या घटना, संपर्कात आलेल्या व्यक्ती. माणसाची भूक त्याला कसे कोठे घेऊन जाते, एखाद्याचे कर्तव्य आणि त्यांनी गाठलेले यश, आईची माया आणि नर्सने केलेले सहकार्य. पांडुरंगाच्या मूर्तीच्या भक्तीचा परिणाम. असे त्यांच्या कथांचे विषय आपल्याला बरेच काही दृष्टांत देऊन जातात.

ॲड.यशवंत कदम यांची भाषाशैली सरळ, सोपी असल्याने त्यांच्या कथा वाचताना कोणतेही कष्ट पडत नाहीत. तसेच त्यातील कथानक सहज लक्षात राहते. किंबहुना त्यातील पात्रेही आपल्या आजूबाजूचीच आहेत असे आपल्याला जाणवत राहते.पात्रांचे संवादही आपल्या परिचयाचे वाटतात येवढ्या बेमालूम त्या कथा झाल्या आहेत. या कथा मानसशास्त्र आणि लैंगिकशास्त्र समीक्षेच्या दृष्टीने पाहिल्यास त्यातून त्यातील पात्रांचे मनोविश्लेषण करताना पुरुष आणि स्त्री यांची मानसिक, लैंगिक आणि भावनात्मक गुंतागुंत कशी होते याची जाणीव आपल्याला होते. तसेच पात्रांची मैत्री, कर्तव्य, प्रेम आणि वासना यातील ताणतणाव दिसून येतात. कथांतील पात्रांच्या मनावर झालेले विविधांगी परिणाम. अतृप्त प्रेम, सफल प्रेम, जीवनातील संघर्ष, समस्या, कोकणातील गावातील आणि शहरात आल्यावर शहरातील त्यांच्यावर झालेले नैसर्गिक आणि वातावरणीय परिणाम, गरिबी आणि हलाखीच्या परिस्थितीतून त्यांनी काढलेला मार्ग याची जाणीव आपल्याला सदोदित होत राहते. साध्या सोप्या शैलीत संवेदनशीलतेने आणि सूक्ष्मतेने टिपलेल्या या कथा आपले सहज लक्ष वेधून घेतात. एवढेच नव्हे तर या कथा आपल्याला दृष्टांत देऊन जातात. म्हणून त्या वाचायला हव्या. अशाच सक्षम कथा लिहिण्यासाठी कथाकार ॲड.यशवंत कदम यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**– शिवाजी गावडे,**
**लेखक, समीक्षक**

# अनुक्रमाणिका

आडवळणाची वाट

माया आईची

भूक

पांडूरंग पावला

उतराई

# आडवळणाची वाट

कच् कच् ब्रेक लावीत डॉ.अंजूची गाडी नॅशनल गॅरेजच्या आवारात येऊन थांबली. तिने त्या गॅरेजचा सगळा परिसर न्याहाळला. एका चाळी वजा जागे पुढच्या विस्तीर्ण पटांगणात बऱ्याचशा गाड्या व्यवस्थितपणे लावलेल्या होत्या. एक दोनच गाड्या गॅरजच्या शेडमधे उभ्या होत्या नी ४/५ मुले त्या गाड्यांवर काम करीत होती. कोणी टायर बदलीत होते, तर कोणी पॉलीश पेपरने गाडीचा कलर घासून काढीत होती. ४/५ वेळा तिने हॉर्न वाजविला. पण कोणीही जवळ फिरकले नाही. त्यात अर्धा तास निघून गेला. सकाळचे ९ वाजले होते, नी डॉ.अंजूला आपल्या के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये जायचे होते. घरून गाडी काढतानाच ब्रेक ठीक लागत नाही हे तिच्या ध्यानी आले. तिची ती नवी गाडी त्रास देण्याची पहिलीच वेळ होती.

शेवटी ती गाडीतून बाहेर येणार येवढ्यात एक गोरापान, झोकदार बांध्याचा चाळीशीतला तरूण तिच्याकडे येताना तिने पाहिला. जवळ येताच तिने त्याला ओळखले. तो तिच्याच शाळेत शिकत होता. एस.एस.सी.ला असताना ज्ञानेश्वर शाळेत. ती खाली उतरणार तेवढ्यात...

''थांबा ! काय प्रॉब्लेम आहे गाडीला ?''

''ब्रेक लागत नाही !'' अंजू.

''गाडीतून खाली उतरा, मी पाहतो !'' संजय.

ती खाली उतरत असताना त्यांच्या आठवणीची मोहळ पिंगा घालीत होती त्याच्या मनाभोवती. तिच ती नाजूक कांतीची, गोड सुंदर, 'अंजू' हेच तिचे नांव नां? जिच्या प्रेमात आपण नख शिखांत डुबलो आहे. मनातला गोंधळ दोन मिनिटात थांबवला त्याने तिला गाडीतून उतरायला सांगितले...

''उतरा खाली !... मी पाहतो !'' संजू.

अंजू आपली पर्स सांभाळीत खाली उतरली. आणि संजूने गाडी स्टार्ट केली. आणि दोन पावले पुढे सरकून कचकन थांबली...

गॅरेज मधल्या मुलांना बोलावून त्याने ती गाडी शेड मधे लावली, हत्यारांचा Box घेऊन तो गाडीखाली झोपला आणि दोनच मिनिटात त्याने ब्रेकमध्ये अडकलेला कचरा काढला. आणि पुनः गाडी स्टार्ट करून त्याने ती शेड बाहेर काढली.

"तुम्ही बसा गाडीत मी गाडीची ट्रायल घेतो आणि मग तुम्ही गाडी घेऊन जा!" संजय परळ भोई वाड्यातल्या पाटील वाडीत ते गॅरेज होते. एका कोकणातल्या माणसाचे तान्या त्याचे नांव. त्याने संजूला विकले होते पाच वर्षापूर्वी. गेली १७/१८ वर्षे संजू हे गॅरेज चालवित होता.

संजूने गाडी टाटा हॉस्पिटलच्या बाजूने केईएमकडून फिरवून पुनः आपल्या गॅरेज मधे आणली.

"आता काही प्रॉब्लेम नाही. फारच मायनर होता. ब्रेकच्या आत एक दगड अडकला होता.! बस!" संजू.

"तुमची मजुरी ?" अंजू.

"काही नाही !" संजू

मी डॉ. अंजली देशपांडे, पूर्वीची अंजली सावंत !" अंजू

"ओळखले तुम्हाला मी! तुम्ही ज्ञानेश्वरला होता नां ?" संजू

"हो !" अंजू

मी ही १९६६ च्या बॅचचा विद्यार्थी ! तुम्हीही त्याच वर्षात त्या शाळेत होतात नां ? संजू.

"हो! मला सारे आठवते आहे ! " अंजू.

म्हणत ती गाडीत बसली एक छानसा कटाक्ष संजूकडे टाकीत ती निघून गेली खरी, पण संजूच्या मनात २० वर्षापूर्वीचा सारा भूतकाळ उभा करून गेली... आठवणींच्या डोहात संजूला एकटा सोडून.

संजूच्या नेहमीच्या जीवनाची वाट आज वेगळे वळण घेऊन पुढे चालू लागली. ती रात्र त्याच्या नजरे समोर सारा भूतकाळ उभा करून गेली.

खरे तर ज्ञानेश्वर विद्यालयात सकाळी मुले आणि दुपारी मुली अशी शाळा होती. आठवीला संजूच्या वडिलानी त्याचे नांव या शाळेत घातले होते. सारे काही १० वी पर्यंत सुरळीत चालले होते. पण वडिलांची मिल बंद झाली आणि सगळी स्वप्ने पाण्यात बसली, ती कायमची. चाळीतल्या एका खोलीत ७/८ भावंडे, खाण्याची मोतात, बस सगळ्या स्वप्नांना कात्री लागली. ११ वी चा निकाल लागण्या आधीच गॅरेजमध्ये वर्णी. तीही डॉमनीक या त्याच्या मित्रामुळे. शिक्षणाला फुलस्टॉप नि गॅरेजचे कॉलेज हेच शिक्षणाचे क्षेत्र. पगार २।। रु रोज. आठवड्याने मिळायचा. काम मरेपर्यंत सकाळी ७।। ते रात्री ८ वाजेपर्यंत. दुपारचे जेवण २ चपात्या नी बेसनाची पोळी कायम. कारण येवढ्या पगारात

७/८ तोंडाची पोट भरण ही कसरत करावी लागायची. मग अर्धे कुटुंब गावाला रवाना. नि उरले ३ जण. कसे तरी भागवत २० रू . गावाला पाठवायला लागत. उरलेल्यात आमची गुजराण. रात्रीच्या कॉलेजात जावे शिकावे असा विचार मनाला शिवून गेला. पण रात्री ८ नंतर कसा जाणार ? मग गॅरेजलाच कॉलेज केले नि सगळ्या प्रकारचे काम गाडी पेंट करणे, रिपेरींग करणे सारे आत्मसात केले ते जुन्या कामगारांनी खूप शिकवले आणि तो तरबेज झाला.

तान्या शेठही वयस्कर होता. त्याचा मुलगा उनाड बिनकामाचा पण त्याला हे गॅरेज न देता संजयकडे सोपवून तान्या शेठ चिपळूनला गावी गेला.

संजयच्या गॅरेजमधे मोठ मोठी गिऱ्हाईके अगदी कायम. शिवाय टॅक्सीवाले, इन्सुरन्स ची कामे. चिकार दम निघेपर्यंत. गॅरेजमधल्या १२/१३ कामगारांकडून, कसबाने तो आपल्या गिऱ्हाईकाना खूश ठेवी. उगाच पैशाच्या आशेने नाडत नसे. म्हणून तर काम दिवसें दिवस वाढत होते. नि पैसाही येत होता.

संजयच्या मनातून अंजूला पुसणे त्याला अवघड जात असे. कारण तिचा ठावठिकाणा त्याला कळत नव्हता. ती कॉलेजमध्ये गेल्याचे इतर मुलांकडून कळले येवढेच, आपल्या नशिबी शिक्षण नाही हे ठरवून संजूने गॅरेज मधेच आपले करीयर करायचे ठरवले नि त्याने लग्नही केले. मुले झाली, आपण स्वतः नाही पण आपल्या मुलाला डॉक्टर करायचे असा एक विचार त्याने मनात रुजवला आणि त्या ध्यासापोटी तो आपल्या कामात गर्क होता. दिवस जात होते. रहायला फ्लॅट घेतला. जुनी गाडी घेतली आणि ती गाडी विकून त्याने नवी होंडा घेतली. मुलगा १०वी पास झाल्यावर त्याने त्याला रुईया कॉलेजमध्ये सायन्सला टाकला. पोरगा हुशार. १२ वी पास झाला नी केईएममध्ये मेडीकलला गेला. सारी स्वप्ने पुरी होत होती. खूप समाधानी होता तो. जुन्या गॅरेजची डागडुजी करून त्याने होन्डा कंपनीची सर्व एजन्सी मिळवली. गाडी रुळावर आली होती. पण... अंजूचे मनात रुजलेले प्रेम त्याला मधे मधे अस्वस्थ करीत होते. पण तो त्या आठवणीने आवंडा गिळून गप्प बसे. आपल्या मनातले हे स्वप्न त्याने पुसून टाकायचे ठरविले पण छे ते त्याला छळतच होते.

आणि आज अंजूला पाहिल्यावर त्याच्या हृदयाची धडकन अधिकच वाढू लागली. ती पुनः भेटावी असे त्याला सारखे वाटे. त्याने ना तिचा पत्ता ना फोन घेतला. कोण जाणे तिला भेटणे हा एक अपघातच ठरेल असे त्याला वाटले. आपण उगाच तिचा पाठलाग करू नये. असे त्याचे मन पुनः पुनः सांगत होते.

पण त्याचे अंतरमन त्याला सांगे ती नक्की भेटेल नक्की. नक्की येईल.

दोनच दिवसानी संजू केईएममध्ये आपल्या मुलाला सोडायला सकाळी ७ वाजता गेला. आपली नवी कोरी होंडा लक्झरी गाडी घेऊन आणि तो परत फिरणार तोच अंजूची गाडी कंपाऊंडमधे पार्ककरून अंजू गाडीतून बाहेर आली.

''अरे तू इकडे कुठे !'' संजू

''मी येथे डॉक्टर प्रोफेसर आहे. 'जनरल सर्जरीची !'' अंजू.

''वा छान ! मी माझ्या मुलाला सोडायला आलो होतो. तो मेडीकलच्या पहिल्या वर्षाला आहे. !'' संजू

''गुड ! बाय द वे... मी तुम्हाला तुमचे नांव विचारायला विसरले घाईत. तरी त्या दिवशी माझे एक लेक्चर बुडाले. गाडीने धोका दिला. आपण खूप चांगले काम केलेत !'' अंजू.

''संजय सप्रे !''

''हे नांव मी ऐकले आहे ! अंजू. आणि तिने क्षणभर डोळे बंद केले.

''नक्की ऐकले असणार !'' संजू,

''ओके ! मला लेक्चर आहे. मी घाईत आहे. आपण नंतर बोलू !''

आणि तिने आपले विजीटींग कार्ड संजूला दिले. डॉ. अंजू देशपांडे, एम.डी., एम.एस.

भरधाव वेगाने संजूची गाडी टाटा हॉस्पिटलकडून त्याच्या गॅरजमध्ये आली. आज अंजू भेटली याच गोष्टीचे त्याला खूपच अप्रूप वाटत होते. हा एक योगायोग होता नक्कीच. एक सुखद धक्का.

आज पुन: त्याचे मन चलबीचल झाले. कामात मन स्थिर व्हायला तयार नव्हते. अरे आपले लग्न झाले आहे. एक मुलगाही आज मेडीकलला आहे. आपण वयाची चाळीशी पार करीत आहोत असे मागच्या आयुष्यात रेंगाळणे ठीक नाही हे त्याला कळत होते. पण 'प्रेम' आणि ते पहिले वहिले 'प्रेम' त्याला काही स्थिर व्हायला देत नव्हते. संध्याकाळी तो घरी आला. ती रात्र ही अस्वस्थ अवस्थेत त्याने काढली. त्याची चाळवलेली नजर, अबोलपण त्याच्या बायकोच्या नजरतून सुटली नाही.

''अहो! तुमची तब्बेत ठीक नाही कां?'' सुमा.

धड जेवलातही नाही ! काय अडचण आहे कां ? मी काही मदत करू शकते कां?'' सुमा.

''नाही ! ठीक आहे मी.'' संजू.

त्याची ही अस्वस्थता अधिकच वाढली जेव्हा सकाळी मुलाला केईएमला सोडताना त्याचा मुलगा म्हणाला.–

''आमची देशपांडे मॅडम तुमची चौकशी करीत होत्या. लेक्चर संपल्यावर!'' प्रविण.

''मग !'' संजय .

''त्या खूप खुशीत होत्या आज!'' प्रविण.

ती आजही आपल्याला भेटेल असे संजयला वाटले, पण तिची गाडी पार्क केलेली पाहून ती आपल्या पूर्वीच आली याची खात्री त्याला झाली. आणि हिरमुसल्या मनाने तो गॅरेजमधे आला. पण अधेमधे तो प्रविणला अंजू बद्दल विचारीत असे. आपल्या वडिलांना डॉ. अंजू ओळखतात याचेच अधिक अप्रूप त्याला वाटत होते. आणि तीही प्रविणच्या अभ्यासाची चौकशी वरचे वर करीत असे.

प्रविण आता १८ वर्षाचा झाला होता. संजयने त्याला एक स्कूटर घेऊन दिली व तो आता स्कूटरनेच जात असे. संजयलाही मुद्दाम डॉ. अंजूला भेटणे टाळावेसे वाटत होते. पण तरीही त्याची तिच्याकडची ओढ काही कमी होत नव्हती. तिची प्रतिमा नजरे समोरुन हटत नव्हती. त्यात दोन महिने कधी गेले हे त्याला समजलेच नाही. आणि तिची गाडी संजयच्या गॅरेजमध्ये येऊन उभी राहिली. खरे तर तो दिवस पाडव्याचा. नववर्षाचा म्हणून संजय एकटाच गॅरेजमधे आला होता. पूजा करण्यासाठी आणि पूजा करून परत घरी जाणार होता.

गॅरेजमधे सामसूम होते. पण बाहेरचा गेट उघडा होता. आणि संजयची गाडी येथे आहे म्हणून अंजू सरळ त्याच्या कॅबीन मधे आली.

''अरे! आज स्वारी इकडे कोठे? काय प्रॉब्लेम आहे कां गाडीला ?'' संजय.

''नाही ! आज तुम्हाला भेटावेसे वाटले. शिवाय गुढीपाडवा आपणास शुभेच्छा द्यायला आले.''

''छान! बसा डॉक्टर ! '' संजय

''मला तुम्ही अंजूच म्हणा !'' अंजू

''ओके! ओके!'' संजू आणि त्याने तिच्या हातावर पेढा ठेवला. शिवाय

घरी न्यायला मिठाईही दिली.

आज तसे गॅरेज बंदच होते. निवांत वेळ होता आणि घरी जायची घाई संजयलाही नव्हती.

''आपण उभ्या कां? बसा की !'' संजू.

आणि तिही खुर्चीत बसली. तिने त्याची कॅबीन न्याहाळली. सगळे कसे अगदी टिप टॉप. त्या गॅरेजला मिळालेली तीन सन्मानचिन्हे ही योग्य जागी लावली होती. त्याच्या त्या एसी कॅबीनमधे बराच वेळ एकमेकांकडे पहात होती. ती दोघेही आपल्या स्वप्नात हरवली होती.

''गप्प कां?'' संजू.

''नाही! काही नाही!'' डॉ. अंजू

''तुम्हाला माझे नांव ओळखीचे आहे असे वाटते कां?'' संजू.

''हो! तो प्रसंग मला नाही विसरता येणार. फार मोठे आकांड तांडव झाले त्यावेळी आपल्या पोस्टकार्डाने !'' अंजू.

संजयनेही दिर्घ श्वास घेतला नी तो गप्पच राहिला. त्याच्याही ध्यानी त्यानंतर घडलेला तमाशा डोळ्या समोर आला. तो बराच वेळ डोळे झाकून घेऊन हाताने डोके पकडून बसला होता. त्या कॅबीनमध्ये पूरा सन्नाटा होता. पंधरा वीस मिनीटे.... आणि तिचीही अवस्था वेगळी नव्हती.

त्याचे असे झाले... शाळेचा सेंड ऑफ शनिवारी झाला आणि संजय अधीकच अस्वस्थ झाला. अठरा वर्षाचे ते पोर प्रेमात भिजलेले गेले १।। वर्ष. जेव्हा त्याने दुपारी घरी येताना तिला पाहिले असते नी रोजच ही भेट व्हायची. बस ! ना बोलणे ना खूणा ना काही. पण संजयच्या ती मनात भरली होती. आरपार. तो घरी आला. बोर्डाची परीक्षा चार दिवसावर पण अभ्यासात लक्ष लागेना. ती रात्र त्याने जागून काढली. ती आता आपल्याला दिसणार नाही. संपले प्रेम, ही ताटातूट संजयच्या जिव्हारी लागली होती.

दुसऱ्या दिवशी तो सकाळी १० वाजता पोस्टात गेला. एक पोस्ट कार्ड आणले. अंजू रहात होती ती कॉलनी त्याच्या परिचयाची होती कारण तिच्या इमारतीसमोर त्याचा अनील देसाई हा मित्र रहात होता. त्याच्याकडून संजयला अंजूचा पत्ता मिळाला होता. हे पत्र पोस्टात टाकताना अनेक शंका कुशंका संजयच्या मनात आल्या. हे पत्र पोहचताच काय होईल? तिला आपल्या प्रेमा बद्दल कळेल कां? की घरच्या लोकांच्या हातून तिची शिकार होईल इ.

आणि तसेच झाले. घरच्यानी तिला चांगले झापले. हा कोण पत्र लिहिणारा? तुझी नि त्याची काय भानगड तर नाहीना ? बिचारीला याची काहीच कल्पना नव्हती. मूड पार विस्कटला नि त्या रागाच्या भरात तिचे वडील, भाऊ सगळी मंडळी संजयच्या घरी आली. सोबत देसाई होताच. त्यावेळी संजय शिवडीच्या विठ्ठल मंदिरात अभ्यासाला निघाला होता. खरेतर तो मनात पार ढासळून गेला होता. पण न डगमगता त्याना सामोरा गेला.

''तुझे आई वडील कुठे आहेत ?''अंजूचे वडील.

''कामावर गेले आहेत !'' संजू

''कधी येणार ?'' अंजूचे वडील

''माहित नाही.'' संजू

''त्याना सांग उद्या सकाळी नऊ वाजता मी येणार आहे त्याना भेटायला !'' अंजूचे वडील.

''हो!'' संजू

आणि ते तिघे आल्या पावली निघून गेले. त्याना बसा म्हणण्याचे धारीष्ट ही संजूला झाले नाही. तो घराला टाळे लावून तसाच अभ्यासाला निघून गेला. चारच दिवसांवर परिक्षेचा पहिला पेपर होता. खरे तर संजय हुशार मुलगा होता. आपण खूप शिकावे आणि आई वडिलाना या गरिबीतून बाहेर काढावे असे त्याला वाटत होते. पण या प्रेम प्रकरणाने त्याचा बळी कधी घेतला. हे त्यालाही कळले नाही. पहिल्या वर्गात पास होईन अशी खात्री होती. पण आता अभ्यासात लक्ष लागेना. नजर पुस्तकात स्थिर होईना. वाचलेले जराही डोक्यात शिरायला तयार नव्हते, तो वैतागला आणि पुनः घरी आला. पुरा दिवस बरबाद झाला या प्रकरणात. हे सगळे घडले कसे? हेही त्याला समजेना. प्रेमाची नशा इतकी असू शकते ? आता परवा पहिला पेपर. ती पण त्याच सेंटरला. पोतदार कॉलेजला. शिवाय उद्या ही मंडळी येणार काय घडेल काही कळत नव्हते. नव्हे ते वयही नव्हते, पण काहीतरी राडा होणार. ते त्याच्या आई वडिलांना दम देणार आणि मग... ?

दुसऱ्या दिवशी ती मंडळी ९ वाजता आली. तत् पूर्वी संजू अभ्यासाला विठ्ठल मंदिरात गेला. त्याच्या वडिलांना याची काहीच कल्पना नव्हती. त्यांनी शांतपणे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले ....

''तुमचा मुलगा माझे हृदय तोडायला निघाला आहे. त्याला समजवा !

अन्यथा !'' अंजूचे वडील.

''हो ! त्याला आम्ही समजावतो! तो तुमच्या मुलीच्या वाटेला जाणार नाही! आम्ही गरीब ! हे थेर आम्हाला परवडणारे नाहीत! तुम्ही निश्चींत असा!'' संजूचे वडील.

ते लोक निघून गेले. पण घरातले वातावरण मात्र पार गढूळ झाले. येवढे मात्र खरे. संजू रात्री ८ वाजता घरी परतला. खरेतर त्याचा कसलाच अभ्यास झाला नाही. लक्ष घरात काय रामायण घडणार याकडेच होते. पण घरी आल्यावर मात्र सगळे सामसूम पाहून संजयही चक्रावला. ते आले की नाही ? असाही प्रश्न त्याला चाटून गेला. आजची घरातली शांतता इतकी भयानक कशी. कोणी कोणाशीच बोलत नव्हते. पण ही शांतता भंग झाली.

ते लोक येऊन गेले ! तू अभ्यासात लक्ष घाल. आणि मी काय बोलू, तू समज! '' संजूचे वडील.

संजयने हे ऐकले. पण काहीच प्रतिक्रिया त्याने दिली नाही. आणि त्याने पुस्तक जवळ केले पण ती अक्षरेही त्याच्याकडे रोखून पाहत आहेत असा भास त्याला होत होता. नी तो अंधारावरच नजर खिळवून बसला होता. डोक्याचा भुगा व्हायची वेळ आली होती. परीक्षा दोन दिवसावर. संजयला दोन दिवस झोपही नीट लागली नव्हती. दुसऱ्या दिवशी परीक्षा.

''बाबा ! तुम्ही माझ्या बरोबर चला. मला एकट्याला भीती वाटते आहे ! प्लीज...'' संजू.

''हो येतो !'' बाबा.

पोतदारच्या तो परीक्षा हॉलमध्ये आला त्याची जागा मागच्या बेंचवर तर अंजूची पहिल्या बेंचवर. ती त्याचा चेहरा ओळखीत नव्हती. पण तो मात्र तीला ओळखीत होता. तिच्या समोरूनच तो आपल्या बेंचवर बसला. त्याची नजर तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे सतत जात होती. तिचे झुपकेदार केस त्याला आज ही भूरळ घालीत होते. येवढे रामायण घडले तरी.

पुढे एकदाची परीक्षा संपली. आणि तो आठवडाभर घरीच होता.

''हे पहा संजय ! आता तुमचा निकाल काय लागणार याची मला कल्पना आहे. हे प्रेमाचे प्रताप आता बस करा. पोटापाण्याचे पहा. आता बँकेतल्या नोकरीचे स्वप्न पूरे होणार असे वाटत नाही. फर्स्ट क्लास मिळाला तरच अन्यथा तुझे काही खरे नाही!'' बाबा.

संजय सारे ऐकत होता. ती रात्र त्याने पूर्ण जागून काढली. नी सकाळी उठून नोकरीच्या शोधात निघाला. आता त्याला १८ वर्ष पूर्ण होत होती. पण प्रकृती तशी मजबूत होती. त्याने वडाळ्याच्या सगळ्या इंडस्ट्रीयल इस्टेट पालथ्या घातल्या नि संध्याकाळी घरी परत आला. सकाळचा चहाही त्याने घेतला नव्हता. पोटात भुकेचा डोंब उसळला होता. खिशात पैसे नव्हते. पाणी पिऊन त्याने तो दिवस काढला.

''अरे संजू जेवतोस नां?'' आई.

''नको !'' संजू.

''कां ?'' आई.

''भूक नाही आई !'' संजू.

हे खरे नव्हते, डोके जराही काम करीत नव्हते. पुऱ्या दिवसात पायपीट करून कोणीही उभे केले नाही, वा आशेचा किरण दाखविला नाही. तो पूरता ढेफाळून गेला होता.

''मी तूझे जेवण ठेवते काढून ! भूक लागली की खा !'' आई.

त्याने काहीच उत्तर दिले नाही. पण तास भरानंतर तो जेवला खरा पण घास घशाखाली उतरत नव्हता. वडिलांचे शब्दान् शब्द त्याला आठवत होते. नी त्याचे डोळे ओलावले. गालावर ओघळणारी आसवे त्याने पुसली नी घरा बाहेरील बाकड्यावर आडवा झाला. सकाळी जाग आली तेव्हा सहा वाजले होते. पाय कमालीचे दुखत होते....

''काय रे ! संजय काल दिवसभर कोठे होतास? त्या पोरीच्या मागे नाही ना?'' वडील.

संजयने काहीच उत्तर दिले नाही. तो तसाच उठला नि बाहेर निघून गेला. पण आज न विसरता त्याने चहा घेतली. काही तरी योजना त्याच्या मनात घोळत होती. तो त्याचा मित्र डॉमनीक याला भेटला.

''माझ्यासाठी लहान मोठी नोकरी बघ ! माझी काहीही करायची तयारी आहे. '' संजय.

''बघतो! तू चल माझ्या बरोबर !'' डॉमनीक.

आणि ते तान्याच्या गॅरेजवर आले. डॉमनीक त्या गॅरेजमधे पूर्वी काम करीत होता. तेथे सारे काही शिकता येण्यासारखे होते. आता तो गॉडलेस नेरोलॅकमधे कलर मिक्सींगचे काम करीत होता. तो रविवार होता. तान्याच्या गॅरेजला रजा

नसे. आठवड्याचे सातही दिवस काम असे त्या गॅरेज मधे, गाडी घासणे, पेंटींग, मॅकॅनिकल वर्क, वेल्डींग सारे काही गाडी आली की नवी बनून पासींगला जाई. बिनधास्तपणे ते आले तेव्हा तान्या गाडीला पेंट मारीत होता.

''वा! डॉमनीक शेठ! बऱ्याच दिवसानी दर्शन झाले! काय काम काढलेय!'' तान्या.

''या मुलाला तुमच्याकडे कामाला ठेवा. तो इमानदार आहे ! कष्ट करायची तयारी आहे. अकरावीपर्यंत शिकला आहे!'' डॉमनीक.

''अहो! भाऊ येथे शिकलेल्यांचे काम काय ? आम्हाला लेबर हवे असतात !'' तात्या.

''नाही! तरीही ठेऊन घ्या.. अगदी आजपासून.'' डॉमनीक.

''ठीक आहे! अहो भाऊ खूप पोरे येतात. दोन दिवस काम करतात ! नाही झेपत म्हणून तिसऱ्या दिवशी पाठ फिरवतात. हे तू जाणतोस. हे कामच कष्टाचे, बघू या टिकतो काय ? तान्या.

''काय रे नांव काय तुझे !'' तान्या

''संजय !''

ठीक कपडे काढा नि कामाला लाग. पगार २।। रू. रोजचा. सकाळी ८ ते रात्री ७ पर्यंत काम करावे लागेल. जेवायला १/२ तास घरुन चपाती आणायची काय ? पगार दर शनिवारी.''! तान्या.

''होय शेठ! संजय, म्हणत तो जरा अडखळला. त्याची अडचण तात्याच्या ध्यानात आली.

''हे पहा, आत जा तुझे कपडे उतर नी कामाचे कपडे घाल नि आज गाडी घासायला घे ती एमजीबी पीटी २३६!'' तान्या.

संजय रोज सकाळी ७ वा. निघे. सोबत चपाती भाजी असे. आणि पूरा दिवस पडेल ते काम करीत होता. पहिल्या दिवसाच्या गाडी घासण्याने त्याचे हात फार दुखत होते. पण तो घरी काहीच बोलला नाही. कोठे जातो, काय काम करतो. हेही त्याने वडीलाना सांगितले नाही. पण शनिवारी झालेला ७ दिवसांचा पगार १७/५० त्याने आईच्या हातावर ठेवला. पण त्या ७ दिवसात वडिलांजवळ जराही भाषण नव्हते. त्याला हे कळून चुकले होते कष्ठानेच सारे साध्य होईल. त्याची तयारी त्याने पूर्वीच केली होती. २/३ महिन्यानी तान्याने संजयला बोलावले.

''संजय ! आता तू तरबेज झाला आहेस, तुला आवडेल ते काम शिक. सगळे शिकून घे. सगळेजण तुला शिकवतील. त्यात तेरबेज हो.!'' तान्या.

संजय वेल्डरच्या हाताखाली काम करु लागला. तो त्याचा पहिला दिवस होता. त्यात गॅस इलेक्ट्रीक वेल्डींग खूप दिवस चालत होती. त्याला तात्याने रामजीच्या हाताखाली हेल्पर म्हणून ठेवला. वेल्डींग होत असताना त्याची नजर सतत वेल्डींगवर होती आणि संध्याकाळी डोळे सुजले. लाल लाल झाले. तरी त्याने रामजीची पाठ सोडली नाही, ही त्याची परीक्षा होती नि महिन्या भरात तो गॅस वेल्डींग शिकला. आणि मग इलेक्ट्रीक वेल्डींग आता तो सफाईदार पणे रामजीच्या हाताखाली काम करीत होता.

''तान्याशेठ ! हा पोरगा रड्या नाही. डोके बाजपण आहे. त्याचा हात ४/६ महिन्यात चांगला बसेल. मग मला रजा दया !'' रामजी.

''हो ! हो ! तुझे वय झाले आहे हे मी जाणतो शिवाय तुला गावाला जायचे वेध लागले आहेत. अजून २/३ महिने काढ. मग तुला पाठवतो गावाला!'' तात्या.

दोन वर्षात संजयने सगळ्या कामाची उत्तम माहिती घेतली आणि तान्याला विश्वास वाटू लागला की हाच आपले गॅरेज नीट सांभाळू शकेल. मग तान्याने गावी जाण्याचा निर्णय घेतला. आणि संजयलाच इन्चार्ज नेमला. या गॅरेजमध्ये येणारे गाडीवाले, टॅक्सीवाले समाधानी होते. उगाच वेळकाढूपणा, लुटमार होत नसे व सांगितल्या दिवशी गाडीची डिलीव्हरी होत असे.

पाच वर्षानी तान्यानेच त्याला ते गॅरेज आणि जमीन विकण्याचा निर्णय घेतला. आणि संजयने बँकेकडून लोन घेऊन ते गॅरेज ताब्यात घेतले. पण तो तान्याचे उपकार विसरला नाही. त्याने त्या गॅरेजच्या कंपाऊंडलाच ''तान्या शेठ कंपाऊंड'' नांव दिले. आणि त्या गॅरेजचे नूतनीकरण करून त्याला अद्ययावत केले. 'होंडा सीटी'ने त्या गॅरेजला टायप करुन विश्वास संपादन केल्याने पुरस्कारही दिले. आज त्या 'नॅशनल' गॅरेजचे नाव वाहन चालकाना आशेचा एक किरण होता. विश्वास होता.

संजयने केलेल्या कामाचे चीज झाले. तो आर्थिकदृष्टीने सबळ झाला. घर घेतले, लग्न केले. सारी सुखे त्याच्या पायाशी उभी होती... पण तरीही तो अंजूला विसरू शकत नव्हता. त्याच्या सुखी जीवनात रात्रं दिवस अंजूच समोर असे. पण आपल्या मनातली संजू खंत कोणाला सांगू शकत नव्हता. त्याला

विश्वास होता केव्हातरी ती भेटेल. या आशेवर तो एक एक दिवस पुढे ढकलीत होता. आणि आज ती त्याच्या कॅबीनमध्ये समोर हजर होती.

आपल्यावर दिल बहार प्रेम करणारा हाच तो 'संजय सप्रे' हे आता कळून चुकले होते. त्याचे वागणे, बोलणे याने ती अधिकच प्रभावी झाली होती. एक तास त्यांच्या गप्पा चालू होत्या. आज अंजूलाही रजा होती. आणि घाईही नव्हती घरी जायची. गेल्या तासाभरात संजयने आपली सारी कर्म कहाणी अंजूला सांगितली. गेल्या वीस वर्षात त्याच्या मनात आपल्या बद्दल प्रेमाची ज्योत आजही तशीच आहे या गोष्टीने तिच्या मनातही प्रेमाचा अंकूर उमलू लागला.

''अंजू! आज पाडवा... तू माझ्या घरी जेवायला येणार कां ?'' संजू.

''नाही! आज नाही पुन: केव्हातरी !'' अंजू

''कां कोण वाट पाहतेय का तुझी घरी !''संजू

''नाही! मी एकटीच असते! माझे मिस्टर लग्नानंतर कॅन्सरने गेले. तेव्हा पासून मी एकटीच असते! एम.बी.बी.एस.नंतर मी एम.डी. केले नी केईएममध्ये आले. तेव्हापासून लेक्चररशीप करते आहे. सकाळी कॉलेज संध्याकाळी दादरला माझे क्लिनीक आहे. शिवाय मी सायन हॉस्पिटलला ही संलग्न आहे. या सगळ्या कामात माझा वेळ जातो.

''सॉरी!'' संजय

ही सारी हकिकत ऐकल्याने संजय अस्वस्थ झाला.

''आता तू एकटी नाहीस मी माझे कुटुंब तुझ्या सुख दु:खात तुझ्या बरोबर असेल !'' संजय.

म्हणत त्याने तीचे दोन्ही हात हातात घेतले. तिनेही तिचे हात त्याच्या हातातून सोडवण्याचा प्रयत्न केला नाही.

''चल ! आता निघूया! म्हणत ती दोघे आपापल्या वाटेने घरी गेली, पण दोघेही आज आनंद, दु:ख या मिश्रणात भिजून गेली होती, दोन दिशाना दोन पक्षी मनात हृदयात गहिवर घेऊन मार्गस्थ झाले. दोन अस्वस्थ जीवांचे मंथन सुरु झाले आज पाडव्याच्या दिवशी दोघांची भेट झाली. हा खरे तर शुभ योग. पण आज तो योगच दोघांनाही अस्वस्थ करून गेला.

अंजू घरी निघाली. तिच्या नजरेसमोरून संजयची मूर्ती हटेना. ती आपल्या हिरानंदानी कॉम्पसमध्ये आली. गाडी पार्क करुन ती आपल्या घरी आली. आणि

तिला भडभडून आले. कोणीतरी आपल्यावर जिवापाड प्रेम करीत होते आणि आजही करतो आहे यामुळे तिचे हृदय उचंबळून आले आणि आसवानी मार्ग करुन घेतला. आज ती दुपारी जेवली नाही. सारखा ध्यास लागला होता तो संजयच्या भेटीचा. तो केव्हा पुन: भेटतो आहे असे तिला झाले होते...

ती रात्र तिने जागूनच काढली. आपल्या शालेय जीवनापासूनचा सारा प्रवास रात्रभर तिच्या मनात पिंगा घालीत होता. ती डॉक्टर म्हणून  डॉक्टरच नवरा हवा या हट्टापाई आई वडिलानी तिचे लग्न डॉक्टरशी करुन दिले. खरेतर त्याचा आजार पलीकडच्या लोकांनी लपविला. सहा महिन्यातच त्याची लक्षणे तिच्या ध्यानी आली आणि ती हादरली मग पुढचे दिड वर्ष अगदी खडतर गेले, नी त्यात त्याचा अंत झाला. काडीचेही वैवाहिक जीवन तिच्या वाटेला आले नाही. पण तरीही तिने एकाकी जीवनाचा स्वीकार केला. तिच्या पुढे अनेक प्रलोभने समोर आली पण त्या आकर्षणाला ती बळी पडली नाही. आणि आपला मार्ग तिने स्वीकारुन आपल्या प्रोफेशनच्या नियमाला ती जागली.

केईएममध्ये ती सर्जन प्रोफेसर म्हणून प्रसिद्ध होती. विद्यार्थ्यांमध्ये तिची प्रतिमाही फार चांगली होती, तिचा पूरा दिवस कामात जाई. ती एका घरून डबा मागवून संध्याकाळचे जेवण घेत असे. तिला क्षणाचीही उसंत नव्हती. मोकळा असे तो रविवार आणि क्वचीत सणासुदीची रजा. येरव्ही पुरा दिवस सकाळी ७ ते रात्री ९ पर्यंत ती व्यस्त असे. स्वत:चा विचारही करायला तिला वेळ नव्हता. ना विरंगुळा, ना जिवाभावाच्या माणसांचा सहवास. येणारा एक एक दिवस ढकलीत ती जीवन जगत होती. आपण लग्न करावे असा विचार तिच्या मनाला अनेक वेळा स्पर्शून गेला. पण पुन: ती विषाची परीक्षा नको या विचाराने तो विचार तिने झटकून टाकला. पण आजची संजयची भेट मात्र तिला पुरती हलवून गेली. आपल्यावर कोणीतरी गेली अनेक वर्षे मनापासून प्रेम करतो आहे. याच विचाराने ती सुखावली होती आणि तिच्याही हृदयाने तो होकार आज स्वीकारला होता.

दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलला जाताना तिची नजर संजयच्या गॅरेजकडे गेली पण क्षणभर आपण असे वहात जायला नको असा विचार मनात येताच, तिने नजर फिरवून गाडी केईएमच्या कंपाऊंडमध्ये घेतली.

आज तिचे मन खरेतर लेक्चरसाठी तयार नव्हते. कारण पूर्व तयारीनीशी ती कॉलेजमधे येत असे. पण कालचा दिवस अस्वस्थ अवस्थेत गेला. तेव्हा आज

तिने वर्गातल्या सगळ्या मुलांना त्यांच्या करीयरच्या विचाराचे मंथन मुलांबरोबर करावे असे तिला वाटले आणि आजच्या वर्गात नव्याने मेडीकलला ॲडमीशन घेतलेल्या मुलांना खूपच भावले. या प्रोफेशनची सामाजिक जबाबदारी याच विषयामधे सारी मुले मग्न होती अनेक प्रश्न मुले विचारीत होती आणि त्याना समर्पक उत्तरे ती देत होती, त्या चर्चेत अग्रेसर होता प्रविण, संजयचा मुलगा. त्या चर्चेतून मुलांच्या मंथनातून अनेकाना सुर सापडला त्यातला एक प्रविण. दोन तास केव्हा गेले हे तिलाही समजले नाही. मुलेही प्रसन्न मनाने पुढच्या लेक्चरला गेली. आज तिची ओपीडी होती. सगळी मुले ओपीडीला हजर झाली होती. आपल्या करीयरच्या विचारानी सगळी मुले झोपेतून जागी व्हावी तशी प्रसन्न मनाने तिचे बोलणे ऐकत होती. प्रश्न विचारीत होती. तिचेही बोलणे सगळी मुले मनापासून ऐकत होती.

त्या दिवशीची सर्जरी थियेटर खाली नसल्याने पुढे गेली होती. तेव्हा ती चार वाजताच घरी आली व नंतर २ तास आराम करुन संध्याकाळी आपल्या कन्स्लटींग रुममधे गेली. आज सकाळी तिने लेक्चरमधे घेतलेल्या वेगळ्या प्रकार आपल्याला कसा सूचला याचेच तिला आश्चर्य वाटत होते. हा मुलांशी झालेला मोकळा संवाद.

रात्री ९ वाजता ती घरी आली. जेवण करुन घेतले पण अजूनही तिचे मन स्थिर नव्हते. तिच्या समोर येत होता तो प्रवीण त्याचा धिटपणा, प्रश्न विच्चारण्याची पद्धत, आदबशीर बोलणे, उपप्रश्न. आज खरेतर त्याचीच अधिक ओळख अंजूला झाली होती, आणि त्या मुलांबद्दल प्रेमाचा झरा तिच्या मनात जागला होता आणि मग मात्र त्यांची गट्टी जमली. तो आपलाच मुलगा आहे. असे तिला वाटू लागले होते. आणि मातृत्वाची तिची कुस प्रेमाने जागी झाली होती.

गेल्या दोन दिवसातल्या घटना ह्या स्वप्नवतच होत्या. दिवस ढकलण्याचा क्रम बदलला होता आणि आज जगण्यात तिला रस वाटायला लागला होता. घरी आल्यावर छान मराठी गीते तिने कधी नाही ती लावली आणि झोप केव्हा लागली ते समजले नाही. उद्या रविवार होता. तेव्हा सकाळी घाई नव्हती. ती आठ वाजता उठली आणि आज आपण १०/११ वाजता संजयच्या सर्वीस सेंटरला जायचे आणि त्याला भेटावे असे गेले दोन दिवस तिला वाटत होते. पाय सर्वीस सेंटरकडे वळले.

तिने आपली गाडी गॅरेजच्या आवारात उभी केली आणि ती संजयच्या कॅबीनमधे आली. पण तो कामात होता. त्याला समजले अंजू आली आहे. त्याने स्टाफला सांगून तिला कॅबीनमधे बसायला सांगितले. कारण आज म्युनिसिपल कमिशनर अरविंद देशपांडे यांची मर्सीडिज गाडी आली होती. त्यांना ती तातडीने हवी होती. आणि ती किमती गाडी इतर स्टाफला सांगण्या पेक्षा तो स्वत: तिचे इंजीनला सर्विसींग करीत होता. तोवर तेही संजयच्या कॅबीनमध्ये बसले होते. साहजिकच अंजूही तेथे आली व त्यांच्या गप्पा रंगल्या. एक तासा नंतर संजय कॅबीनमध्ये आला. त्याने देशपांडे साहेबांना चावी दिली व त्यांना त्यांच्या गाडी पर्यंत सोडले.

''सॉरी! आज साहेब अचानक आले आणि गाडीचे काम निघाल्याने माझा नाईलाज झाला. सॉरी तुला ताटकळत बसावे लागले. माझा नाईलाज होता!'' संजय.

''इटस् ओके... म्हणत ती काही बोलणार येवढ्यात संजय बोलला. ''जरा पाच मिनिटे थांब. मी फ्रेश होतो नी मग आपण बोलू !'' संजय.

पाच मिनिटात तो परत आला तेव्हा दुपारचे साडे बारा वाजले होते.

''आता नाहीतरी वेळ झाला आहे ! तेव्हा आपण बरोबरच लंच घेऊ या. तोवर तुझी गाडी स्टाफ आतून सर्विसींग करून घेतील. आज तुझी रजा आहे. आणि मीही आज मोकळा आहे. तुझ्या गाडीची चावी दे!'' संजय

तिने चावी दिली नी स्टाफने तिची गाडी सर्विसींगसाठी गॅरेजमध्ये आणली. आणि ती दोघे संजयच्या गाडीने दादर क्लबमधे आली. या क्लबचा तो मेंबर होता.

''काय आवडेल तुला ? वेज, नॉनवेज ? संजय.

''वेज !'' अंजू

''कां बरे!'' संजय,

''मी गेली अनेक वर्षे नॉनवेज खाल्ले नाही म्हणून !'' अंजू.

मग तिच्या आवडीचेच प्रकार त्याने मागविले आणि दोघांनी जेवण घेतले. शिवाय या जेवणाच्या वेळी गप्पांचा फड रंगला होता. केव्हा ३ वाजले त्यानाही समजले नाही.

आणि ती दोघे त्याच्या सर्विस सेंटरला आले. तिच्या गाडीची सर्विसींग झाली होती.

''सर्विसींगचे बिल किती झाले !'' म्हणत तिने आपली पर्स काढली.

''आपल्या माणसाकडून पैसे घेतात का? आता तूच सांग. हे गॅरेज तुझेच आहे असे समज !''संजय

अंजूने पर्समधून काढलेले पैसे तसेच ठेवले आणि आपली गाडी घेऊन ती घरी निघाली....

''बाय ! पुन्हा भेटूया ! '' संजय.

आजची भेट ही खऱ्या अर्थाने फलदायी ठरली. दोघांमधे खूप बोलणे झाले. जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. तसेच आपली भेट पूर्वीच व्हायला हवी ही भावनाही दोघानी व्यक्त केली. हॉटेलमधून बाहेर पडताना त्यांचे हात एकमेकांच्या हातात होते. जवळकीचे रणशिंग वाजले होते. पण.. पण.. तिच्या मनात शंकेने कहर केला.. आपण खूप पुढे जात आहोत. यातून काही विपरीत घडू नये. संजय विवाहीत आहे. त्याचा प्रपंच स्थिर आहे. त्याला एक मुलगाही आहे. आपल्या उजाडपणाची झळ त्याच्या सुखी संसाराला लागू नये. असा विचारही तिच्या मनाला चाटून गेला. क्षणभर. पण मन मात्र ओढ घेत होते संजयकडे. आणि संजयचीही साथ तिला आता मिळत होती. प्रेमाचा अंकुर नव्याने बहरतो आहे. हृदयातली भेटीची ओढ रोखणे कठीण जाते. या साऱ्या घटना अंजलीच्या मनात वादळासारखे वातावरण निर्माण करीत आहेत. असा भास तिला होत होता.

प्रेमाचा मार्ग कधीच सरळ नसतो. तो आडवळणाने पुनः पुनः प्रवाहीत होऊन संगमाचे वातावरण निर्माण करतो. कधी पुनः तटातूट होते. नि भरकटते दोघांचे आयुष्य... वा पुनः पुढच्या वळणावर भेट होते नि ती आयुष्याला जगण्याला बहर आणते. सारी सामाजिक बंधने तटातटा तुटतात नि पाण्याची खळखळ शांत होते नि मने एकरुप होतात. असाच काहीसा भास अंजलीला होत होता. आकाशातले दोन तारे जवळ यावेत आणि प्रकाशाचा स्थर वाढावा. त्यांच्या सहवासाचे आणि ती आडवळणाची वाट स्पष्ट दिसावी, असे तिला वाटत होते. आपले काही चुकत तर नाही ना? आपण उगाच संजयच्या जीवनात काटा होऊ नये म्हणजे झाले. पण त्याच्या अबोल अवस्थेतून त्याला व्यक्त होण्याची आपल्या सहवासाने संधी मिळते आहे. आणि आजवर हृदयात कोमेजलेला प्रेमाचा अंकूर पुनः नव्याने आकार घेतो आहे असे तिला जाणवत होते. त्याचे रुक्ष प्रापंचिक जीवनाच्या बाहेर पडून जीवनात आनंदाचा,

समाधानाचा अंकूर सुगंधाच्या वाटेने फूलत आहे. हे तिला संजयच्या वागण्यातून बोलण्यातून जाणवायला लागले होते. अनेक वेळा रात्री फोनवर दोघांचे तासनूतास बोलणे होत असे. आणि त्यातून दोन तुटलेले तारे जवळ येत आहेत असेही तिला आणि संजयलाही वाटत होते.

खरेतर पहिले प्रेम हे नैसर्गिक असते. त्याला अंतरमनात निर्माण होणारी ओढ ही शारीरिक नसते. डोळ्यात साठविलेले प्रेम हृदयात येते नि वादळ निर्माण होते प्रेमीकांच्या. कधी ते एकांगी असते तर कधी दोघांच्या भेटी गाठीतून. पण जेव्हा ते एकांगी असते. ते प्रचंड वेगाने तिच्या वा त्याच्याकडे भेटण्यासाठी वादळाचे स्वरुप धारण करते. आपल्या मनात फुललेला प्रेमाचा सुगंध सहवासासाठी अधीर झालेला असतो. कधी तो लवकर भेटीतून व्यक्त होतो. कधी वळणे घेत घेत दूर दूर जात रहातो आणि मग दोन ध्रुवांवर मनातल्या मनात कुढत रहातो. कधी संयोग होतो वा तुटतात दोन्ही तारे पुढच्या जन्मी एकमेकांना भेटतील या आशेवर माणूस जगत असतो. ते पहिले प्रेम त्याना विसरता येत नाही. ते तसेच ताजेतवाने रहाते आणि त्याची झळाळी वाढत जाते. त्याची प्रखरता एका वळणावर इतकी वाढते की सारे जग त्याना त्या प्रेमाच्या ओढी समोर नगण्य वाटायला लागते. सारे जगच त्यांना बेसूर वाटायला लागते. पण जेव्हा त्या प्रेमाच्या ओढीचा सूर सापडतो प्रचंड वेगाने ते प्रेमीक एकमेकांच्या जवळ येतात आणि कधी इतके जवळ येतात की बहरते ते प्रेम वादळी वाटेने भरकटते.

अगदी तशीच अवस्था आज अंजू आणि संजयची झाली होती. जवळीक तर हवी, सहवासाची ओढ दोघांनाही चैन पडू देत नव्हती पण अनेक अडचणी होत्या, संजयच्या बाबतीत.

अंजूची भेट झाल्यापासून संजयच्या बाबतीत झालेला बदल त्याच्या पत्नीच्या सुमाच्या नजरेतून सुटला नव्हता. संजय फारच तुटक तुटक वागतो आहे त्याचे जेवणही ठीक होत नाही. काही गोड धोड हवे असे सुमाला सांगत नव्हता. शिवाय बाहेर फिरणेही बंद झाले होते. पूर्वी ती दोघे संध्याकाळी मार्केटला बरोबर जात पण तेही थांबले होते. थोडक्यात त्यांच्या सहजीवनातला राम वनवासाला गेला की काय हे ही तिला जाणवत होते. अनेक वेळा संजय वेळेवर झोपत नसे. त्याच्या अंगात भूत संचारले आहे अशा मानसिक अवस्थेतून तो जातो आहे. हे सुमाच्या ध्यानी आले होते. अनेक वेळा तिने त्याला छेडले

पण त्याने कमालीचा अबोलाच धरला होता सुमाबरोबर आणि त्यातून तिचीही अस्वस्थता वाढली होती.

अंजूने संजयला त्याच्या प्रापंचीकतेबद्दल अनेक वेळा छेडले. पण तो त्याबद्दल अक्षरही बोलायला तयार नव्हता. प्रत्येक वेळा तो त्या विषयाला टाळत असे. आणि अंजूही अस्वस्थ होई. आपण संजयच्या सहवासात आलो, त्यामुळे संजयच्या प्रपंचात वादळ होणार तर नाहीना, अशी शंका तिच्या मनाला चाटून जात असे. तिला संजय मधे झालेला फरक जाणवत असे. आता तर दर रविवारी दुपारी जेवण दादर क्लबमध्येच होई. मग फिरणे, खरेदी इ. तो खूपच आपल्याला जपतो आहे. आपल्या आवडी निवडी जाणून घेत आहे असे तिला वाटत होते. आणि त्याचमुळे तो त्याच्या प्रपंच्यापासून दूर जात आहे हे अंजूला जाणवत होते.

एकदा का एखादी व्यक्ती आपल्या मनात भरली आणि प्रेमाचे भरते आले की माणूस सैरभैर होतो. त्याच्या भोवतालच्या गोष्टीत त्याला जराही स्वारस्थ वाटत नाही. आणि मग हे प्रेम अधिकाधिक घट्ट होत जाते, नि अनेक वळणे घेत नदी जशी सागराला भेटण्यासाठी जशी वेगाने प्रवाहीत होते तशीच अवस्था त्या प्रेमिकांची होते. आणि अंजू आणि संजयची झाली होती.

अंजू संजयच्या जीवनात आली आणि त्याचे सगळे आयुष्यच बदलून गेले. विचारांच्या टोकावर असणारी अंजू आठवणीतून प्रत्यक्ष अवतरली. हेही एक मोठे वादळच झाले त्याच्या जीवनात जगण्याची, विचारांची दिशाच पार बदलून गेली. आणि एक दिवस सुमाने त्याला स्पष्टच विचारले.

"काहो ! असे कां वागत आहात. तुमचे घरात, प्रपंचात आणि माझ्यात लक्ष नाही. मला असा भास होतो आहे की तुम्ही माझ्यापासून, प्रविणपासून दूर जात आहात. गेल्या १८/१९ वर्षात असे काही घडले नव्हते. आणि आताच कां घडावे ? घरात काय हवे नको पूर्वी पाहत होतात. हसत खेळत होतात ते आता बंद झाले आहे. तुम्ही वेगळ्याच नशेत असता असे कां ?" सुमा.

पण यावर संजय काहीच प्रतिक्रिया देत नव्हता. त्याने सुमाबरोबर अबोलाच धरला होता. नि या गोष्टीचा छडा लावायलाच हवा, म्हणून एक रविवारी ती प्रविणला घेऊन सर्विस सेंटरमधे आली. तेव्हा तो एकटाच आपल्या कॅबीनमध्ये बिलांवर सह्या करत होता. ते दोघे आलेले आहेत आपल्या समोर बसले आहेत हे त्याने ओळखले पण तो कामात असल्याने त्यानीही गप्प रहाण्याचे ठरवले.

१५/२० मिनीटाने त्याचे काम संपले. त्याने बिलांची फाईल बंद केली. तो सारखा घड्याळात पाहत आहे असेही सुमाला जाणवले. तो कोणाची तरी वाट पाहत असणार नक्की. कोणी कंपनीचा माणूस वा कोण खास हे ही तिला जाणवले.

"कोणी खास भेटायला येणार आहे कां? कोण येणार आहे ज्याची तुम्ही वाट पाहत आहात. आज आपण सर्वानी बाहेर जेवायला जाऊया. चालेल नां? कि आम्ही घरी जाऊ?" सुमा.

येवढ्यात अंजू त्याच्या कॅबीनमध्ये आली. ती येताच प्रविण उठून उभा राहीला...

"मॅडम ! या." प्रविण.

म्हणत त्याने खुर्ची पुढे केली. आज प्रथमच सुमाला त्याच्या पत्नीला अंजू पाहत होती. ती तशी सुंदर होती. बांधेसुद होती पण अंजू आल्याने तिच्या चेहऱ्यावरचे सगळे भाव बदलले. कपाळाला आठी पडली आणि तिने डोळे बंद करुन घेतले.

"या डॉक्टर ! ठीक आहे ना ?" संजय

"होय! आता परीक्षा जवळ आल्या आहेत. तेव्हा पेपर सेटींग, मग परीक्षा, त्यानंतर पेपर तपासणी. म्हणजे पुढचे दोन महिने खूपच व्यस्थ असेन मी !" अंजू.

पण त्यांच्या संवादातून सुमाला काहीच बोध होत नव्हता. पण तिच्या मनात पाल चुकचुकली असणार येवढे खरे. कारण संजूही अडखळत बोलत होता. हि बया कोण? इतक्या खेळी मेळीत ही आपल्या नवऱ्याशी कशी बोलते. गाडीच्या रिपेरींग बद्दल असती तर बाहेर थांबली असती. पण सरळ कॅबीनमध्ते येते काय, बसते काय, आणि प्रविण उठून उभा रहातो काय? म्हणजे तो त्या बाईला ओळखीत असणार हे तिनेही ताडले. ती बसली पण प्रविण तरीही खुर्ची समोर असताना का बसला नव्हता. त्याने तर अबोलाच धरला होता.

"पप्पा आपण आज दादर क्लबमधे जेवायला जाऊया कां? आज मॅडमही आल्या आहेत त्यानाही घेऊन जाऊया ! चालेल !" प्रविण.

प्रविणच्या बोलण्याने अबोलपणाच्या वातावरणाची कोंडी फुटली होती...

"नको! तुम्ही जा मला आज खूप काम आहे. मी हॉस्पिटलला एका अर्जंट सर्जरीसाठी गेले होते. म्हटले डोकावते तुमच्याकडे !" अंजू.

ती 'डोकावते' असे म्हणताच सुमाला जरा वेगळाच वास आला. पण ती डॉक्टर .. संजय एक सर्विस सेंटरवाला ११वी झालेला. मग यांच्यात येवढी जवळीक कशी ? ती बिनधास्त पणे त्याच्या कॅबीनमध्ये कशी घुसते? काहीतरी गौडबंगाल आहे. असा संशय तिला आलाच होता.

''मॅडम तुम्ही चलाच आमच्या बरोबर नाहीतरी आज रविवार आहे. आणि आता तर १२.३० वाजून गेलेयत. जेवणाची वेळही झाली आहे ! प्रविण.

म्हणजे प्रविणही या बाईला ओळखतो. येवढा बिनधास्तपणे तो कसा काय या बाईशी बोलतो. ती म्हणाली त्यावरून ती हॉस्पिटलमधे डॉक्टर आहे हे तिला समजले होते. उगाच आपल्या डोक्याचा भुगा करुन घेण्यात अर्थ नाही हे तीनेही जाणले आणि आपल्या चेहऱ्यावरील आठ्या सैल केल्या.

''ठीक, आपण दादर क्लबमध्येच जाऊ सगळेजण ! निघूया !'' संजय.

ती सगळी उठली आणि आपापल्या गाडीने निघाली

प्रविण आज खूपच खूशीत होता. आज आपल्या प्रोफेसर आपल्या बरोबर जेवत आहेत यामुळे त्याच्या मनात आनंद होता. शिवाय अंजूलाही प्रविण बद्दल खूपच प्रेम वाटत होते. शिवाय तो संजयचा मुलगा. यामुळे.

खरेतर आज त्यांचा जेवायला जायचा बेत होताच म्हणून हॉस्पिटल मधून ती संजयकडे आली. हल्ली संजय दर रविवारी दुपारी जेवायला नसतो. हे एक कोडेच सुमाच्या मनात होते. त्याचे उत्तर तिला सापडत नव्हते. पण आज क्लबमधे आल्यावर त्यांच्यामधे होणाऱ्या संवादातून अनेक प्रश्न तिच्या मनात पिंगा घालीत होते. काहीतरी पाणी मुरते आहे, एवढे मात्र खरे हे तिने ताडले होते.

आज रविवार म्हणजे काहीतरी चिकन वगैरे मागवायचे सुमाच्या मनात होते, पण संजयने शाकाहारी ऑर्डर दिल्याने तिला प्रश्न पडला असे कां? नाही तरी रविवारी चिकन किंवा मच्छी असतेच ना पण गेले वर्षभर संजय रविवारी घरी जेवायला येत नव्हता. दर रविवारी संजय-अंजू भेटत आणि जेवण बरोबर घेत होती.

मी शाकाहारीच घेते नेहमी असे अंजली म्हणाली. नेहमी या उच्चाराने बरेच काही स्पष्ट होत होते की संजय आणि ही बया दर रविवारी जेवायला येतात आणि म्हणून तो जेवायला रविवारी घरी येत नाही. हा तिचा संशय पक्का झाला.

''आणि या डॉक्टर अंजली'' प्रविण ''मॅडम! ही माझी आई सुमा!''

म्हणत प्रविणने आपल्या आईची ओळख करून दिली. सुमाही हसली आणि तिने अंजलीला नमस्कार केला.

जेवणापूर्वी वातावरण त्यानंतर थोडे सैल झाले. संजयने सुमा–प्रविणसाठी चिकन वड्याची ऑर्डर दिली.

''तुम्ही नॉन व्हेज जराही खात नाही कां?'' सुमा.

''नाही! आमच्या लहानपणापासून, नॉनव्हेज आमच्या घरी नव्हतेच आम्ही ब्राम्हण म्हणून !'' अंजू

''ओके ओके... ठीक आहे !'' सुमा.

जेवण आले आणि सगळ्यानी जेवून घेतले. मग ती आपापल्या गाडीनी घरी परतले. गाडीत सगळेच अबोल वातावरण होते...

''अहो ! या बाई तुमच्या ओळखीच्या कशा?'' सुमा.

''आम्ही एका वर्गात होतो शाळेत असताना ! '' संजय

हे ऐकल्यावर तर सुमाच्या डोक्याची चक्रे भन्नाट वेगाने फिरायला लागली. म्हणजे हे प्रकरण जुने आहे. तर ! असा संशय तिला आला.

''त्यांची माझी भेट हॉस्पिटलमध्ये प्रविणला सोडायला गेलो तेव्हा झाली. या डॉ. अंजू आमच्या शाळेत होत्या. २० वर्षानंतर योगायोगाने भेट झाली. त्यात प्रविण त्यांच्या केईएममधला विद्यार्थी. केव्हातरी भेट होते त्यांची !''

''की दर रविवारी येतात त्या दुपारी तुमच्या बरोबर जेवायला !''सुमा.

हे ऐकून संजय उडालाच. ही वादळापूर्वीची शांतता आहे. हे त्याने ताडले. आता एकतर अंजूला टाळले पाहिजे किंवा रविवारी जेवायला घरी यायला हवे. हे त्याने पक्के ओळखले होते. पण चेहऱ्यावर जराही काही दिसणार नाही संशयाचे मूळ यासाठी त्याने गाडीला जोरात ब्रेक लावला. खरेतर पुढे गाडी नव्हती वा सिग्नल. पण मनाला ब्रेक लावण्याच्या नादात गाडीलाच ब्रेक लावला होता.

ती घरी आली खरी पण घरी वादळच घेऊन आणि मग पुरा सन्नाटा झाला होता घराचा. प्रविणला या साऱ्या गोष्टींची काहीच कल्पना नव्हती. काय शितयुद्ध चालले आहे घरात. पण आजच्या घटनेने आईच्या वागण्यात बदल झाला आहे येवढे मात्र खरे हे त्याला जाणवत होते. हा बदल अचानक कसा झाला? आईने आज कधी नाही ते सर्विस सेंटरला जाण्याचा निर्णय का घेतला. येरव्ही रविवारी घरी जेवणारी आज तिच्या मनात, हॉटेलला जाण्याची इच्छा

व्हावी? आणि डॉ.अंजू आल्यानंतर आई कशी बदलत गेली ? या प्रश्नांच्या जंजाळातून प्रविणला बाहेर पडता येईना. पण घरात आई वडिलांमधे झालेल्या अबोल्याला काहीतरी सिरीयस कारण झाले असणार हे त्याने ताडले.

दुसऱ्या दिवशी प्रविणला कॉलेजला सोडायला न जाता संजयने स्कूटर घेऊन जायला सांगितले. असे आज का व्हावे ? यावरून सुमाच्या मनातला संशय अधिक बळावला.

हे जुने प्रकरण 'प्रेमाचे' असावे. नक्कीच हे सुमाने जाणले होते. मग इतक्या वर्षात म्हणजे गेल्या २० वर्षात यांचा जराही वास मला कसा आला नाही? आता ही बया प्रविणच्या हॉस्पिटलमधे भेटावी. आणि जुन्या कढीला नव्याने ऊत आला असणार हे तिने ताडले. आणि आता तर तिच्या मनातला संशय अधिक घट्ट होत गेला. पण दुसराही विचार मनात येऊन गेला. ती येवढी मोठी डॉक्टर, संजय एक सामान्य मॅकॅनिक, या दोघांतला फरक केवढा. शिवाय प्रविणमुळे गाठ झाली आणि तिने वा त्याने ओळख अधिक वाढवली तर त्यात काय चुक? तिचाही नवरा असेल, मुले असतील आणि दर रविवारी ही संजय बरोबर कशाला येईल जेवायला. हे खरे पण संशयाचे भूत काही उतरायला तयार नव्हते.

आपण उगाच पराचा कावळा करतो आहे. असे तिच्या मनाने घेतले आणि संशयाला फाटा मारुन आपल्या घराचे वातावरण बिघडणार नाही यासाठी आता सुमाने स्वतःच्या वागण्यात बदल करुन घेण्याचे ठरवले. आणि घरातले वातावरण ही बदलले.

संजयनेही रविवारी अंजूला भेटण्याच्या त्यांच्या रुटीनमधे बदल केला. आणि रात्री क्लिनिक नंतर ती दोघे क्लबमधे भेटू लागली. आता तर ती खूपच जवळ आली होती. अंजूला कोणाचा तरी भक्कम आधार हवा होता. तो संजयच्या निमिताने लाभला होता. या आड वळणाच्या वाटेने एक वेगळाच मोड घेतला होता. हे तिलाही जाणवले. आता आपल्याला सहवास हवा हवासा वाटतो आहे. त्याच्या पासून क्षणभरही दूर व्हावा, दोघांच्यात दुरावा व्हावा असे तिला सारखे वाटे. संजयच्याही जीवनात वादळ निर्माण होऊ नये असेही वाटे. पण ते कसे शक्य आहे. तो एक गृहस्थी आहे. कुटुंब वत्सल आहे. त्याच्याही वागण्यात हा फरक घरात जाणवला तर प्रचंड वादळ होईल हे ही ती जाणून होती. पण आपल्यावर मनस्वी प्रेम करणारा संजय तिला हवा होता. तिची

प्रेमाची भूक कधीच पूरी झाली नव्हती. शरीर सुखाचे क्षण वेगळ्याच भावना तिच्या मनात पिंगा घालीत होत्या. आणि दिवसें दिवस तिच्या मनाची अवस्था बिकट होते आहे हे अंजूला जाणवत होते. नवरा गेल्यानंतरची १५ वर्षे अत्यंत जीवघेणी गेली होती आणि आता कोठे थोडा प्रेमाचा ओलावा दिसतो आहे, तर त्यात तिला काहीतरी भयानक शिजते आहे, असे सुमाचा चेहरा पाहील्यावर तिला जाणवले होते. आणि आपण सावध रहायला हवे, उगाच भावनांचा अतिरेक सारी वाटच रक्तबंबाळ करू शकते हे तिने ताडले होते. म्हणून गेले दोन महिने तिने नव्याने त्यांच्या प्रेमाची घडी बसवण्याचा प्रयत्न केला. आणि काही अंशी त्यात शिथीलता आली.

इकडे संजय आपल्या मनाप्रमाणे वागतो आहे, त्या बयेचा आणि त्याचा तसा काही संबंध नसावा, आपण उगाच संशयाचे भूत आपल्या गळ्यात बांधून घेतले आहे आणि ती स्वतः त्यापासून सुटका करुन घेते आहे. असे मनोमन तिला वाटत होते. कोणत्याही स्त्रिला तिचा प्रपंच्यात कोणाचीच लूडबूड चालत नसते. आपल्या प्रपंच्याच्या सुखात कोणीही मिठाचा खडा टाकू नये असे सारखे तिला वाटत असते. आणि ते खरेही आहे.

आपली हिंदू संस्कृतीही मर्यादाशील, सामाजिक बंधनाची आहे. त्यामधे कुटुंबाला फार मोठे स्थान आहे. जन्म, लग्न आणि मृत्यू या तीन अवस्थेतील 'लग्न' या संस्कारातून समाजाची सगळी घडी बसली आहे. कुटुंब सुखी तर समाज सुखी अशी आपली संस्कृती आहे. म्हणून फक्त रामचंद्रांच्या एक पत्नीत्वाचा पगडा आपल्या समाजावर आहे. तो नेहमी आदर्श असावा. या साठी पती, पत्नी प्रयत्न करतात पण कधीकधी त्याना नजर लागते आणि सारा खेळ बिघडतो.

माणूस हा संवेदनशील प्राणी आहे. त्याला सातवा सेंस आहे. हे त्याच्या प्रपंचात जर कोणी डोकावले तर जाणवते त्याला. आणि ती घटना त्याना पचवणे कठीण जाते. त्यात स्त्रीही भावनाशील मर्यादेची पुतळी असेल तर त्याची धग अंतर बाह्य तिला पोळून काढते आणि त्याचे पडसाद प्रपंचाच्या चार भिंतीत उमटायला वेळ लागत नाहीत. आपल्या आणि पाश्चिमात्य संस्कृतीत हाच तर फरक आहे. आपल्या संस्कृतीत जराही उथळपणा नसतो आणि म्हणून त्यात जाणवणारा थोडासाही फरक भयानक म्हणजे रुद्र स्वरुप धारण करू शकतो. नारळाच्या कवडी जशा दुभंगतात तसा प्रपंच दुभंगतो आणि घराची पूर्ण

वाताहात होते. त्याची जाणिव स्त्रीला प्रथम होते. पूरुष म्हटले तर उनाडच, त्याची उधळण्याची.... हाव कधीच शामत नाही. चारी दिशाना त्याचा वारू उधळत रहातो. आणि त्याला काबूत ठेवण्याचे काम एक तर त्याची पत्नीच करू शकते. हे फक्त हिंदु संस्कृतीतच घडते. अन्य नाही. स्त्रिला पुरुषाचे मन वाचता आले पाहिजे, म्हणजे त्याला बंध कसे घालायचे ते तिला कळते.

पण संजय तसा नव्हता, जरी मनात अंजू बद्दल प्रेमाचा उगम पावलेला कोंब तो नाही विसरता आला तरी गेली २० वर्षे सुमा बरोबर त्याने खूप चांगला प्रपंच केला. इतक्या वर्षात तो अंजूचे प्रेम विसरू शकला नाही तरी त्याचे सावटही आपल्या कौटुंबिक चार भिंतीत कधी दाखविले नाही. पण तरीही ते विसरता येत नव्हते. हे फक्त तोच जाणून होता.

आज आपण पाहतो जगात प्रेम आणि लग्न या दोन नाण्याच्या बाजू असतात. लाखात एखादीच गोष्ट होऊ शकते अन्यथा प्रत्येक जण वेगवेगळ्या वाटेने जात प्रेमाचे ओझे जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत वहात असतो. आणि मग ती वाट विसरण्याचा प्रयत्न करतो. पण त्याला ते विसरणे अशक्य होते. कधीकधी तो ती वाट शोधण्याचा प्रयत्न उलट्या मार्गाने जात, पण दोर कापलेले असतात आणि तो प्रवास थांबतो. आणि सोबतच्या मार्गाने नाखूशीने होईना का, तो मार्ग क्रमण करीत रहातो. अबोल होऊन आणि प्रेमाचे गाठोडे सोबत घेऊनच जीवन संपवतो. काही वेळा तो स्वत:लाही दोष देत तर कधी डोंगरा येवढ्या अडचणींनी तो मार्ग सोडून देतो, पण नाही विसरत तो त्या कोमल भावनांच्या वाटेला. येवढे मात्र खरे.

प्रविणची परीक्षा संपली आणि पुढचे सेमीस्टर सुरू झाले पहिल्या सेमीस्टर मधे त्याने उत्तम मार्क मिळवले होते. आणि प्रविणचे अभिनंदन करणारे पत्र अंजूने प्रविणच्या घरी पाठवले. तसेच त्याच्या आठ दिवसानी येणाऱ्या वाढदिवसाच्या शुभेच्छाही अंजूने प्रविणला दिल्या. ते पत्र प्रथम हातात पडले ते सुमाच्या. तिने ते वाचले. अत्यंत सुंदर वळणदार अक्षरात ते पत्र पाहून तिला आनंद झाला. ही बाई माझ्या मुलाचे अभिनंदन करते, त्याची जन्म तारीख आठवणीत ठेवते याच गोष्टीचे तिला फारच अप्रुप वाटले खरे पण तिचा हा आपल्या कुटुंबाजवळ येण्याचा प्रयत्नही सुमाला आवडला नाही. आणि तिला गोष्ट आठवली ती अरब आणि उंटाची. त्या बयेचा शिरकाव आपल्या प्रपंच्यात होऊ नये. नाहीतर वाताहात होईल आपल्या सोन्यासारख्या संसाराची. हे ती

जाणून होती. पण त्याच वेळी तिला आणखी एक गोष्ट आठवली ती तिच्या वाचनात आले की, माणसाच्या लिहिण्याच्या खूबीची. ती म्हणजे ''ज्याचे अक्षर सुंदर, वळणदार, स्वच्छ, खाडाखोड न केलेले, वेलांटी उकार जेथला तेथे मर्यादित'' ती माणसे स्वभावाने प्रेमळ, स्वच्छ विचारांची, आचारांची हे ती जाणून होती. म्हणून या अंजूच्या पत्रातील अक्षरावरून सुमा तिच्या स्वभावाची नवग्रह पत्रिका मांडत होती. त्यात तिला काहीही विसंगती जाणवली नाही आणि तिचा जीव भांड्यात पडला.

प्रविणचा १९ वा वाढदिवस. म्हणजे विशेष १८ वर्ष पूर्ण करून तो १९ व्या वर्षात, म्हणजे खऱ्या अर्थाने तारूण्यात प्रवेश करणार होता. तो खूप चांगला त्याच्या मित्रांच्या उपस्थितीत साजरा व्हावा असे सुमाला वाटत होते. आणि शक्यतो तो घरीच करावा असे तिने ठरवले होते. जेवणाचा विशेष बेतही तिने केला होता. मोठा २।। किलोच्या केकची ऑर्डर दिली होती. त्याची निमंत्रणे मित्रांना गेली होती. रात्री त्या बाबत त्या तिघांत सगळी चर्चा झाली. तेव्हा,

''आई! आपण माझ्या प्रोफेसर डॉ.अंजू याना आपल्या घरी बोलवायचे कां? माझ्या वाढदिवसाला सांग ! बोलवायचे कां? '' प्रविण.

प्रविणच्या या बोलण्याने सुमा अधिकच गोंधळात पडली. काय करावे कळेना. बोलवावे तरी अडचण नाही तर प्रविण नाराज. काही वेळ ती काहीच बोलली नाही. पण प्रविण तिच्या उत्तराची वाट पाहत होता.

सुमाच्या मनात शंकांचे काहूर उठले. संजय आणि अंजू यांची जवळीक प्रविणची त्याच्या प्रोफेसर कडील ओढ तिला अडचणीची वाटली. तरीही जे काही पुढे येईल ते आपण स्वीकारायला हवे. हे ही तिने मनात ठरवले. खूप उजवा डावा विचार करुन तिने 'हो'! म्हटले आणि प्रविणने संजयला सांगितले.

''पप्पा आईने होकार दिला आहे डॉ. अंजूला माझ्या वाढदिवशी घरी बोलवावे म्हणून !''

'' पण पप्पा त्यांचा नंबर कसा मिळणार?'' प्रविण.

''असेल माझ्या सर्वीस सेंटरमध्ये. त्यानी त्यांचे कार्ड दिले होते. तेव्हा उद्याच सकाळी आईला फोन देतो. तिनेच अंजू मॅडमना बोलवावे.'' असे तो प्रविणला म्हणाला.

''ठीक सांगतो आईला खरेतर त्याच्या मोबाईल मधे अंजूचा नंबर होता, पण जर त्याने फोन केला तर तो आगाऊपणा ठरेल. म्हणून त्याने ते टाळले. पण

प्रविण मात्र खूश झाला.

सकाळी सर्विस सेंटरला गेल्यावर संजयने सुमाला घरी फोन करून डॉ.अंजूचा फोन दिला तो सुमाने केला पण सकाळी तो बंद होता. दुपारी पुन: ४ वाजता फोन केला पण अनोळखी फोन तिने उचलला नाही. तिने पुन: संजयला फोन केला आणि डॉ. अंजू फोन उचलत नाहीत असे सांगीतले. मग मात्र संजयने अंजूला फोन केला व सांगितला सुमनचा नंबर. त्या फोन वरुन अनेक मीस कॉल आल्याचे डॉ. अंजूना दिसले, मग तिनेच सुमाला फोन केला. तेव्हा सुमाने तिला आपल्या घरी प्रविणच्या वाढदिवसाला आणि डीनरला यायचे निमंत्रण दिले. डॉ. अंजूने होकार दिला.

संध्याकाळी ६ वा. डॉ.अंजू त्यांच्या घरी आली येताना तिने प्रविणसाठी खूप पुस्तके आणि एक पुष्पगुच्छ  आणला होता. प्रविणच्या मित्राच्या आणि डॉ. अंजूच्या उपस्थितीत केक कापला गेला. प्रविणने आधाशासारखे डॉ.अंजूचे प्रझेंट उघडले. सगळीच पुस्तके त्याला आवडली. त्यात बरीचशी परदेशी मेडीकल संबंधीची होती आणि दुसऱ्या सेमीस्टरसाठी उपयोगी पडणारी होती जी केईएमच्या लायब्रेरीतही नव्हती.

'' मॅडम ! थॅक्स फॉर बुक्स !'' प्रविण.

''ओके!'' डॉ. अंजू.

प्रविण खूष झाला हेच अंजूला अधिक महत्वाचे वाटले. मग डिनर झाले. संजयचे नवे घर अंजूला खूप आवडले. थ्री बेडरूमचा तो प्लॅट होता. खूप छान मेंटेन केलेला. डीनर नंतर अंजू आपल्या घरी गेली.

आज सुमाही खूष होती. डॉ. अंजूही खूपच ओपन माईन्डेड वाटली तिला. खूप गप्पा झाल्या पण तिच्या कुटुंबाबद्दल, तिला काहीही माहिती ना तिने संजय कडून जाणून घेतली ना डॉ.अंजूकडून.

प्रविणचा हा १८वा वाढदिवस होता. खूप धामधूमीत तो साजरा झाला. संजयनेही खूप खर्च केला. सगळ्या मुलांना डीनर दिले, खूप फोटो काढले. व्हिडीओ शुटींगही झाले.

ती सीडी अनेक वेळा सुमाने लावली आणि तिने बारकाईने डॉ अंजूच्या गळ्यात मंगळसूत्र आहे कां याचे निरीक्षण केले. पण तिला त्यातून काहीही बोध झाला नाही. डॉ.अंजू डॉक्टर आहे आधुनिकतेचा तिने स्वीकार केला आहे. मंगळसूत्र असो वा नसो. असे आजच्या नव्या पिढीला वाटत नासावे. म्हणून

तोही विचार सुमाने आपल्या मनातून झटकून टाकला. पण अजून तिच्या मनातली उत्सुकता काही संपली नव्हती. पण तरीही तिची नी सुमाची झालेली ही दुसरी भेट तणाव कमी करणारी ठरली. संजयही आता अगदी खेळी मेळीने वागत आहे. संजय आणि सुमा यांच्यातला दुरावाही आता काहीसा सैल झाला होता. घरातले वातावरणही आता छान झाल्याचे सुमाला जाणवत होते.

संजयलाही हे जाणवले आणि तोही खूश होता. डॉ.अंजूशी त्याचा संपर्क चालूच होता. पण भेटीगाठीना खीळ बसली नव्हती. महिन्यातून एक दोन वेळा ती डीनरला भेटत होती. त्यांच्या एकमेकांतला दुरावा संपून अधिकच जवळीक येत होती. अनेकवेळा संजयच तिच्या घरी जात असे. हा सगळा प्रकार गेले वर्ष दीड वर्ष चालू होता पण त्याच्या घरी याचा मागमूस नव्हता. खरेतर ही वादळा पूर्वीची शांतता असावी असे सुमा आणि अंजू याना वाटत होते. अंजू अधिका अधिक संजयकडे ओढली जात होती. आणि संजयही. पण तो सुमा कडेही जूळवून घेत होता.

प्रविणचे दुसरे सेमीस्टरही पूर्ण झाले होते. त्याची अभ्यासातली प्रगतीही खूप चांगली होती. डॉ.अंजूसह सगळ्याच डॉ. प्रोफेसरांचा तो लाडका होता. खूप वाचन, अभ्यास, प्राक्टीकल. यात त्याला कमालीचा रस होता. पण तो अधिक सर्जरीकडे ओढला जातोय. ते डॉ. अंजू मुळे हे डॉ. अंजूलाही जाणवत होते. त्याने पुढे एम.एस. करावे असे सारखे तिला वाटत होते. आणि आपल्या सारखे स्पेशालीस्ट म्हणून नावारुपाला यावे. यासाठी तिही अधिका अधिक ति प्रविणकडे ओढली जात होती. आपल्या मुलासारखी ती त्याच्यावर प्रेम करीत होती. आणि त्याच्या अभ्यासात त्याला मदत करीत होती. त्या दोघांचा सतत संपर्क असायचा.

आता एम.बी.बी.एस. चे शेवटचे सेमीस्टर संपून त्याची फायनल परीक्षा जवळ आली होती. परीक्षा सुरुही झाली होती. सर्जरीचा दुसऱ्या दिवशी होता. त्याचे अनेक डाऊटस् चे त्याला निरसन करायचे होते. आणि डॉ अंजूशी संपर्क होत नव्हता तो स्कुटर घेऊन तिच्या क्लिनीकला गेला तेव्हा आताच ती घरी गेली असे त्याला समजले. पण ती घरी नव्हती. म्हणून तो अंजूच्या कॉम्पलेक्स मध्येच थांबला. रात्री १० वाजून गेले होते. त्याला घरीही परतायचे होते. आणि येवढ्यात तिची गाडी आली. ती उतरली आणि दुसऱ्या बाजूने संजय. मग प्रविण तिच्या बरोबर तिच्या घरी गेला. आणि संजय आपली गाडी घेऊन त्या

कॉम्प्लेक्समधून बाहेर गेला. त्याला संशय आला होता. मला प्रविणने पाहिले तर नसेल ? त्याच काळजीने तो ग्रासला होता. तो घरी आला तो घाबरलेल्या अवस्थेत. आता आपले प्रकरण सुमापर्यंत जाईल आणि आगडोंब होईल हे त्याने ताडले होते. घरी येताच तो आपल्या बेडरुम मधे गेला, वॉश घेतला. डॉ. अंजूबरोबर त्याने जेवण घेतले होते. तेव्हा त्याला भूक नव्हतीच.

''आपण जेवण घेणार ना. मी वाढते ! ''सुमा.

''नको मला भूक नाही, पण थोडा ज्युस दे !'' संजय

''होय !'' सुमा.

सुमाने दिलेला ज्युस घेऊन तो झोपला.

प्रविण ११ वाजून गेले तरी आला नव्हता. डॉ. अंजूने त्याच्या सगळ्या शंकांचे निरसन केले आणि तो परत घरी आला तेव्हा रात्रीचे १२ वाजले होते.

अंजूने प्रविणलाही ज्युस आणि फळे खायला दिली आणि तो निघाला.

''अरे प्रविण तू जेवतोस ना ? '' सुमा.

''नाही मॅडमनी मला फळे आणि ज्युस दिला! आता मी झोपतो. सकाळी लौकर उठायला हवे. उद्या माझा सर्जरीचा पेपर आहे.!''

''अरे ! काय झालय आज सगळ्याना, हे पण जेवले नाही, तुही,! सगळे जेवण तसेच रहाणार !'' सुमा.

मग सुमाने थोडे जेवण घेतले आणि संजयच्या बेडरुममध्ये आली. पण बेडरुम आतून लॉक होता. असे कधीही होत नाही. मग आजच असे कां व्हावे. शिवाय आज संजयने जेवणही घेतले नाही. ती मग दुसऱ्या बेडरुममध्ये जाऊन झोपली.

सकाळी प्रविण लौकर उठला आणि नाष्टा घेऊन सरळ परीक्षा हॉलमधे गेला. आज त्याचा आवडता सर्जरीचा पेपर होता. आणि अभ्यासही खूप चांगला झाला होता. डॉ. अंजूने त्याचे सगळे डाऊटस् सॉल केले होते.

आज प्रविणचा पेपर छान गेला. आज हा शेवटचा पेपर होता. परीक्षा संपली होती त्याने अंजू मॅडमला फोन करुन तिचे आभार मानले.

प्रविण हा डॉ. अंजूचा आवडता विद्यार्थी. कारण त्याची अभ्यासातली प्रगती खूपच चांगली होती. तिने दुसऱ्या दिवशी प्रविणला फोन केला.

''प्रविण ! तू संध्याकाळी दररोज ६ ते ९ माझ्या कंसल्टींग रुमला येत जा माझ्या मदतीला. तुला खूप काही शिकता येईल आणि मलाही मदत होईल.

नाहीतरी आता रिझल्टपर्यंत तुला काहीच काम नसेल, आणि मग इंटरशीप सुरु होईल एक वर्षाची ! तेव्हा तोपर्यंत तू मला मदत कर ! डॉ. अंजू.

''एस मीस ! छान मी येईन. मला खूप आनंद वाटेल आपल्या बरोबर काम करायला. खूप काही सर्जरी बद्दल शिकता येईल ! ओके मॅडम !'' प्रविण.

आणि दुसऱ्या दिवसापासून त्याचे डॉ. अंजूच्या दादरच्या कंसल्टींग रुमला जाणे सुरू झाले. प्रविणने पुढे एक चांगला निष्णात सर्जन व्हावे असे डॉ. अंजूला वाटत होते. आपल्या मुलाप्रमाणे ती प्रविणवर माया करीत होती. मुळात प्रविणही उत्तम संस्कारी मुलगा होता.

संजय परवाच्या घडलेल्या घटनेनंतर सावरलाच नव्हता. त्याला भीती वाटत होती जर तो सुमाजवळ बोलला तर? पण तसे झाले नाही. आणि आठवडाभरात त्याचा जीव भांड्यात पडला. त्याचे रुटीन चालू होते तसेच चालू होते. सध्यातरी वादळ शमले होते. येवढे खरे.

जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रविणचा फायनल एमबीबीएसचा निकाल जाहीर झाला. प्रविण डिस्टींगशनमध्ये पास झाला. आणि आठवडा भरात त्याची इंटरशीप सुरु झाली. प्रविणचा दिनक्रम पूर्वी सारखाच चालू होता. हॉस्पिटलची ड्युटी संपवून तो डॉ.अंजूच्या कन्स्टींगला जात असे. पण जेव्हा नाईट ड्यूटी असे तेव्हा ते शक्य होत नसे इंटरशीपचे वर्ष डॉक्टर क्वाटरमधेच रहावे लागे. कारण ते फार सोईचे होते केईएमच्या मागेच ते होते. त्यामुळे वेळ वाचे. डबा घरून येत असे. आणि अभ्यासही छान होई. त्या वर्षभरात तो एम.एस.साठी एन्टरन्स परीक्षेचा अभ्यास करीत होता.

त्याचे एक वर्षाचे इंटरशीप संपले एम.एस.ची एंटरंन्स एक्झाम ही झाली प्रविणला खात्री होती. आपल्याला एम.एस.ला ॲडमिशन नक्की मिळणार आहे.

त्या परीक्षेचा निकालही लागला. प्रविण महाराष्ट्रात पहिला आला. आणि त्याला एम.एस.ला ॲडमिशनही केईएममधेच मिळाले. सारे काही सुरळीत चालू होते... पण...

गेला महिनाभर सुमाची तब्बेत ठीक नव्हती. प्रविण केईएमला असण्याने आणि त्याची नेमणूक डॉ.अंजूचा राजिस्ट्रार म्हणून झाल्याने प्रविणने सुमाच्या सगळ्या टेस्ट करून घेतल्या. तिच्या पोटात आतड्याला सूज असल्याचे निदान झाले. खरेतर पोटाचे ऑपरेशन करायचे होते. पण ही सर्जरी डॉ. अंजूने करावी असे डॉ. प्रविणला वाटत होते. पण ती पार गोंधळली होती. ही सर्जरी मी न

करता बॉम्बे हॉस्पिटलच्या डॉ.नरीयानी यानी करावी असा सल्ला डॉ. अंजूने संजयला दिला. सुमाच्या सगळ्या टेस्ट झाल्या व त्यातून तिला कॅन्सर झाला असावा असा अंदाज डॉ. अंजूने केला होता. न जाणो ह्या सर्जरी दरम्यान वा नंतर सुमनचे काही बरे वाईट झाले तर ? या शंकेनेच तिने ते टाळले होते. शिवाय डॉ.नरीयानी हे डॉ. अंजूचे प्रोफेसर आणि जगप्रसिद्ध सर्जन होते. तिने स्वतःच्या गाडीतून सुमाला डॉ.नरीयानीला दाखवले सोबत संजय आणि डॉ. प्रविणही होता.

आणि पुढच्या गुरुवारी सर्जरी करण्याचे निश्चित करुन दोन दिवस अगोदर सुमाला मुंबई हॉस्पिटलमधे ॲडमीट करण्याचे नक्की झाले.

शेवटच्या क्षणापर्यंत डॉ. अंजली वा डॉ. प्रविण यानी काय निदान झाले हे सुमनला सांगितले नाही. एक छोटीशी सर्जरी आहे आणि २/३ दिवसात घरी सोडणार. येवढेच तिला प्रविणने सांगीतले होते.

सुमाला ॲडमीट करण्यात आले. स्वतः डॉ. अंजू तिच्या बरोबर दोन दिवस राहिली होति व ऑपरेशन नंतरही मीच तुमच्या सोबत असेन असे अंजूने सांगितल्याने सुमा बिनधास्त होती. पण संजयला खरी वस्तूस्थिती समजल्यावर तो खूपच टेंशनमध्ये होता. ती लवकर बरी व्हावी असे त्याला सतत वाटे. कारण गेला २२ वर्षाचा त्यांचा संसार तसा सुखाचाच होता, अंजूचे वादळ सोडले तर.

डॉ.अंजू सुमा बरोबर ऑपरेशन अगोदर रात्री थांबत होती तेव्हा सुमाला खूप बरे वाटत होते. या दोन दिवसात त्यांच्या खूप गप्पा झाल्या. पण तरीही डॉ.अंजू बद्दल तिला काहीच माहिती मिळाली नाही.

''डॉ. तुमच्या घरी कोण कोण असते ? सुमा.

''मी येथे एकटीच असते. बाकी कुटुंब पुण्यात असते !'' अंजू.

असे थातूर मातूर उत्तर देऊन तिने सुमाच्या प्रश्नाला बगल दिली. आपले लग्न झाले होते नवरा कॅन्सरने गेला. त्यानंतर तिने लग्न केले नाही. या गोष्टीचा जराही मागमूस डॉ. अंजूने  सुमाला लागून दिला नाही. पण या दोन दिवसात सुमाला अंजू खूपच चांगली आहे हे जाणवले त्या दोन दिवसात सुमाच्या मनात तिच्याबद्दल असलेले सगळे गैरसमज संपुष्टात आले. आणि डॉ. अंजू सुमाची चांगली मैत्रीण झाली.

गुरुवारी ठरल्याप्रमाणे सुमाचे ऑपरेशन झाले. तिच्या आतड्याचा मोठासा भाग कापून टाकण्यात आला. डॉ. नरीयानीनी तो बाहेर आणून डॉ. अंजू व

इतराना दाखविला. आठवड्याभरा तिला डिस्चार्ज मिळाला. नि ती घरी आली. घरी तिची सुश्रूषा करायला नर्स ठेवली होती. पण सुमाचा हट्ट होता कि निदान दिवसातून दोन वेळा डॉ.अंजूने तिला तपासावे. त्या प्रमाणे डॉ.अंजूही येऊन तिला तपासीत असे. पण तिच्या दुखण्याबद्दल एक अक्षरही तिने वा प्रविणने तिला सांगीतले नाही आणि ती आता मानसिक दृष्ट्या सावरली होती.

संजयनेही डॉ.अंजूला खोदून खोदून विचारले पण तिनेही वस्तुस्थिती टाळली. तिच्या या टाळण्याचा अर्थ संजयला समजत नव्हता.

''डॉ. नरीयानीच सांगतिल!'' अंजू.

असे सांगून तिने ती वेळ टाळली. पण येवढे मात्र म्हणाली तुम्ही सुमनताईंना काहीही सांगायचे नाही, हे ही तिने संजयला बजावले.

आठवडा भराने डॉ. नरीयानी यांच्या कन्स्लटींगला सुमाला घेऊन डॉ.अंजू, प्रविण आणि संजय गेले. त्यानी तिला तपासले. ऑपरेशनची जागा सूकली होती.

''आता ती ठीक आहे. काळजी घ्या. आणि आहाराकडे मात्र लक्ष द्या. तिला शक्यतो ज्युस, पेज द्या म्हणजे ती लवकर बरी होईल !'' डॉ. नरीयानी.

''डॉ. पण तिला काय आजार आहे ते तरी सांगा!'' संजय

''ते तुम्हाला डॉ.अंजली सांगेल!'' म्हणत त्यानी दुसऱ्या पेशंटला तपासण्यास सुरुवात केली.

संजयला खूपच टेंशन आले होते. घरी परत येताना तोच आपली गाडी चालवीत होता. बाजूला डॉ. अंजली बसली होती आणि मागच्या सीटवर प्रविण आणि सुमा.

एकदाचे ते त्यांच्या कॉम्प्लेक्समध्ये आले. प्रविण आणि सुमा उतरताच संजय डॉ. अजूला घरी सोडायला तिच्या कॉम्प्लेक्समध्ये आला व घरी गेला.

''आता तरी सांग, अंजू, सुमाला काय झाले आहे.!'' संजय

आणि हे ऐकताच अंजूने हंबरडा फोडला आणि ती त्याच्या कुशीत विसावली. बराच वेळ ती काहीच बोलली नाही.

''तसे सांगण्यासारखे काही नाही !'' अंजू.

तरीही संजयचा संभ्रम दूर झाला नव्हता.

''आता तिची चांगली काळजी घ्या ती महिन्या-दोन महिन्यात पूर्ण बरी होईल. पुढचे देवाच्या हाती.!'' अंजू

''देवाच्या हाती।'' संजय

'' हो ! मी खरे तेच सांगते आहे. जेवढी वर्षे जातील तेवढी तुम्ही तिला सुखात ठेवा, प्रविण आहेच तो काळजी घेईल. अधून मधून मी ही येत जाईन !'' अंजू.

पडल्या चेहऱ्याने त्याने अंजूचे घर सोडले, पण घरी येताना त्याचे मन संशयीत झाले. डॉ. अंजूने मला सांगायचे कां टाळले. आणि तिच्या रडण्याचा अर्थ मी काय लावावा ?

संजय घरी आला तो अगदी पडल्या चेहऱ्याने. पण सुमाला काहीही संशय येऊ नये म्हणून चेहऱ्यावर हास्य घेऊनच त्याने बेडरुम मधे प्रवेश केला.

''कशी आहेस सुमी !''

''ठीक ! आता मला बरे वाटते आहे. ही नर्स मला औषधे देत आहे. आता मी ज्युस घेतला आहे. तुम्ही जेवून घ्या. प्रविणला आज नाईट आहे. तो थोड्या वेळा पूर्वीच निघून गेला !'' सुमा.

आज संजयला भूक तरी कशी लागणार. अनेक प्रश्न पुढे उभे होते. पण त्यातल्या एकाचेही उत्तर मिळत नव्हते. डॉ.नरीयानी, डॉ. अंजू आणि प्रविणही वस्तुस्थिती काय? याची मला माहिती देत नाहीत म्हणजे काहीतरी सिरीयस असणार, येवढा कयास त्याने बांधला. त्यानंतर दोन दिवस तो तिच्या जवळच बसून होता. डॉ. अंजू आली आणि तपासून निघून गेली. पण समोर बसलेल्या संजय जवळ अक्षरही बोलली नाही.

म्हणजे? सुमाला काहीतरी मोठे दुखणे आहे आणि ती बरी होईल की नाही ? याच शंकेने त्याला ग्रासले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रविण घरी आला तेव्हा ७ वाजले होते. आणि तो प्रथम सुमाच्या बेडरुम मधे आला. आईची चौकशी केली व आपल्या बेडरुम मधे जाऊन झोपला.

संजय आपल्या सर्विस सेंटरला जायला तयार होता. आता या गोष्टीचा छडा त्याच्या कडूनच लावायचा म्हणून त्याने प्रविणला हाक मारली.

''प्रविण ! जरा उठ !''

''काय ! पप्पा...!''

''अरे सुमाच्या आजारा बद्दल मला कोणीही काहीच कां सांगायला तयार नाही !'' संजू.

''ती आता बरी झाली आहे. हिंडू फिरु लागेल सगळी कामे सांभाळील घरातली. तुम्ही निश्चींत असा आम्ही सगळे आहोतच ना तिची काळजी घ्यायला. शिवाय डॉ.अंजली तिची काळजी घेत आहेस ना...!'' प्रविण.

पुढे काहीच न ऐकता संजय निघून गेला. पण त्याच्या मनातल्या शंकासुर काही गप्प रहायला तयार नव्हता.

आणि महिन्या भरातच सुमा बरी झाली. हिंडू फिरु लागली. तिची तब्बेत आता ठीक झाली होती पण थोडा अशक्तपणा होता.

एक दिवस रविवारी अंजू सुमीला चेक करण्यास आली....

''सुमाताई! आता तुम्ही पूर्ण बऱ्या झाल्या आहात आता काश्मीरची टूर करून या बर! मी संजय रावाना सांगते. आताचा सिझनही चांगला आहे. काश्मीरात फारशी थंडी नाही. मानवेल तुम्हाला तिथले वातावरण आता निघायचे बघा ! जाताना विमानाने जा येतानाही विमानाने म्हणजे प्रवासाचा त्रास जाणवणार नाही आणि त्या आल्हादकारक वातावरणात सौंदर्याचा आस्वाद घेता येईल ! अंजू.

''तुम्ही पाहिलेत का काश्मीर ?''

''नाही! खरेतर मला क्षणाची उसंत नाही डॉ. हे प्रोफेशन लोकांसाठी आम्ही अर्पण केले आहे ! केव्हा तरी जाऊ ! पण तुम्ही निघायची तयारी करा. तुम्ही केसरी टूरने जा पण त्यांची दगदग फार तेव्हा आपल्याला झेपेल तेवढाच प्रवास करा. तेथील मुगल गार्डन पहा. मग पेहेलगावला जा. खिलन मार्गला जा बर्फात खेळा. आनंद लुटता येईल तेवढा लुटा. ताई मी येते !'' अंजू.

आणि ती मागे न फिरता तशीच निघून गेली. पण तिच्या डोळ्यात उभे राहिलेले अश्रू तिला काही लपवता आले नाहीत. ती लिफ्टला उभी होती येवढ्यात त्याच लिफ्टने संजय वर आला. त्याच्याशी न बोलता ती लिफ्टमधे घुसली आणि डोळे पुसीत तिने गाडी चालू केली आणि घर गाठले.

डॉ.अंजूला माहिती होते सुमा ३/४ महिन्याचीच सोबती आहे. तिने या सुंदर जगाचा आनंद आता लुटता येईल तेवढा लुटायला हवा आणि सुखाने हे जग सोडायला हवे. असे राहून राहून तिला वाटत होते. अंजू घरी आली पण ती पार खचली होती. सुमाच्या जाण्याचा एक एक दिवस जवळ येत आहे. हे ती जाणून होती. म्हणून तिने शेवटपर्यंत ना सुमाला वा संजयला या गोष्टीचा थांगपत्ता लागू दिला नाही. पण ओठावर येणारे सत्य तिने आवंढ्या सारखे

गिळून टाकले.

केईएममधे डॉ. अंजूचा रजिस्ट्रार म्हणून डॉ. प्रविणची नेमणूक झाली होती. त्याच्या एम.एस.चे ते दुसरे वर्ष होते. एक दिवस दुपारी लंच घेताना सुमाच्या तब्बेतीबद्दल अंजूने प्रविणजवळ विषय छेडला.

''तुला काय वाटते आई बद्दल !'' अंजू.

तो काहीच बोलात नाही हे पाहून ती उठली आणि तिने त्याच्या खांद्यावर हात ठेवला...

काय समजायचे ते प्रविण समजलाच होता. त्याचे डोळे पाणावले आणि आपले डोके दोन हातात धरुन तो रडू लागला.

बराच वेळ अंजू त्याच्या मागे उभी होती आणि तिने त्याला थोपटीत...

''रडणे थांबव! तू डॉक्टर आहेस. सारे तू जाणतोस. हे सत्य आपण स्वीकारले पाहिजे. तू असे कर संजय आणि सुमाची काश्मीरला जायची तयारी कर तेथे तिला बरे वाटेल. एक, एक दिवस आनंदात जायला हवा. जीवनाचा सगळा आनंद तिने लुटायला हवा!'' अंजू

मग दोनच दिवसात संजय आणि सुमाची काश्मीर टूरला जाण्याची तयारी झाली. डॉ. अंजू, डॉ. प्रविण त्यांना ऐअरपोर्टला सोडायला आले होते. सुमा आज खूपच आनंदात होती. पण थोडी फार दुःखाची लकेर संजयच्या चेहऱ्यावर होती. पण त्यानेही ती सुमाला जाणवू दिली नाही.

''संजय तुम्ही दररोज रात्री मला फोन करायचा आणि सुमा ताईच्या तब्बेतीची माहिती द्यायची !'' अंजू.

''नक्की !'' संजू

औषधात काही बदल हवे तर मी सूचवीन. तुम्ही मजेत टूर पुरी करा !'' अंजू.

आज मात्र प्रविणला आपले दुःख आवरणे कठीण झाले. त्याच्या डोळ्यातून अश्रूंचे ओहळ वहात होते. आपली आई आता फार थोड्या दिवसाची सोबती आहे. हे त्याने जाणले होते. अंजूने त्याला खूप समजावले. पण त्याच्या डोळ्यातल्या अश्रू धारा त्याला आवरता येत नव्हत्या.

''प्रविण ! तू असे कर ! आज तू माझ्याकडे रहा. नाही तरी घरी कोण नाही. तुला एकट्याला हा एकांत सहन करणे जमणार नाही. तेव्हा आज माझ्याकडेच रहा. माझे घर मोठे आहे ! चिंता नको !'' अंजू.

आणि ती दोघे एअरपोर्टवरुन सरळ अंजूच्या प्लॅटवर आले. तिचे ही घर ३ बीएचकेचे होते. ती येथे एकटीच रहाते आहे. हे त्याला आज समजले. पण तिच्या जीवनाबद्दल जराही प्रविणला कल्पना नव्हती. घरी येताच अंजूने छान खिचडी केली आणि दोघांचे जेवण झाले. मग बरांच वेळ ती गप्पा मारीत बसले. तिने प्रविणला आपल्या सगळ्या भविष्यातील योजनांची कल्पना दिली. एम.एस. झाल्यावर प्रविणने तिचे दादरचे क्लिनिक सांभाळायचे आहे. आणि अंजूने कॉलेज मधली नोकरी. या वर्षी ती बहुतेक केईएम ची डीन होईल अशी आशा तिला होती. म्युनिसीपल कमिशनर देशपांडे यानी तशी शिफारस आरोग्य मंत्र्याना केली आहे हे ही तिने प्रविणला सांगीतले. रात्री ११ वाजता संजयचा श्रीनगरला पोलचल्याचा फोन आला आणि आता ते गुलमार्ग या हॉटेलात थांबणार आहेत हे ही समजले.

आज प्रविणच्या मनावरचे ओझे पूर्ण पणे उतरले होते. तो सकाळी अंजू बरोबर केईएमला गेला. आपण आज अंजू मॅडमचे घर पाहिले पण त्यांच्या व्यतिरिक्त तेथे कोणच कसे रहात नाही? या घरात इतर माणसे रहात असावीत अशा काहीही खूणा त्याला दिसल्या नाहीत कां ? या प्रश्नाचे उत्तर तो शोधण्याचा प्रयत्न करीत होता. पण काहीच मागमूस लागत नव्हता. डॉ. अंजू यांच्याबद्दल अधिक जाणून घेण्याची इच्छा त्याला झाली, पण त्याने ती टाळली. आणि तो तसाच आपल्या घरी आला.

आता प्रविण एकटाच घरी होता. आई बाबा गेल्याने सगळे घर सुने सुने होते. आज त्याला रजा होती म्हणून तो पुन: घरी येऊन बेडरुममध्ये पडून राहिला पण झोप काही येईना. मग किचनमधे येऊन त्याने कॉफी केली. आज त्याची कॉफी करण्याची पहिलीच वेळ होती. कोठे काय ठेवले आहे, हे त्याला समजत नव्हते. शोधाशोध केल्यावर साखर, कॉफी सापडली. त्याने गरम गरम कॉफी केली आणि बाबांना फोन केला. तेव्हा ते दोघे मुगल गार्डनला जायला निघाले होते. आईची तब्बेत ठीक आहे हे जाणून त्यालाही आनंद झाला. पण आई थोड्याच दिवसाची सोबतीण आहे याची आठवण होऊन पुन: त्याच्या डोळ्यात अश्रूंचा डोह झाला आणि गालावरुन ओहळ सुरु झाले. त्याने ते पुसण्याचा प्रयत्न केला नाही. डॉ. अंजूना फोन करून प्रविणने ती बातमी दिली.

आज रविवार होता आणि शिवाय रजा. त्याने आपली सगळी कामे आटोपली. आणि गाणी ऐकत तो बसला किती वेळ हे त्यालाही समजले नाही.

आता आपण पुन: कधीही डोळ्यात अश्रू आणायचे नाहीत हे प्रविणने पक्के ठरवले होते. वास्तव आपण स्वीकारले पाहीजे. आयुष्यात असे अनेक प्रसंग येतील . मी डॉक्टर आहे हे विसरुन चालणार नाही. मनाचा दगड झाल्या शिवाय पुढचे आयुष्य जगता येणार नाही. हॉस्पिटलमधे अनेकदा पेशंट सिरीयस होतात. त्यांचा या जगातला प्रवास संपतो. हे रहाटगाडगे चालतच राहणार आहे. दररोज घटना घडतच राहतात त्याला सामोरे जावे लागते. आता आपण लहान नाही हे त्याने समजून येणाऱ्या सगळ्या गोष्टींची तयारी केली. आणि आता आई बाबा कधी येतात याची वाट तो पाहत बसला.

बरोबर १० वाजता डॉ. अंजू आली. तिचे येणे त्याला अपेक्षित नव्हते. तिच्या घरून येताना प्रविणने फक्त मी येतो येवढेच बोलून तो निघाला होता. प्रविणच्या मनाची अवस्था काय झाली असेल हे अंजूने ओळखले होते. त्याला एकटा सोडणे ठीक नाही. शेवटी ते एक मूल आहे हे ती जाणून होती. त्याच्या मनाची अवस्था अंजूने काल पाहिली होती. कां कोण जाणे पण प्रविण बद्दल खूपच प्रेमाचा पाझर तिच्या मनात निर्माण झाला होता. त्याने सकाळी चहा कॉफीही घेतली नाही. रात्री त्याला झोप लागली कां? की रात्र जागून काढली त्याने. या सगळ्या प्रश्नानी डॉ. अंजू अस्वस्थ होती.

घरी येताच तिने प्रविणला जवळ घेतला. त्याच्या डोक्यावरून हात फिरवत त्याला मी आहे ना ! असा विश्वास त्याच्या मनात जागवला. प्रविणसाठी नाष्ठा तयार केला. प्रविणलाही डॉ. अंजूचे आजचे बोलणे नवीनच वाटत होते. अगदी आपली आई वागते तशी. दोघांनी बरोबर नाष्टा केला. मग त्याला आंघोळीला पिटाळला. तिच्या या वागण्याचे रहस्य प्रविणला अजून उलगडता आले नव्हते.

''आज मी तुझ्यासाठी काय करू? शाकाहारी चालेल ना तुला? मला नॉनव्हेज नाही करता येत. पण पुढे सवय होईल !'' अंजू

आज डॉ. अंजू आपल्या घरात आईसारखी वागते आहे. माझी काळजी घेत आहे. याची जाणीव प्रविणला झाली. आणि त्याला तिचा खूप आदर वाटला. परकेपणा पार दूर झाला. मग मात्र ती आपली काळजी घेते आहे हे ही त्याला जाणवले. पण तरी काल तिच्या घरी ती एकटी का राहते या प्रश्नाची उत्तरे त्याला सापडली नव्हती. आणि ती आपण जाणून घेण्याची गरज नाही असे त्याला वाटले. ती आता आपल्या कुटुंबाचा एक भाग झाली आहे. आपल्या कुटुंबाच्या सुख, दु:खाचा एक भाग झाली आहे हे तिच्या वागण्यातून त्याला जाणवू

लागली होती.

दुपारी जेवणासाठी डॉ. अंजूने डाळ, भात, भाजी आणि चपाती केले होते. मग त्या दोघांनी जेवण केले. सगळी आवरा आवर केली आणि.

''प्रविण ! आता मी निघते. माझ्या घरी! संध्याकाळी संजयचा फोन येईल मला आणि तुलाही. आजच्या प्रवासाचा ताण आई कितपत सहन करते हे ही कळेल !''.

''मॅडम! तुम्ही जाऊ नका. मला येथे एकट्याला सोडून. संध्याकाळी जा ! पण आता थांबा. मला आईची खूप काळजी वाटते आहे! तेव्हा तुम्ही येथेच थांबा ! मला एकट्याला राहणे अवघड वाटते आहे , तशी सवयही नाही !'' प्रविण.

''ठीक! थांबते. प्रविण तुझा एमएसचा रिझल्ट आठवडाभरात येईल. तुझ्या मनात पुढे काय योजना आहे ? अंजू.

''मॅडम मला हार्ट सर्जरीमध्ये स्पेशलायझेशन करावे असे वाटते आहे. मी डॉ. मांडके यांच्या अंडर काम करू इच्छीतो. शिवाय आपल्या केईएम हॉस्पिटलमध्ये डॉ.पात्रावाला यांच्या अंडरही मी त्यांचा रजिस्ट्रार म्हणून काम करू इच्छितो. मला यात मास्टरी करायची आहे. एक अव्वल सर्जन म्हणून नाव कमवायचे आहे. त्यासाठी कितीही कष्ट करण्याची माझी तयारी आहे!'' प्रविण.

''छान ! पण तू प्रथम लंडनला जाऊन एफ.आर.सी.एस. करावी अशी माझी इच्छा आहे. कारण जग झपाट्याने बदलते आहे. बाहेरच्या जगाचा अनुभव घेणे ही आजच्या काळाची गरज आहे. तू तेथे जाऊन प्रथम एफ.आर.सी.एस.करावे व मग येथे आलास तर तुझे हॉस्पिटलध्ये वजन वाढेल. असे मला वाटते. त्यासाठी मी माझ्या ओळखीच्या लंडन मधील डॉ. रपावले यांच्या जवळ पूर्वीच बोलले आहे. तू मनाची तयारी कर. तरच तुला डॉ.मांडकेसारखे यश मिळवता येईल. येथला कोणीही सिनीयर सर्जन तुला सोबत घेऊन काम करण्यास तयार होतील. २/३ वर्षात तू एफ.आर.सी.एस. करुन परत येशील. माझी इच्छा होती हे सारे करण्याची पण मी येथेच अडकून पडले. तो माझ्या नशिबाचा दोष . दुसरे काही नाही !'' अंजू.

आता मात्र डॉ. अंजूच्या बोलण्यातून त्यालाही वेगळी दिशा मिळाली होती. आणि त्यांच्याशी जवळीकही. धीर चेपला होता. परके पणा पार दूर झाला होता.

''मॅडम ! माझ्या मनात तुमच्या बद्दलचे कुतुहल मला अस्वस्थ करीत आहे. एक प्रश्न विचारू कां?

''विचार ना !'' अंजू

''अगदी पर्सनल असला तरी ?'' प्रविण.

''हो काही आडपडदा न ठेवता विचार. तू काही मला परका नाहीस !'' अंजू.

''काल मी तुमच्या घरी राहिलो. तुम्ही तेथे एकट्याच कां राहता? दुसरे कुटुंबातले कोणीच कसे नाही ?'' प्रविण

''सांगते ! मी माझ्या घरी एकटीच असते. माझे लग्न झाले आणि दोनच महिन्यात माझ्या मिस्टरांचे निधन झाले. लग्नापूर्वी त्यांना कॅन्सर (येडस) झाला होता. हे त्यांनी मला सांगितले नव्हते. हे समजताच मी त्यांच्यापासून दूर झाले. आणि एकटेच राहण्याचा निर्णय घेतला. आमचा एक दिवसाचाही संसार झाला नाही. त्या लोकांनी मला फसवले त्याची मनस्वी चीड माझ्या मनात आजही आहे. हा फ्लॅट माझ्या वडिलांचा. आता आई वडील, भावंडे कोणीही नाहीत. लग्नापूर्वी मी एमबीबीएस झाले होते. मग एम.एस. केले केईएममधे. त्यावेळी सर्जिकल लेक्चररची पोस्ट खाली होती. अनायसे मिळाली. खूप काही आयुष्यात करावे, शिकावे परदेशात जावे. पण ते शक्य झाले नाही. आणि मी येथेच अडकून पडले. पण तू पुढे शिक. मी तुझी सगळी जबाबदारी घेते. नाहीतरी तुमच्या शिवाय माझे जीवाभावाचे कोणी नाही मी तुझा सगळा खर्च करीन. तू चिंता करु नको. तू मला माझ्या मुलासारखा आहेस !'' अंजू.

आणि तिचे डोळे पाणावले. प्रविणच्याही ते ध्यानात आले. तो उठला आणि त्याने डॉ. अंजूला मीठी मारली.

''मी तुम्हाला हे सगळे विचारले ही माझी चूक तर नव्हे नां? प्रविण.

''नाही, नाही! हे केव्हातरी होणे जरुर होते. तुझे वडील माझे शाळेतले क्लासमेट. तेव्हा आमची फारशी ओळख नव्हती. पण त्याने कष्टाने सारे विश्व निर्माण केले हे पहिल्या भेटीतच मला समजले. जेव्हा मी माझी गाडी सर्विसींगला आणली. त्यानी हे सारे कष्टाने उभे केले. याचेच मला अप्रुप वाटते. आता तुमचे कुटुंब माझेच आहे हे मी मानते!'' अंजू.

प्रविणलाही आनंद झाला. आता सारा संभ्रम पूर्णपणे निवळला होता. संध्याकाळचे पाच वाजले होते. या दरम्यानच टुरचे लोक हॉटेलात येतात. आज

पेहेलगाव, खिलनमार्ग येथे त्यांची टूर जाणार होती. आणि संजयचा फोन आला. सुमा आज थोडी थकली आहे. उद्या आम्ही ब्रेक घेणार आहोत. हिमालय घाटीला जाण्याचा विचार नाही हे संजयने सांगितले सुमा खूष होती. ती प्रविण आणि अंजू यांच्याजवळ अगदी मन मोकळे पणे बोलली. आज हॉटेलला आल्यावर तिला एक उलटी झाल्याचे अंजूला सांगताच तिचा जीव घाबरा झाला. पूर्ण मुडच निघून गेला. कारण ही धोक्याची घंटा आहे हे ती जाणत होती.

''संजय तुम्ही उद्या सकाळी मला फोन करा. पण रात्री काही अडचण आली पुनः उलटी झाली तर कधीही फोन करा. सकाळपर्यंत थांबू नका !'' अंजू

रात्री संजयचा फोन आला नाही. पण मग सकाळीच अंजूने संजयला फोन केला.

''आता कशा आहेत सुमाताई ! '' अंजू

''ठीक आहे, पण अशक्तपणा आहे. आज आम्ही ब्रेक घेणार आहोत. आजचा टूरचा पल्ला खूपच लांबचा आणि खडतर आहे. तेव्हा आम्ही हॉटेललाच थांबणार आहोत !'' संजय.

''ठीक ! तुम्ही एक करा जर सुमाताईना आज एखादी जरी उलटी झालीना तर मात्र न विसरता फोन करा!'' अंजू.

गेले दोन दिवस अंजूने संजयच्या घरीच राहण्याचा विचार केला. कारण प्रविणही एकटाच होता. सुमाचे काहीही होऊ शकते आणि हा मुलगा तो धक्का पचवू शकणार नाही. तो हळवा आहे. आणि पूर्वीच आईच्या आजरामुळे तो अस्वस्थ होता.

अंजूने तिच्या एका पासपोर्ट एजंटला फोन करुन प्रविणचा पासपोर्ट बनवायचा आहे हे सांगितले. तो रात्री ८ वा. आला. सगळे डॉक्युमेंटस् व फॉर्म भरुन तो गेला. आठवडा भरात तुम्हाला पासपोर्ट ऑफिस मधून फोन येईल. तुम्हाला जावे लागेल वरळी ऑफिसला. पण जर अर्जंट पासपोर्ट हवा असेल तर २५०० रु. भरावे लागतील व पोलीस वेरीफीकेशनशिवाय पासपोर्ट घरी येईल. असे त्याने सागितले.

सुमाच्या तब्बेतीची काही अडचण असल्यास प्रविणही अडकेल. म्हणून त्यानी अर्जंट पासपोर्ट चा पर्याय निवडला. आता दोन दिवसात पासपोर्ट येईल याची खात्री होती.

तो दिवस हॉटेलात आराम केल्याने सुमाला फारसा त्रास झाला नाही असा

फोन संजयने अंजूला केला.

दुसऱ्या दिवशी टूरवाल्याने मोकळा दिवस ठेवला होता. खरेदीसाठी. आज सकाळी सुमाची तब्बेत बरी होती त्यानी मार्केटला खरेदीसाठी जाण्याचे ठरवले व सकाळचा नाष्ठा घेतल्यावर सगळे टूरीस्ट श्रीनगरच्या मार्केटमधे गेले.

तिथल्या शाली, स्कार्प, लाकडी होड्या, पाहून सुमाचे मन त्या सगळ्या वस्तू घ्याव्यात यात गुंतले. त्यानी खूप खरेदी केली. आणि स्टूडीओत जाऊन छान, छान फोटो काढले व ते इंस्टंट अर्धा तासात मिळाले. दुपारी २ पूर्वी सगळे टूरीस्ट परत आले. आज सुमी आणि संजयने बाहेर धाब्यावरच राजमाची भाजी आणि रोटी खाण्याचे ठरवले व जेवूनच ते ३ वाजता हॉटेल वर आले. अजून दोन दिवसाची टूर बाकी होती.

सुमाने प्रविण, अंजू साठीही खूप खरेदी केली होती. संजयने त्या सर्व नीट पॅक करुन टाकल्या रात्रीच. त्या रात्री मात्र बाहेर चालण्याचा ताण पडल्याने सुमाला खूपच थकवा वाटत होता. रात्री झोपण्यापूर्वी संजयने तिला औषधे अंजूच्या सांगण्यावरून दिली शिवाय अर्धी झोपेची गोळीही दिली. जेणेकरुन छान झोप लागेल आणि सकाळी ती फ्रेश असेल.

दुसऱ्या दिवशी टूर मॅनेजरने श्रीनगर मधले पुरातन शंकर मंदिर व पुनः मुगल गार्डन तसेच रात्री शिकाऱ्यामधे रहायचे असा कार्यक्रम ठरवला होता.

सुमन, संजय यानी भगवान शंकर मंदिरात जाऊन अभिषेक केला व प्रसाद घेतला. सुमनने भगवान शंकरांची एक संगमरवरी पिंड डॉ.अंजूसाठी घेतली होती. या तिच्या शिकपणात तिचा सुमाला खूप आधार वाटला होता. ती आपली काळजी बहिणी सारखी घेत आहे. हे तिने जाणले होते ती आता सुमाची जीवाभावाची मैत्रीण झाली होती.

त्यानी मुगल गार्डनला जाण्याचा बेत रद्द केला कारण तिथला फिरण्याचा त्रास, चढ-उतार सुमाला सहन होणार नाही हे संजयने जाणले होते. मग ती हॉटेल वर परत आली. आज दाल लेक मधे शिकाऱ्यात रात्रीची वस्ती असा कार्यक्रम होता व रात्री खास काश्मीरी पद्यतीचे जेवण, सुमाने ते जेवण घेण्याचे टाळले. फक्त लस्सी घेतली. पण संजयने ते रुचकर जेवण घेतले. त्यातला एक घास त्याने आपल्या हाताने सुमाला भरवला, पण थोड्याच वेळात तिने उलटी केली. संजय घाबरला जवळ होती ती औषधे त्याने सुमाला दिली. तिला थोडा आराम पडला. सुमाही फ्रेश झाली होती. रात्रीच्या दाल लेक मधल्या मंद

प्रकाशात आणि चांदण्या रात्री चारमिनारला एक चक्कर मारुन शिकारा श्रीनगरच्या किनाऱ्याला पार्क केला. तशीच काही अडचण निर्माण झाली तर झटपट हॉटेलपर्यंतचा प्रवास जलद व्हावा. पण रात्र छान गेली. टूरचा आनंद खऱ्या अर्थाने त्या दोघानी लुटला.

सकाळी ते हॉटेलवर आले, दुपारपर्यंत सुमाची तब्येत ठीक होती. पण दुपारी ३.३० वाजता लागोपाठ दोन उलट्या झाल्या. शिवाय सकाळी मोशनही ठीक झाले नाही. तिला खूपच थकवा आला होता. संजयही पुरता गोंधळून गेला होता. आता आपण परक्या ठिकाणी आहोत. अजून दोन दिवसाची टूर आहे. डॉ. अंजूने सांगितल्याप्रमाणे संजयने तिला फोन केला. त्यावेळी ती व प्रविण त्यांच्याच घरीत होते.

"डॉ. सुमाला आता लागोपाठ दोन उलट्या झाल्या आहेत. मोशनही ठीक झाले नाही !" संजय.

-------

अंजूने प्रविणला हाक मारली. तो बेडरुममध्ये होता.

"हे पहा आता ३.३० वाजता आईला दोन उलट्या झाल्या आहेत. आणि मोशनही ब्लॅक झाले आहे. परिस्थिती तशी ठीक नाही"! अंजू

"मग काय करावे त्यांनी ?" प्रविण

"मला वाटते दोन दिवस परतण्याचे बाकी आहेत. आपण केईएममधे एक बेड बुक करून ठेऊ कारण बॉम्बे हॉस्पिटलला जाणे येणे सोईचे नाही. डॉ.नरियानींची अपॉईटमेंट घेऊ. त्यांचा मंगळवार हा केईएममध्ये विसीटींग दिवस आहे. मी त्यांच्या जवळ बोलते. ते तपासतील तिला. ते सांगितल तसे करू!" अंजू.

"ओके, ठीक, पण दोन दिवस काढण्यापेक्षा उद्याच्या फर्स्ट फ्लाईटने जर मुंबईला येऊ शकतील. उपचार ही फास्ट होईल! कसे !" प्रविण.

"ठीक आज तुझी नाईट आहे. मीही माझ्या घरी जाते संजयला मी तातडीने सुमाला घेऊन यायला सांगते! तू बेड बुक कर!" अंजू.

आणि अंजूने संजयला तसा फोन केला. आणि प्रविण व अंजू दोघेही एअरपोर्टला गेली. सकाळी १०.३० वा फ्लाईट लँड झाले. प्रविणने सकाळीच एक ॲम्बुलन्स बुक केली होती, तिच्यातून सुमनला डायरेक्ट केईएमला नेऊन ॲडमीट करावे असे ठरले, प्रविण व संजू दोघेहीॲम्बुलन्समधून केईएमला गेले.

अंजू आपली गाडी घेऊन १/२ तासात केईएमला पोहोचली.

तत्पूर्वी सुमनला ॲडमीट केले, प्रविण बरोबर होताच. त्याने सगळी व्यवस्था केली. सुमनला डॉ. नरीयानी यांच्या अंडर केईएममध्ये ॲडमीट केले आणि तो वार्ड डॉ. अंजूचा होता सर्जीकलचा. शिवाय प्रविण तिचा रजिस्ट्रार.

डॉ. अंजूने सुमनला तपासले. एक्स-रे काढला. मोशन होण्यासाठी ईनिमा दिला व क्रिमॅटींग हे औषध दिले. सुमाची ॲसीडीटीही कमी झाली होती. मात्र सुमाचा वाढलेला बीपी काही कमी होत नव्हता. पण एक तासानंतर तो उतरला. तोपर्यंत डॉ. अंजू तिच्या रुममध्येंच होती.

'' खरचं! देवाची कृपा म्हणून तुमची भेट झाली. तुम्ही माझी किती काळजी घेत आहात. आजचा दिवस तूम्ही माझ्याजवळ रहा. मी तूम्हाला त्रास देऊ इच्छीत नाही, पण आज मला अगदी अस्वस्थ वाटते आहे ! तुम्ही थांबाल ना?'' सुमा.

''हो! नक्की मी प्रविण दोघेही थांबू. तुम्ही आता योग्य ठिकाणी आहात. डॉ.नरीयानी ६ वा. येतील तेव्हा पूढचे ठरवू !'' अंजू.

संध्याकाळी ६।। वा. डॉ. नरीयानी आले तोपर्यंत एक्स-रे, सीटी स्कॅनचे रिपोर्ट आले होते. प्रॉब्लेम सिरीयस नाही. पण जर परत परत उलट्या झाल्या तर पेशंट डी-हायड्रेड होऊ शकतो तेव्हा पेशंटला जपा असे त्यांनी डॉ. अंजूला सांगितले.

डॉ. अंजू ! तुम्ही अनुभवी आहात, तूम्ही या पेशंटची काळजी घ्याल यात शंका नाही. रात्री काही अडचण असल्यांस मला फोन करा. ओटी बुक करून ठेवा. कदाचित मायनर सर्जरी करावी लागेल. !'' डॉ. नरीयानी.

प्रविण आणि अंजूसाठी संजयने बाहेरून जेवण मागविले. तो स्वतः काहीतरी खाऊन आला. व पार्सल घेऊन तो आला.

''संजय आता तुम्ही घरी जा! आम्ही दोघे येथे आहोत. केस तशी सेमी अवस्थेत आहे. ठीक होईल ! आपण एकमेकांच्या संपर्कात राहू ! तुम्ही निघा. तुम्ही ती कडून आणलेले सगळे सामान माझ्या गाडीत आहे. तेव्हा ती गाडीच घेऊन तुम्ही घरी जा! सकाळी मात्र लौकर या !'' अंजू.

''बरं, मी निघतो. तुम्ही काळजी घ्या ! संजय काल संध्याकाळी सुमाच्या बाबत जेव्हा फोन आला. प्रविणला रात्रभर झोप लागली नाही. तिला भेटेपर्यंत एका मुलाची अवस्था होते तशी प्रविणची अवस्था झाली होती. आता आपली

आई थोड्या दिवसांची सोबती आहे हे त्याने जाणले होते. तिने आता बरे होऊन घरी यावे असे त्याला वाटत होते.

त्यारात्री सुमाला चांगली झोप लागली. प्रविण आणि अंजू आळीपाळीने आराम करीत सुमावर लक्ष ठेऊन होते. सकाळी अंजूने डॉ. नरीयानीना पेशंट बद्दल सविस्तर सांगितले व आता ती ठीक आहे असेही सांगितले. आपण विसीटला याल तेव्हा पुढचे ठरवू असे तीने डॉ. नरीयानी यांना सांगितले. डॉ. नरीयानी दुपारी येणार होते तोवर त्या दोघांनी आळीपाळीने घरी जाऊन यायचे ठरवले. संजय सकाळीच आला. मग अंजूची गाडी घेऊन अंजू व प्रविण घरी गेले.

प्रविणला त्याच्या घरी सोडून अंजू आपल्या वडाळ्याच्या घरी गेली. गेल्या ४ दिवसात तिला घरी येणे जमले नव्हते. मग दुपारी १२.३० वाजता ती हॉस्पीटलला आली येताना तिने प्रविणला पिकअप केले.

डॉ. नरीयानी आल्यावर त्या तिघांमध्ये सुमाच्या केस बाबत चर्चा झाली, एक मायनर सर्जरी करावी असे डॉ. नरीयानी म्हणाले. पण पेशंट तयार असेल तरच. अजून पेशंटची प्रकृती ठीक नाही ! डॉ. नरीयानी.

जेव्हा सुमनला डॉ. अंजू ने विचारले तर ती म्हणाली, ''मला येथून माझ्या घरी घेऊन चला. मी काय औषधे द्यायची ती घरीच द्या ! मला या वातावरणात ठेऊ नका ! मला माझ्या घरी घेऊन चला!'' सुमा.

सकाळी डिस्चार्ज घेऊन ते सर्व संजयच्या घरी आले. आणि घरी येताच सुमनला खूप आनंद झाला. तिने डॉ. अंजूला बोलावले आपल्या पर्समधील भगवान शंकरांची पिंडी दिली आणि म्हणाली...

''याची साधना कर! तुझे जीवन सुखी होईल ! सारे काही मनासारखे होईल! '' सुमा.

मग तिने तिच्यासाठी घेतलेली खास अशी 'पश्मीनी' शाल व एक स्कार्पही दिला. डॉ. अंजूने तो आदराने स्वीकारला आणि सुमाला नमस्कार केला.

त्या दिवशी डॉ. अंजू संजयकडेच राहिली. सुमाची प्रवृत्ती स्थिर होती. पण दुसऱ्या दिवशी ती सिरीयस झाली. उलट्यावर उलट्या सुरू झाल्या त्या थांबायला तयार नव्हत्या. अंगातले पाणी कमी होऊ नये म्हणून ज्यूस, पाणी दिले पण... शेवटी सुमा थकली आणि तिने संजयला जवळ बोलाविले.

''अहो ! माझी वेळ झाली आहे! सगळ्यांची, तुमची काळजी घ्या !''

सुमा.

तिने डॉ. अंजूला जवळ बोलाविले आणि तिच्या भांगेमध्ये कुंकू लावले ! सुखी रहा, सांभाळ सगळ्यांना... आणि तिने मान टाकली!

संजयला तर आपले अश्रू आवरता येत नव्हते, प्रविणचीही तिच अवस्था होती, तर डॉ.अंजूनेही अश्रूना वाट करून दिली...

रात्री ११ वाजता सारे काही आटोपले. त्याच दिवशी डॉ. अंजू आपल्या घरी निघून गेली.

सुमाने माझ्या भांगात कुंकू का घातले? याचे तिला आश्चर्य वाटले. त्याचाच ती रात्रभर विचार करीत होती. ती सकाळीच संजयच्या घरी गेली आणि सगळ्यांसाठी नाष्टा केला. मग ती हॉस्पीटलला गेली. पण आज तिचे चित्त ओपीडीत नव्हते ना लेक्चरमध्ये. ती मग निघून पुन: संजयकडे आली. त्या दोघांना खायला खिचडी केली व आपल्या घरी गेली.

दशपींड त्यांनी नाशिकला करून सर्व विधी तेथेच उरकले. पण मधल्या काळात प्रविणचे हॉस्पीटला जाणे चालू होते. सुमा गेल्यावर ४/५ दिवसांनी प्रविणचा पासपोर्ट आला.

त्यानंतर २/३ दिवसांनी अंजू संजयच्या घरी आली. ततूपूर्वी संजय आपल्या सव्हीर्स सेंटरला जाऊन सगळ्या कामाची चौकशी करून आला. श्रीनगरला गेल्यावर त्याचे सर्वीस सेंटरला जाणे थांबले होते. सगळा स्टाफ त्यात दोन ऑटो इंजिनियरही होते, ते सगळ्या कामाची छान काळजी घेत होते.

अंजूने सर्वासाठी हलके जेवण केले व मग तिघांनीही जेवून घेतले.

जेवून उठल्यावर डॉ. अंजूने संजय आणि प्रविणला हॉलमधें बोलावले.

''संजय ! आम्ही एक गोष्ट आपल्यापासून लपवून ठेवली होती. या बाबत मी प्रविण बरोबर बोलले होते. प्रविणने एम.एस. केल्यावर एफ.आर.सी.एस. लंडनला जाऊन करावे असे मला वाटले. तरच या बदलत्या काळात त्याला एका वेगळ्या स्थरावर काम करता येईल. स्वतंत्रपणे. नाहीतर तो कोणातरी डॉ.च्या अंडर १०/१२ वर्षे काम करीत राहील. आणि आयुष्यातला मौल्यवान वेळ वाया जाईल. हे जाणून मी लंडन मधल्या रॉयल हॉस्पिटलमधले माझे मित्र डॉ.माडीयावाला यांच्याशी कन्स्लट केले व तसा प्रस्ताव आम्ही दोघानी लंडनला पाठवला. आजच त्यांचे पत्र आले आहे. प्रविणला लेक्चररशिप आणि त्याच बरोबर रिसर्चशीपची स्कॉलरशीप मिळाली आहे. सुमाच्या आजारपणात

आपण सगळेच व्यस्त होतो म्हणून तुम्हाला सांगता आले नाही. आता १० दिवसात केईएममधले सारे प्रोसीजर पूरे करून त्याला लंडनला जायचे आहे, तिथला सगळा खर्च मी करणार आहे. दोन-अडीच वर्षात त्याला एफ.आर.सी.एस.ची डिग्री मिळेल व एक वर्षाची इंटरशीप करून तो भारतात येईल.!'' अंजू आणि तिने 'रॉयल हॉस्पीटल' चे पत्र प्रविणला दिले.

संजयला हा सगळा प्रकार अनपेक्षीत होता. पत्नीच्या वियोगानंतर प्रविणने ताबोडतोब जाणे त्याला खूपच अडचणीचे वाटत होते. पुढे ४ वर्षे एकाकी रहावे लागणार होते. या विच्याराने तो थोडा डिप्रेस झाला. अर्धा तास तो बेडरूम मधे गेला व त्याने खूप विचार केला. प्रविणच्या करीयरसाठी हा त्याग आपण करावा यासाठी त्याने बाहेर येऊन परवानगी दिली. आणि प्रविणला जवळ घेऊन त्याला शुभेच्छा दिल्या.

डॉ. अंजू प्रविणला लंडनला जाण्यासाठी लागणाऱ्या साऱ्या गोष्टींची पूर्तता करीत होती. हे पाहून संजयलाही समाधान वाटले.

डॉ. प्रविण ३१ मे महिन्यात लंडनला गेला. विमानतळावर डॉ. अंजू आणि संजयही होता विमान रात्री साडे दहाचे होते. प्रविणचे व्हिजा तपासणीचे काम झाले आता तो बाहेर येऊ शकत नव्हता.......

''अंजू मॅडम तुम्ही आता पप्पांची काळजी घ्या ! ते आता एकटे आहेत. तेव्हा आता त्यांना एकटेपणा वाटणार नाही अशासाठी कायम त्यांच्या संपर्कात रहा. नाहीतर ते स्वतःची काळजी घेणार नाहीत. त्यांना एकटे राहण्याची सवय नाही. तेव्हा त्यांची काळजी घ्या !'' प्रविण.

संजयच्या गाडीनेच मग डॉ. अंजू एअरपोर्टवरून निघाले. संजयला प्रविणची काळजी होती तेव्हा तो शांतच होता...

''संजय ! असा अबोल का? आज प्रविण खरोखर लकी म्हणून इतके झटपट सारे मार्गी लागले. नाहीतर बरेच लोक रखडत बसतात या संधीसाठी. पण प्रविण खरोखर नशीबवान आहे. तुम्ही पहा त्याची प्रगती.'' अंजू.

''थोडा वेळ कोणच कोणाशी बोलले नाही. पण त्याच्या खर्चाची व्यवस्था काय ?''

''मी कालच दहा लाख रु. त्याच्या अकाऊंटमध्ये पाठविले आहेत. शिवाय त्याला स्कॉलरशीरप ही मिळाली आहे. त्याला रहायला हॉस्पिटलमध्ये जागा मिळणार आहे. त्याशिवाय त्याला लेक्चरशिपचे स्टायपेंड आणि रीसर्च फ्री

आणि एफआरसीएसचे शिक्षण, ते डॉ.माडीवाला व माझे सर आम्ही मित्र आहोत. ते प्रविणची काळजी घेणार आहेत. या संधीचे सोने प्रविण करील. मला खात्री आहे.'' अंजू

''हे सारे तू मला अगोदर कां सांगितले नाहीस !'' संजय

''कारण तुम्ही, तुमच्या पत्नीच्या आजारपणाच्या टेंशनमध्ये होतात. आणि हा योग या आठवड्यातच जमून आला आहे! तुमच्या पासून काहीच लपून ठेवायचे नव्हते! दुसरे काहीही कारण नाही !'' अंजू.

''ठीक! '' संजय

''संजय ! मला माझ्या घरी सोडा !'' अंजू

''कां ? तसे काही कारण नाही, पण मला उद्या सकाळी ७ चे लेक्चर आहे ! शिवाय नंतर १ वाजेपर्यंत ओपीडी, शिवाय ३ वाजता एक सर्जरी आहे. तेव्हा मला माझ्या घरी सोडा. प्लीज !'' अंजू.

दादर फायर बिर्गेडवरून डावीकडे वळून संजयने अंजूला तिच्या कॉम्प्लेक्समध्ये नेऊन सोडले. तोपर्यंत त्यांचा काहीच संवाद नव्हता. संजयच्या आयुष्यात गेल्या ५/६ वर्षात घटना येवढया घडत होत्या की त्यालाही त्याचे उत्तर सापडत नव्हते. प्रविणचे एम.बी.बी.एस. चे ॲडमिशन, अंजूची ओळख आणि तो तिच्याकडे ओढला जाणे. अंजू बद्दलचे प्रेमाचे पान जे त्याने गेल्या २० वर्षात बंद केले होते ते पूनः खूले होणे, प्रविणचे एम.बी.बी.एस. आणि एम.एस. होणे, पत्नीचे अचानक जाणे आणि आता प्रविणचे लंडनला जाणे. आणि आपले एकटेपण. या साऱ्या घटनांची आडवळणाची वाट इतक्या वेगाने पुढे सरकली याचेच आश्चर्य संजयला वाटत होते.

आणि त्याला शाळेतल्या दिवसांची हृदयातली खळखळ, अंजू त्याला आवडणे आणि तिच्या प्रेमात पडणे. पण ते अव्यक्त प्रेम गेली २० वर्षे आपण वहात होतो अगदी पवित्र मनाने आजवर. जरी अंजू त्याला अनेक वेळा भेटली. तिच्याकडूनही जराही अतिरेक झाला नाही. इतक्या वर्षात न आपल्याकडून.

पण तरीही त्याच्या मनातली खळखळ काही कमी व्हायला तयार नव्हती. अंजूने प्रविणला माझ्यापासून दूर करण्यामागे काही हेतू तर नव्हता ? तिला माझी जवळीक हवी असावी. कदाचीत आता सुमा गेल्यावर तो तिचा मार्ग मोकळा झाला नसेल ? आणि तसे नसेल ना तिच्या मनात ? येवढ्यात त्याची बिल्डींग आली आपल्या विचारांना ब्रेक लावावा लागला.

तो घरी आला आणि झोपण्याचा प्रयत्न केला. पण झोप काही लागत नव्हती गत जीवनातल्या अनेक घटना फेर धरून पिंगा घालीत होत्या. त्यासगळ्यातून आपल्या मनाला ब्रेक लावला. आता त्याला प्रविणची प्रकर्षाने आठवण येत होती. पण येवढे खरे की तो भारतात परत येईल तेव्हा आताचा प्रविण नसेल. एक विद्वान, निष्णात सर्जन होऊन तो येईल. आपली त्याला डॉक्टर बनविण्याची सुप्त इच्छा आता साकार झाली आहेच पण आता डॉ. अंजूमुळे त्याच्या यशाला चार चाँद लागणार आहेत. डॉ. प्रविण एम.बी.बी.एस., एम.एस., एफ.आर.सी.एस. काय रुबाब असेल त्याचा तो आता सुखावला. आणि त्याला आठवण झाली ती डॉ. अंजूची, ती आज आपल्या घरी गेली. दुसरी कोणी उथळ मनाची असती तर माझ्या कुशीत विसावली असती. या विचाराने त्याच्या मनातली डॉ. अंजूची प्रतिमा अधिक उजळली. आदर वाढला. आणि जुन्या कढीला नवा ऊत आला. आणि त्याच नशेत त्याला गाढ झोप लागली.

इकडे अंजूचीही तशीच अवस्था झाली होती. संजयच्या जीवनात जी पोकळी निर्माण होणार आहे त्याला तो कसा सामोरे जातो याच विचाराने ती अधिक अस्वस्थ झाली होती. घरात संजय एकटा असेल. सकाळी त्याची घाई असेलं. साडेसात वाजता सर्व्हीस सेंटरात जावे लागेल तत् पूर्वी त्याची चहा नाष्टा हे सारे कोण पाहिल. सुमा त्याची सगळी काळजी घेत होती. ती आदर्श गृहिणी होती. संजयच्या जडण घडणीत सुमाचा वाटाच मोठा होता. जेव्हा एखादी स्त्री खंबीरपणे पुरुषामागे उभी असते, तेव्हाच त्याच्या पंखात बळ येते. मी त्यांच्या जीवनात आले हा शुभ की अशुभ शकून याचाही विचार तिच्या मनाला स्पर्शुन गेला. संजयचे माझ्यावर असलेले प्रेम अजूनही टवटवीतआहे. माझ्या सहवा-सात तो आनंदीत असतो. खूप मोकळी आणि प्रसन्न वाटते त्याला. माझे प्रेम इतक्या काळातही अजून तसेच टवटवीत आहे. 'लग्नानंतरही त्याने उत्तम प्रपंच केला. माझा त्याच्या मनातला झरा त्याच्या प्रपंचात डोकावला नाही. पण मी संजयच्या सहवासात आले आणि थोडी कटूता, अस्थिरता सुमाला वाटली असणार याचाही सुमाने कधी बावू केला नाही.

डॉ. अंजूच्या जीवनात घडलेल्या घटनांची संगती आजवरच्या वळणावळणाच्या वाटेने ती संजयपर्यंत कशी पोहचली आणि ही पुर्नभेट कशी झाली हा योगायोगच म्हणावा लागेल. माझा नवरा गेल्यानंतर अनेक अमीशे

लग्नाच्या संदर्भात पुढे आली, पण मग मी त्याला का सामोरे गेले नाही. उलट एकटीच राहण्याचा निर्णय घेतला. पुढे शिक्षण घेतले करीयर केले, येथ पर्यंतचा माझा प्रवास एकटीचा झाला. तो संजयची गाठ होई पर्यंत.

तिला आठवले ११वीची परीक्षा होण्यापूर्वी संजयचे पत्र पोस्टमनने तिच्या हातात दिले. तिने ते वाचले. हा कोण संजय ? याचाही मागमुस नव्हता. पण हा मुलगा माझ्या प्रेमात पडला आहे. आणि तो माझी भेट घेऊ इच्छीतो. त्याने त्याची खूण म्हणून 'दाढीवाला' असे लिहीले यासाऱ्या घटनानी ती त्यावेळी मोहरत गेली. त्याचे ते पहिले प्रेम होते. अंजूही त्याने मोहरून गेली. पण ते पत्र वडिलांच्या हाती पडले आणि मनात उगवलेल्या प्रेमाचा विचका झाला. मग घडलेले सगळे रामायण-महाभारत तिला आठवले. एकादा मुलगा आपल्या प्रेमात पडला. ही एक सुखद घटना होती. अंजूचे सर्वांग शहारले. खूप आनंद झाला आणि त्या न पहिलेल्या संजयच्या हृदयात ती जाऊन विसावली खरी. पण, घरातले वातावरण इतके गढूळ झाले की तिने ते प्रेम पूसण्याचा हजारदा विचार केला. पण ती घटना ती कधीच विसरू शकली नाही. संजयही कॉलेजला गेला नाही, हे ही तिला शाळेत गेल्यावर समजले. तिने सायंन्सला रुईया कॉलेजमधें प्रवेश घेतला नि कॉलेजच्या अभ्यासातून तिला संजयचा विसर पडला. तो त्याची सर्व्हीस सेंटरमधे गाठ पडे पर्यंत. आणि त्या घटने नंतर सगळ्या जुन्या आठवणीना पून: उजाळा आला. तरी मी एक एम.डी.डॉक्टर, संजय एक साधा गॅरेजवाला याचा मेळ कसा बसावा. पण देवाच्या मनात काही वेगळेच असावे. संजय पर्यंत पोहोचण्याची वाटच मुळी वळणावळणाची, खडतर होती. येवढे मात्र खरे

संजयचा मुलगा प्रविण मेडीकलला के.ई.एम.मध्येमाझा विद्यार्थी म्हणून यावा हाही योगायोग की नाही. त्यांची के.ई.एम. मध्ये होणारी सकाळची भेट हाही एक योगायोगच आणि त्या आधी गाडीच्या ब्रेकमध्ये अडकलेला दगड नी त्याच्या सर्व्हीस सेंटर मधें येणे, मग तेथे त्यांच्या होणाऱ्या भेटी, त्यातून अंजुला संजयचे वाटणारे आकर्षण, प्रेम वजा मैत्रीचे पुढे पुढे सरकणे, हे सारे त्या आडवळणाच्या वाटेतील लहान लहान दुवे ही आज तिला आठवले.

सगळ्यात मोठ्या संपर्काची (त्याच्या कुटूंबाशी) झालेली घटना म्हणजे सुमाचे आजारपण. सुमाचा तिच्यावरचा विश्वास, झालेली जवळीक व अंजूला तिच्या मनात रुजलेली बहिणीची प्रतिमा या साऱ्या घटना का घडल्या आणि

त्यात ती का गुंतत गेली. प्रविण बद्दल वाटणारी आपल्या मुलाची भावनाही यातली मोठी घटना होती. प्रविण समोर अंजूचा आदर्श. तिचे त्याला होणारे मार्गदर्शन आणि निर्माण होणारी जवळीक, विश्वास या घटनाही तितक्याच महत्वाच्या वाटल्या तिला. तिचे सुमाबरोबर हॉस्पीटलमध्ये रहाणे, तिला अधिक जीवनमान मिळावे यासाठीची धडपड आणि त्यांच्या आजाराची वस्तुस्थिती समजल्यावर मनात उभे राहिलेले अनेक प्रश्न. सुमा आता फार दिवसाची सोबती नाही. ही जाणीव व त्यातून तिने संजयला काश्मीरला जाण्यासाठीची सुचना. आणि मुंबईला परत आल्यावर सुमाने दिलेली शंकराची पिंड इत्यादी. पण, त्याही पेक्षा तिच्या सारख्या विधवेच्या भांगात कुंकवाचा तिने भरलेला मळवट हे आठवून तिच्या डोळ्यात पाणी उभे राहीले आणि सुमाचे निर्वाणीचे शब्द ''तू आता या कुटुंबाची काळजी घे'' या साऱ्या घटना आठवून अंजूला संजयच्या पर्यंत पोहोचण्याच्या 'आड वाटेच्या वळणांची वाट' अगदी स्पष्ट होत गेली.

प्रविणला विमानतळावर पोहचवून आल्यावर या सगळ्या घटनांची जंत्री तिच्या चक्शू समोरून सरकत होती. ती संजय बरोबर त्यांच्या घरी न जाता आपल्या घरी आली. संजय बद्दलचे आकर्षण नव्हते असे नव्हे पण आपण आतताईपणा करणे ठीक नाही असेही तिच्या मनाने पक्के ठरवले होते म्हणून शक्यतो या प्रकारात आपण एक स्त्री, समंजस्य आणि जबाबदार असल्याने घाई करू नये हे तिने पक्के ठरविले होते. नाहीतरी संजय आपल्या पत्नीच्या २४ वर्षाच्या सहवासात सुखी होताच, पण आपला संपर्क झाल्यावर त्याची निष्ठा जरूर 'डळमळीत' झाली असेल. पण, तरीही त्याने आपली पायरी सोडली नव्हती. हे ही ती जाणीत होती. संजयचे आपल्यावर नि:सिम प्रेम आहे आणि त्यानेच याबाबत निर्णय घ्यावा. आपण सध्या तरी त्याचा अस्वस्थतेचा काळ असल्याने जरा दूर रहावे... पण त्याच्या अडचणीच्या काळात त्यालाही कोणीतरी जीवाभावाचे हवे असेही अंजूला वाटत होते.

शिवाय प्रविणला एफ.आर.सी.एस. करण्यासाठी आपण पाठविण्याचा विचार केला त्यामागे स्वार्थ नव्हता. की आपल्याला संजयचा सहवास मिळावा, तर तो एक अत्यंत हुशार, डॉक्टर आहे. भारताला एक चांगला डॉक्टर मिळावा. हाच त्यामागचा विचार होता. त्यामागे कोणताही स्वार्थ नव्हता. त्याचेही नशीब थोर म्हणून सारे झटपट जूळून आले. शिवाय अंजूला त्यांच्याबद्दल जी

जवळीक, मुलासारखी भावना का निर्माण व्हावी आणि आपण त्याच्यासाठी दहा लाख खर्च करावे. साराच हा नशिबाचा खेळ असावा. आडवळणाच्या वाटेचा हेच खरे.

दुसऱ्या दिवशी डॉ. अंजूला सकाळी पहीलेच लेक्चर होते. तीने सगळी कामे आटोपून हॉस्पीटलचा रस्ता धराला. तो रस्ता संजयच्या घराकडून व सर्व्हीस सेंटर वरून जाणारा होता. जाताना तिने तिकडे पाहीले पण गाडी थांबविली नाही. आणि ती तशीच के.ई.एम.ला गेली.

संध्याकाळचे ६ वाजले होते डॉ. अंजूची हॉस्पीटल मधून सुटका अजून झाली नव्हती. दुसऱ्या दिवशी प्रिलीम टेस्ट होती त्यासाठी ती पेपर काढीत होती. ६।। वाजता मोकळी झाल्यावर ती घरी निघाली. गाडीत बसताना तिने संजयला फोन केला.–

''संजय ! कसे आहात ? खूप काम आहे कां ?'' अंजू

''नाही ! पण अजून तासभर मी येथे आहे!'' संजय.

''मग मी येऊ का?'' अंजू

''हे काय विचारणे झाले, मी तुला खूप मीस करतो आहे ! तू ओ.टी.मध्ये असशील, वा लेक्चरला म्हणून मी तुला फोन केला नाही! तू मोकळी असशील तर ये !'' संजय.

''मी आता निघाले आहे. सर्व्हिस सेंटरलाच येते, चालेल ना? अंजू.

''हो !'' संजय

पाच मिनिटातच ती सर्व्हीस सेंटरला आली. आवारात खूप गाड्या होत्या. कामे चालू होती. अनेक लोक आपल्या गाडीची डिलीव्हरी घ्यायला तिष्ठत होते. अंजू आली ती सरळ संजयच्या कॅबीनमधें आली.

''कसे आहात ?''

''ठीक ! बस ! कॉफी घेणार ना ?''

''हो!''

मग संजयने आपल्या किचन बॉयला कॉफी करायला सांगितली व येताना बिस्किटे आण, असे बजावले.

बराच वेळ कोणीही एकमेकांशी बोलले नाही.

संजयने अंजूकडे एक कटाक्ष टाकला आणि तो आपल्या विचारात गढून गेला. एक टक लावून अंजू संजयकडे पहात होती.

येवढ्यात कॉफी घेऊन किचन बॉय आला सोबत गुडडेची बिस्कीटे होती. कॉफी समोर ठेवली तरी संजय कोठेतरी हरवलेलाच होता. हे अंजूने पाहिले.

''अहो! कॉफी घेऊयाना ! मला खूप भूक लागली आहे. दुपारी काहीच खाल्ले नाही. आज एक सिरीयस केसचे आपरेशन खूप वाढले होते. म्हणून !'' अंजू.

''हो ! घेऊयाना म्हणत दोघांनी कॉफी घेतली बिस्कीटे अधीक खाल्ली ती अंजूने.

''आज काय कार्यक्रम आहे तुझा ? '' संजय.

''तसा काही नाही. घरी जाऊन फ्रेश होईन मग मोकळीच आहे ! काय विचार आहे ?'' अंजू.

''आपण आज डीनरला जावे, असे मला वाटते आहे गेला दीड महिन्यात तिकडे जायला वेळच नाही मिळाला. तू असे कर घरी जा, फ्रेश हो. मी ७।। वाजता तुला फोन करतो. मग आपण दादर क्लबला जाऊ ! चालेल कां !'' संजय.

''कां नाही ! तुम्हाला मी नक्की कंपनी देईन ! भेटू या !'' डॉ. अंजू.

आणि ती निघून गेली. त्यानंतर बराच वेळ संजय आपल्याच विच्यारात गढून गेला त्यांची शेवटची भेट दोन महिन्या पुर्वी दादर क्लबमध्ये झाली जेव्हा प्रविण, सुमा दुपारी लंचला गेले होते. नंतर सुमाचे आजारपण. तिचे जाणे, प्रविणचे लंडनला जाणे. सगळा काळच खूप व्यस्त. आणि हॉटेलचा विचारच मनात आला नाही. सुमा गेल्या नंतर अनेक वेळा अंजू संजयच्या घरी गेली. काही खाणे पीणे झाले ते संजयच्या घरीच. आणि आज संजयच्या मनात काय आले कोण जाणे. गेले अनेक दिवस त्याचा मुड कशातच नव्हता ना फोन ना भेट. तो आपल्या पत्नीच्या वियोगातून व मग प्रविणच्या जाण्याने खूपच खचला होता. विचारांची पार धुळधांड उडाली होती. सारे आपले दु:ख त्याने पिऊन टाकले आणि आज डॉ. अंजू भेटल्यावर तो पहिल्यांदा हसला. आणि आपण अंजू बरोबर डिनर ला जावे असे त्याला वाटले, तिनेही तयारी दर्शवली आणि ब्रेक लागलेली गाडी पुन: रुळावर आली. आता निघायला हवे! घरी जाऊन फ्रेश होऊन ७।। पूर्वी अंजूकडे पोहोचायला हवे यासाठी घाई घाईनेच त्याने सर्व्हिस सेंटर सोडले. तत्पर्वी त्याने स्टाफला आणि वॉचमनला काही सुचना केल्या.

संजय घरी गेला आणि फ्रेश होऊन अंजूच्या कॉम्प्लेक्समध्ये आला. त्याने खालूनच फोन केला व तिला येण्याची सूचना केली. ती तयारच होती. पटापट खाली आली आणि दोघे दादर क्लबमध्ये आले. तरीही संजय शांतच होता. त्यांच्या नेहमीच्या टेबलावर ती दोघे बसली तरी संजयची नजर दूर दूरच होती.

''बोला! ऑर्डर द्यायची ना?'' अंजू

''हो! '' संजय

'' आज काय घेणार ? तुमच्या आवडीचे जे हवे ते घ्या ! मी आपली नेहमीची शाकाहारी डिश घेणार !'' अंजू

''अंजू खरे सांगू काश्मिरला गेल्यापासून काल पर्यंत मी प्रचंड टेंशन मधेंच वावरत होतो. सुमाला आनंद लुटता यावा यासाठी मी माझ्या चेहऱ्यावर आनंदचं पांघरूण घेतला होता. सुमा आनंदात रहावी हाच माझा विचार यामागे होता. सुमा आजारी पडल्या पासून ती जाईपर्यंत. एका वेगळ्याच विश्वात मी वावरत होतो !'' संजय

''हे मी पाहिले आहे ! पण आता त्यातून तुम्हाला बाहेर यायला हवे ! आपण आपली घडी नीट बसवायला हवी. त्यात प्रविण आता नाही ! तुम्ही एकट्याने आपला सगळा कार्यक्रम, जेवण, घरची कामे सारे नव्याने सेट अप करायला हवे !'' अंजू.

''कां ? एकट्याने कां ? तू मला साथ देशील अशी आशा आहे मला. तरच माझे दिवस सुखाचे जातील अन्यथा मी एकटा मोडून पडेन ! मला समोर सगळा काळोख दिसतो आहे यात एक आशेचा किरण आहे 'तू' ! संजय

हे ऐकत असताना अंजू खाली मान घालून बसली होती. संजयकडे पहाण्याचे धारिष्ट तिला होत नव्हते आणि संजयने तिचे हात हातात घेतले ! तिच्या डोळ्यात अश्रू तरळले आणि संजयच्या हातातून हात सोडवून आपले डोळे पूसले. थोडा वेळ ती काहीच बोलली नाही...

''ठीक ! जशी आपली इच्छा !'' अंजू

''तूझी नाही कां ? '' संजय

''असे मी कोठे म्हणाले ?'' अंजू

ही शांतता भंग झाली जेव्हा वेटर येऊन उभा राहिला

''सर ! ऑर्डर ? '' वेटर

''अंजू ! आज तूच मेनू सांग, तुला आवडेल तो. मला काहीही चालेल ! ''

संजय.

तिने चिकन तंदूरी, संजयसाठी आणि आपल्यासाठी ज्यूस मागवला. जेवण आले त्यानी जेवायला सुरुवात केली.

"आज तू चिकन तंदूरीच कां ? मागविली ?"

"तुम्हाला आवडते म्हणून !" अंजू

"आणि तू यातले काहीच घेणार नाहीसं"

"घेईन नां ? पण थोडे !" अंजू.

मग संजयने चिकनचा एक तुकडा तिला आपल्या हाताने भरवला. तो खूष झाला. ती ही.

आता आम्हाला एक दुसऱ्यासाठी जगायचे आहे. तेव्हा थोडा बदल करायला हवा. हे तिने ताडले होते. आणि म्हणून जे संजयला पसंत ते स्वीकारायची तयारी तिने दाखवली. जेवण आटोपले. आता ती दोघेही खूप जवळ आली होती. मनाने एकमेकाला स्वीकारायला तयार झाली. आपली गेली अनेक वर्षे जपलेले प्रेम आता सरळ वाटेने पुढे जात बहरणार म्हणून संजय खूष होता.

ती दोघे खाली आली वॉचमनने गाडी आणून समोर उभी केली आणि संजयने अंजूला प्रथम गाडीत बसायला सांगीतले. आणि मग तो ड्रायव्हर सीटवर बसला. आंनंदाच्या लहरीत दोघेही नहात होती. आणि त्याच नशेत ती दोघे निघाली.

"तुम्ही मला माझ्या घरी सोडा !" अंजू.

"कां ? माझ्या घरी येण्याची इच्छा नाही कां ?"

"आता नाही !"

"कां ? "संजय

"मग सांगेन ! " अंजू "आपण थोडा सय्यम ठेवायला हवा. आपण आता वळणावळणाची वाट सोडून सरळ मार्गाने जाणार आहोत. पण यासाठी प्रविणची हरकत नको. त्याने मला स्वीकारले पाहीजे !" अंजू

"नाही तरी तो आता येथे नाही !" संजय

"नसु दे ! मला खात्री आहे तो परवानगी देईल आणि मग देवा ब्राम्हणांच्या साक्षीने आपण एकरूप होऊ !" अंजू

"अग पण ! सुमनने तुझ्या भांगेत कुंकुवाचा मळवट भरला आणि या

कुटुंबाची तू काळजी घे असे तुला बजावलेच आहे ! तरीही !'' संजय.

''होय मला कल्पना आहे ! पण प्रथम प्रविण!''अंजू.

त्यानंतर अंजूचे संजयकडे जाणे येणे वाढले. त्याचा नाष्टा, जेवण सारे ती पहात होती. आणि त्याच्या बरोबर तिचे कॉलेज, हॉस्पीटल ती सांभाळीत होती. पण रात्री मात्र आपल्या घरीच जात होती.

प्रविण गेल्यानंतर ८ महिने हा उपक्रम चालू होता. प्रविणची प्रगती खूपच चांगली आहे हे डॉ.लकडावाला यांनी सांगितले, शिवाय तो खूपच हुशार आहे, आणि हॉस्पीटल मधल्या डॉक्टर आणि स्टाफमध्ये तो खूपच पॉप्युलर आहे हे ही त्यांनी सांगीतले. त्याला रहाण्यासाठी जागा मिळाली, जेवणाची खास सोय हॉस्टेल मधेंच आहे. शिवाय त्याला स्कॉलरशीप ही वाढवून मिळाली त्याची प्रगती पाहून ही गोड बातमी अंजूला डॉ. लकडावाला यांनी दिली. हे सगळे तिने संजयला सांगीतले. त्यालाही खूप आनंद झाला आणि डॉ.अंजूने खूप चांगले प्रविणबद्दल निर्णय घेतले याबद्दल तिचा बद्दलचा विश्वास व दूरदृष्टी त्याला खूप भावली.

महिनाभरानंतर हिवाळा सुरू होणार होता. हा सिझन तसा टूरीस्ट सीझन दोन महिन्यांचा मग दोन महिने बर्फाचे. आपण दोघांनी प्रविणला भेटून यावे असे संजयला वाटत होते. त्याने तो प्रस्ताव अंजूपूढे ठेवला. तिनेही तो स्वीकारला. कॉलेजमध्ये नुकतेच सेमिस्टर संपले होते तेव्हा थोडी उसंत होती. निदान १०/१५ दिवसतरी काही अडचण नव्हती. इकडे हिवाळा असल्याने पेशंटचा प्रेशर तसा नव्हता. तिनेही होकार दिला व त्या दोघांनी लंडनला जाण्याचा बेत पक्का केला.

तिकीटे, विझाची सारी व्यवस्था डॉ. अंजलीने केली. ती डॉ. असल्याने रॉयल हॉस्पिटलकडून तिला खास पत्राने बोलावले. तेव्हा विझाची अडचण नव्हती. शिवाय संजय सोबत येणार हे ही तिने डॉ. लकडवाला यांना कळविले. सारी तयारी झाली आणि दोघे लंडनला जायला तयार झाली.

संजयने आपल्या सर्वीस सेंटरची जबाबदारी तिथला मॅनेजर माने यांच्याकडे सोपवली. तो गेले ७/८ वर्षे संजयकडे काम करीत होता. सर्व्हीसींगचे ९५% पैसे डेबीटकार्ड ने येत होते. तेव्हा बँकचा व्यवहार किरकोळ होता. संजयने स्टाफच्या पगाराचे चेक कामगारांना ॲडव्हान्समध्ये दिले होते. तिथली सगळी चिंता मिटली होती.

आणि ५ नोव्हेंबरला दोघेही लंडन मधे दाखल झाली. तिथला सिझन खूपच आल्हाददकारक होता. प्रविणची भेट झाली. अंजूला जवळच्या 'सीलीबी' हॉटेलमध्ये रुम पूर्वीच बुक केला होता रॉयल हॉस्पिटलने. तेथेच संजयने रहाण्याचे ठरवले. त्यांचे बेड रुम वेगळे होते.

प्रविण भेटला, त्याला अंजू आणि संजय येथे आल्याने खूपच आनंद झाला. अंजू आणि संजय अगदी खेळीमेळीने वागता. एकमेकांची काळजी घेतात हे पाहून प्रविणलाही आनंद झाला. दररोज रात्री डिनरला त्यांच्या भेटी होत. डॉ. प्रविणने अंजूला सांगितले पुढच्या ८/१० महिन्यात त्याचे एफ.आर.सी.एस.चे प्रोजेक्ट तो सबमीट करील. डॉ. लकडावालाच त्याचे रिडर आणि मार्गदर्शक आहेत. या काळात प्रविण हार्ट सर्जरीची साधी आणि सुटसुटीत पद्दत कशी असेल यावर संशोधन करीत होता. येथेच  जगात या बाबत काय चालले आहे याची सर्व माहीती प्रविणला मि़ळत होती. आताची हार्ट सर्जरीची जुनी पद्दतही तशी खूप वेळ लावणारी, तसेच पेशंटला रिकवरीला वेळही लागतो. प्रविणने त्याच्या संशोधनाचा पेपर प्यॉरीसच्या मेडीकल कॉलेज मध्ये सादर करावा व त्याला जागतिक अॅप्रूवल मिळावे यासाठी डॉ. लकडावाला प्रयत्नशील होते. फेब्रुवारी-मार्चमध्ये ही कॉन्फरन्स होती. त्या सगळ्या रिसर्च पेपरची तयारी त्यांनी केली. त्या पद्दतीने लंडनमध्ये अनेक सर्जन डॉ. लकडावाला आणि प्रविणने केल्या नी १००% यश मिळाले. हे सारे गेल्या वर्षभराचे त्याचे संशोधनातले यश होते. हे सारे ऐकून डॉ. अंजूला खूप आनंद झाला. आपल्या प्रयत्नाबद्दल स्वत:ला ती खूप धन्यवाद देत होती.

डॉ. अंजूलाही या हॉस्पीटल मध्ये अत्याधुनिक ऑपरेशन मशिन हाताळण्याचा अनुभव मिळाला. आणि  हे सगळे बदल आपण के.ई.एम.मध्ये करायचे हे तिने पक्के ठरवले होते. तिला Hen-D.Lit. ही पदवीही रॉयल कॉलेजने बहाल केली. ति डॉ. अंजूने ब्रिटनच्या आरोग्य मंत्र्यांच्या हस्ते त्या कॉलेजचे कॉऊंन्सलर डॉ.प्रीत यांच्या उपस्थितीत स्वीकारला. भारतात किती कठिण परिस्थितीत त्यांना काम करावे लागले. यासाठी ब्रिटन सरकारने आणि रॉयल कॉलेज ऑफ मेडीसीन यांनी बऱ्याच मशिनरी डॉ. अंजू यांना केईएम हॉस्पीटलसाठी देण्याचे जाहीर केले.

डॉ. अंजूच्या या कार्यक्रमाला संजय हजर होता. डॉ. प्रविणही होता. त्या वेळी डॉ. लकडावाला यांनी डॉ. प्रविण यांच्या प्रोजेक्ट संबंधी माहिती या सभेत

दिली व त्याचाही यथोचित सत्कार चांसलरच्या हस्ते केला. आज संजयच्या जीवनाचे साफल्य डॉ.अंजूमुळे झाले याचे फारच अप्रूप त्याला वाटले. आपल्या कुटुंबाच्या जडण घडणीत डॉ. अंजूचा सहभाग हा खरोखरीच दैव योग आहे. परमेश्वराच्या मनात काही असावे याची सुप्तशी जाणीवही संजयला झाली. प्रविणही खूप आनंदात होता. डॉ. अंजू मुळेच माझ्या जीवनात प्रकाश खऱ्या अर्थाने झाला आणि त्यासाठी आपण कसे उतराही व्हावे याचा विचार प्रविण गेले ३/४ दिवस करीत होता. त्या हॉस्पीटल मध्ये प्रविणने केलेल्या अनेक हार्ट ऑपरेशनला स्वत: डॉ. अंजू हजर होती.

डॉ. अंजू आता आपल्या कुटुंबापासून दूर जाऊ नये. ती आपल्या कुटुंबाचा एक भाग कां होऊ नये असे प्रविणला वाटत होते. संजय–अंजू यांची वाढणारी जवळीक प्रेमात रुपांतर झाली तर ? तर, सारे कसे माझ्या मनासारखे होईल. हा विचारही त्यांच्या मनाला चाटून गेला. डॉ. अंजूचेही प्रविणवर मुलासारखे प्रेम होते हे प्रविण जाणून होता. तेव्हा हे अशक्य नाही हे ही तो जाणून होता.

पुढच्या आठवड्यात डॉ. अंजू आणि संजय भारतात परत जाणार होते. तेव्हा डॉ. लकडावाला यांनी त्यांच्या घरीच डीनर ठरविला होता. आणि त्यांनी डॉ. अंजू, प्रविण आणि संजय यानाही निमंत्रित केले होते. डीनर झाल्यावर डॉ.लकडावाला यांनी अंजूला खूप प्रेझेंट दिली. खूप अद्ययावत पुस्तके दिली. तसेच प्रविणचेही कौतुक केले. संजयलाही लंडनमध्ये आल्याबद्दल आणि त्याचा मुलगा प्रविण याच्या सारखा होनहार मुलगा येथे पाठवून जगातल्या मानवतेला खूप मोठी मदत केली कारण त्याचे संशोधन आता जागतील स्थरावर जाईल आणि तो एक प्रसिध्द डॉक्टर म्हणून जगात गणला जाईल.

आज डॉ. अंजूला आपल्या कष्टाचे खऱ्या अर्थाने सोने झाले आहे. असे तिला वाटले. माझा मुलगा आज असता तर तो ही प्रविण येवढा असता. पण नशीबात नव्हते. पण आता प्रविणलाच ती मुलगा मानित होती. आणि प्रविणच्याही मनात आता डॉ.अंजूने दूर न जाता आमच्या बरोबरच रहावे असे वाटत होते. काही तरी वेगळे संकेत सगळ्यांचीच मने देत होती.

आपल्या वडिलांच्या जीवनात आई गेल्यानंतर निर्माण झालेली पोकळी कशी भरून निघणार ? त्यांची काळजी आई घेत होती तो वर आमचे घर म्हणजे स्वर्ग होता. पण आता आईच्या पश्चात काय ? त्यांच्या एकाकीपणात डॉ. अंजू जर आसती तर ? असा विचार येऊन गेला. आणि त्याने ठरवले हा विषय रात्री

डिनरच्या वेळी काढावा. आता परवा सकाळी त्यांचे विमान आहे. आणि आजच आम्ही सगळ्यांनी डीनर घेऊ या. हा लंडनमधला त्याचा शेवटचा आहे ते उद्या आपले हॉटेल सोडतील आणि निघतील मग हा विचार कसा त्यांच्या गळी उतरावा ? ह्या विचाराने डॉ. प्रविण अस्वस्थ होता.

डिनरला गेल्यावर त्यांनी एका बाजूचेच टेबल निवडले. आजचे डिनर हे संजय देणार होता.

''प्रविण तू तुझे इथले शिक्षण संपव आणि हिंदुस्थानात ये. खूप सेवा कर लोकांची, पैसा हे अंतिम ध्येय माणसाने कधीही ठेऊ नये. आपले करीयर यशस्वी करावे. नांव लौकिक तर चालत येईल तुझ्या पायाशी. तेव्हा आम्ही तुझी वाट पहात आहोत!'' संजय

''पप्पा, आता भारतात गेल्यावर माझी भेट वर्षभरानंतर होणार आहे मी माझे रिसर्च पेपर पॅरीसला सादर करणार आहे. त्यानंतर कन्वोकेशन एफ.आर.सी.एस.चेआणि जरूर पडली तर थोडे महिने डॉ. लकडावाला याना मदत. त्यांचेही आता वय झाले आहे. आता बहुतेक सगळ्या हार्टच्या सर्जरी ते माझ्याकडूनच करून घेतात. ते म्हणाले तर ६ महिन्यांनी माझा इथले वास्तव्य वाढेल. तोवर १।।– २ वर्षे जातील.

''मग!''

''तोवर तुमचे काय ? एकाकीपणात कोणीतरी साथी हवा. डॉ. अंजू तूम्ही द्याल कंपनी माझ्या पप्पांची. तुम्ही माझ्या आईची कमी भरुन काढू शकता. त्यांची काळजी घ्या, नाहीतर त्यांचा सारखा मुढी माणूस कधी कधी भरकटतो आणि.....

''असे मी होऊ देणार नाही. मी नक्कीच संजयची काळजी घेईन ! तू चिंता करू नको ते सगळे माझ्यावर सोड. तू निश्चींतपणे तुझा अभ्यास संपव. आम्ही तुझी वाट पाहू !'' अंजू.

''हो ! अंजू माझी काळजी घेतील तुला चिंता नको !'' संजय.

आता प्रविण निश्चीत होता. मग डीनर आटोपले आज सगळे पदार्थ मराठमोळे होते. आणि ते निघणार येवढ्यात.

प्रविणने दोघांना बाहेर पोर्चमधें थांबवले दोघांचेही हात हातात घेतले आणि एकमेकांच्या हातात दिले.

''प्रॉमीस !'' प्रविण.

''हो प्रॉमीस !'' दोघही म्हणाली.

''चला आता तूम्ही हॉटेलवर जा, सकाळी तुमचे विमान आहे. विमान तळावर मी तुम्हाला सोडायला येईन. गुड नाईट ! प्रविण.''

ती दोघे हॉटेलवर आले. पण कोणाशी कोणीही बोलत नव्हते. दोघांनीही सामानाची आवरा आवर केली. आणि ते आपआपल्या खोलीत जाणार... येवढ्यात...

''अंजू ! आपली लंडनवारी सफल झाली प्रविणनेही होकार दिला. आता.... ! संजय.

''आपण प्रथम भारतात जाऊ मग ठरवू. आता तुम्ही शांतपणे झोपा. तुम्ही एक मर्यादाशील पुरुष आहात. तुमचा स्वभाव ऊथळ नाही. संयमशील आहे. हे मला गेल्या पाच वर्षाच्या अनुभवाला आले आहे. तुम्ही घ्याल तो निर्णय मला मान्य आहे. पण अगोदर भारतात जाऊ. सारे रीतसर आणि कायदेशीर होऊ दे.

''ओके ! मान्य ! मला हीच अपेक्षा तुझ्याकडून होती ! ओके गुड नाईट !'' संजय.

''ओके गुड नाईट, बाय! '' अंजू.

दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजताच ते लंडनच्या हित्रो विमान तळावर आले. प्रविण बरोबर होताच सारे सोपस्कार होऊन दोघांनी हातात हात घेऊन दोन्ही हात वर केले आणि प्रविणला बाय केले.

भारतात परतल्यावर डॉ. अंजू आपल्या घरी गेली व संजय आपल्या घरी.

त्याच रात्री डॉ. अंजूला मेल आला की केईएम हॉस्पीटलची डीन म्हणून तिची नेमणूक केलेली महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य खात्याने मान्य केली आहे आणि अभिनंदन पर अनेक संदेश त्यानंतर तिला आले. ही बातमी केव्हा संजयला सांगू असे अंजूला झाले होते. तिने सकाळी संजयला फोन केला पण तत्पुर्वी टिव्हीवर ही बातमी संजयने ऐकली. किती म्हणून आनंद झाला असेल संजयला. तो सतत अंजूला फोन करीत होता पण तिचा फोन कायम ऐगेंज होता.

मग त्याने प्रविणला फोन केला आणि डॉ.अंजूची गुड न्यूज त्याला दिली, त्यालाही आनंद झाला आणि डॉ. लकडावाला यांना हे समजल्यावर त्यांनीही अंजूचे अभिनंदन केले.

थोडी मोकळी झाल्यावर डॉ.अंजूने संजयला फोन केला आणि मी तुमच्या घरी येत आहे असे सांगितले. घरी येताना तिने गौरीशंकर मधून मिठाई घेतली.

संजय तिची अधीरतेने वाट पहात होता.

अंजू घरात येताच संजयने तिचे अभिनंदन केले आणि चक्क तिला मिठी मारली. तिनेही ती सोडावी म्हणून प्रयत्न केला नाही. दोन हृदये एकच झाली. पुन:भेटीच्या वाटेचा प्रवास आता संपला होता. आणि आता ते 'हायवेला' लागले होते. आणि पुढचे सारे काही नीट होईल म्हणून.

यथावकाश त्यांचे लग्न झाले. गेल्या वीस वर्षाच्या दुराव्याची इतिश्री झाली. आणि डॉ. अंजू आणि संजय हनिमुनला काश्मीरला गेले.

ही त्यांची पुनर्रभेट सकाळी झाली हे मात्र खरे आणि या दोन जीवांचे मिलन झाले.

*****

# माया आईची !

खरे तर असे आजारपण आईला नव्हतेच कधी. सतत शेतात काम करणारी आणि घरची सगळी व्यवस्था करणारी ती, सतत काम करत असायची. पण एक दिवस आक्रीत झाले. त्यावेळी मी मुंबईला होतो. दर आठवड्याला शनिवारी-रविवारी मी तेव्हा गावाला जात असे, तेव्हा मला तिच्यात बराच बदल झालेला दिसला. मीही विचारात पडलो काय कारण असावे ? पण त्या दोन दिवसाच्या वास्तव्यात तसे काही मला जाणवले नाही. कदाचित मी गावी आल्याने तिला आनंद होत असेल आणि म्हणून आपले दुखणे ना तिने मला सांगितले ना दुसऱ्या कोणाकडून समजले.

पण एक दिवस मी ऑफीसमध्ये असताना मला पाच वाजताच फोन आला की, आईला तातडीने डॉक्टरला दाखविणे जरूरीचे आहे. त्यावेळी चिपळूणमध्ये काही ठराविक डॉक्टर सोडले तर स्पेशालिस्ट डॉक्टरच नव्हते असं म्हटले तरी वावगे ठरणार नाही. छोटी-मोठी एक-दोन हॉस्पिटले होती, पण मोठ्या दुखण्यावर ते काही न करता मुंबई किंवा कोल्हापूर येथे त्या पेशंटला ते पाठवत असत. पण असा फोन आल्यानंतर मी मात्र चिंतेत पडलो. तो मार्च महिना होता. ऑफीसमध्ये ईयर एन्डींगची कामे खूप... आणि त्यातून तातडीने गावी जाणे अशक्यच होते. त्यावेळी आम्ही रजेच्या दिवशी म्हणजे शनिवार-रविवार देखील काम करीत असू. मी ही गोष्ट माझ्या वरिष्टांना सांगितली...

''तुम्ही असे करा इथल्या कामाची चिंता करू नका ! आम्ही निभावून नेऊ. तुमची आई आजारी आहे म्हणून तुम्ही गावी जाणे बरे असे आम्हाला वाटते.'' पवार साहेब.

आणि मी तसाच निघालो आणि घरी येऊन ही बातमी माझ्या मिसेसला सांगितली. तिला मी म्हणालो, ''तसेच काही सिरीयस असेल तर मी फोन करेन, आणि मग मात्र तू तातडीने गावाला येण्याचे कर.'' आणि मी रात्रीची एस.टी. पकडून गावी निघालो. सकाळी मी चिपळूणला पोहचलो. आणि सकाळच्याच गावात येणाऱ्या एस.टी.ने. घरी आलो. त्यावेळी आई झोपलेली होती.

मी वडिलांना तिच्या आजारपणाबद्दल विचारले, तर ते म्हणाले....

''गेले तीन-चार दिवस ती अस्वस्थ असते. जेवण-खाणेही जात नाही. काही तरी वेगळाच प्रकार असावा असा मला संशय येतोय. तेव्हा आता तू इथे

आलेला आहेसच. आपण चिपळूणला कोणातरी मोठ्या डॉक्टरला दाखवू.'' वडिल.

मी, माझा भाऊ चंद्रकांत याची गाडी घेऊन आईला घेऊन चिपळूणला गेलो. त्याने आपण आईला डॉ.पाटणकर यांना दाखवू या. आणि त्यानंतर ते म्हणतील त्याप्रमाणे पुढची कारवाई करू या. प्राथमिक तपासानंतर हे स्पष्ट होईल असे मला वाटते, असे तो म्हणाला.

आम्ही डॉ.पाटणकरांकडे गेलो. त्यांनी आईला तपासले. ते म्हणाले, ''केस तशी सिरियस आहे. हा साधा आजार नाही, आपण तिला मुंबईला नेऊन मोठ्या हॉस्पिटलमध्ये दाखवून घ्या. तत्पूर्वी त्यांनी काही रिपोर्टस केले होते, त्यात एक्स-रे आणि रक्ताची तपासणी करून घेतली होती. त्यांचा संशय होता हे हीला कॅन्सरसारख्या आजाराची शक्यता आहे. मला धक्काच बसला आणि तातडीची हालचाल म्हणून आईला मुंबईला घेऊन जायचे ठरले आणि त्याच दिवशी मी आईला मुंबईला घेऊन आलो.

मी ठरविले की डॉ.नरीयानी हे बॉम्बे हॉस्पिटलमधले माझे मित्र होते त्यांनाच दाखवावे. जे निदान डॉ.पाटणकरांनी केले होते त्यालाच डॉ.नरीयानी यांनी दुजोरा दिला. आणि म्हणून पुढच्या तपासणीसाठी तिला बॉम्बे हॉस्पिटलमध्ये तिला ॲडमिट केले. डॉ.नरीयानी हे निष्णात सर्जन होते आणि पुन्हा सगळे रिपोर्टस करण्यात आले. एक्स-रे मध्ये दाखविल्याप्रमाणे आणि एम.आर.ए.तून असे दिसले की, तिच्या आतड्याला सूज आले असून त्यातला काही भाग ब्लॉक झाला आहे आणि म्हणून तिला मोशन होत नाही. आणि उलट्या होतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यानी तिचे ऑपरेशन करण्याचे ठरविले. त्यावेळी आईला डॉ.नरीयन यांच्या युनिटमध्ये ॲडमिट केले. त्यावेळी आईची सुश्रृषा करण्यासाठी रंजना नावाची एक खास नर्स हिची डॉ.नरीयानी यांनी नेमणूक केली. कारण सर्जरी झाल्यानंतर तिच्या औषधाची आणि इतर सगळ्या गोष्टींची काळजी घेणे अत्यंत गरजेचे होते. रंजना ही कोकणातली चिपळूणचीच होती. हे आईला तिने सांगितल्यामुळे आईला खूप आनंद झाला. ती तिला आपल्यापासून दूर करायला तयार नव्हती. जेव्हा तिची शिफ्ट बदले तेव्हाही रात्री परिचारीका निवासातून ती रात्री दोन-तीन तरी खेपा मारून आईला बघून जाई. तिने औषध घेतले का?, काय फरक आहे तिच्यामध्ये? हे सगळे ती

डॉ.नरीयानी यांना रिपोर्ट करीत असे.

या लेडीज वॉर्डमध्ये पुरुषांना प्रवेश नव्हता. मी जरी दिवसा हॉस्पिटलमध्ये थांबत असलो तरी रात्री माझी पत्नी येऊन थांबत असे. आणि त्यात रंजना सतत आईची काळजी घेत असल्यामुळे मलाही चिंता नव्हती.

दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता डॉ.नरीयानी आले, आईला तपासले आणि पेशंटला ऑपरेशन करण्यात थिएटरमध्ये आणण्यास सांगितले. त्यावेळी मी हॉस्पिटलमध्ये सकाळीच आलो होतो. आणि ऑपरेशन थिएटरच्या बाहेर बसून होतो, आता डॉक्टर काय सांगतात याची वाट पहात होतो. दोन तासांनी डॉ.नरीयानीच बाहेर आले ते आईच्या आतड्याचा कापलेला एक भाग घेऊनच. ते म्हणाले, ''कदम साहेब, आईला कॅन्सर झाला आहे... ऑपरेशन छान झाले. काही काळजी नको पण आता पुन्हा मात्र तिची काळजी घेणे अत्यंत जरुरीचे आहे. तुम्ही तिला मुंबईलाही ठेवू शकता किंवा तिची इच्छा असेल तर गावालाही पाठवू शकता. त्यावेळी रंजनाही ऑपरेशन थिएटरमध्ये होती. बाहेर आल्यावर ती म्हणाली, ''ऑपरेशन चांगले झाले आहे आईचे, आता काळजी नको... '' मला तर रडूच कोसळले, पण तिने मला आश्वस्त केले. म्हणाली–

''तुम्ही काळजी करू नका, मी आहे तिची काळजी घ्यायला, जशी ती तुमची आई आहे तशी ती माझी आई आहे. म्हणून...'' रंजना.

आईला वॉर्डमध्ये आणल्यानंतर रंजना तिची सगळी काळजी घेत होती. आता तिची ओळख माझ्या पत्नीबरोबरही झाली होती. रात्री जेव्हा ती पुन्हा हॉस्पिटलमध्ये येई तेव्हा त्यांच्यात गप्पा रंगत. तेव्हा तिला समजले कि तिचे गाव चिपळूण जवळच असून, तिचे नाव रंजना सावंत असे आहे. तिने सांगितले की तिची आई, तिच्या नंतरच्या बहीणीच्या बाळंतपणात गेली. आणि तेव्हापासून आम्हाला आमच्या वडिलांनीच आजीच्या मदतीने वाढवले, आईची माया दिली. आणि त्यानंतर तिचे वडिलही गेले. त्यांच्या कुटूंबात दुसरे असे कोणीच नव्हते. आईच्या मायेला परकी झालेली रंजना माझ्या आईच्या प्रेमात पडली. आणि त्या दोघींचे मेतकूट इतके जमले की, दोघींनाही एकमेकीपासून चैन पडत नव्हते. काय टेलिपथी होती मला माहित नाही. पण जेव्हा जेव्हा आईला रंजनाची आठवण येई आणि तेव्हा तेव्हा रंजना आईजवळ हजर असे. हे कोडे मला अजूनही सुटले नाही.

आईला जेव्हा माझ्या पत्नीने रंजनाबद्दल सांगितले तेव्हा माझ्या आईच्या

मनात तिच्याबद्दलही जवळीक वाढली. आणि आईने रंजनाला जवळ घेतले, तिच्या पाठीवरून हात फिरवला आणि दोघींच्याही डोळ्यात अश्रूंनी आसरा घेतला. हे सगळे पाहून माझेही मन भडभडून आले  आणि आता त्या दोघींमध्ये आई आणि मुलगी असे नाते निर्माण झाले होते. मी तिला विचारले तेव्हा ती म्हणाली, ''की दहावीनंतर मला पुढे शिकता आले नाही. त्यात माझी एक बहिण लहान होती. तिची जबाबदारी ही माझ्यावर होती. आणि म्हणून मी नर्सिंगच्या कोर्सला जाण्याचे नक्की केले. ज्या हॉस्पिटलमध्ये ती काम करीत होती त्या हॉस्पिटलचे मालक डॉ.पाटील यांनी तिला नर्सिंगच्या कोर्ससाठी पाठविले आणि तो पुरा झाल्यानंतर आपल्या ओळखीने बॉम्बे हॉस्पिटलमध्ये नोकरीसाठी पाठविले. खरे तर तिला डॉक्टर व्हायचे होते पण नियतीच्या मनात निदान त्या क्षेत्रात येऊन लोकांची सेवा करता आली हेच खूप झाले असे ती म्हणाली.

आईचे ऑपरेशन झाल्याला आता आठ दिवस होऊन गेले होते. डॉ.नरीयानीनी सांगितले की तुमच्या आईला उद्या मी डिस्चार्ज देतो आहे. ती आता खूपच चांगली आहे, खूशीत आहे, आनंदात आहे. पुढे डॉक्टर म्हणाले, ''आता हा कॅन्सर संपूर्ण शरीरामध्ये पसरला आहे. तिला जपायला लागेल. तिला जसे वाटेल त्या प्रमाणे तुम्ही मुंबईला ठेवा किंवा गावाला पाठवून द्या.''

आईची इच्छा होती की आपण गावीच जावे. पण प्रश्न होता तिची सुश्रृषा कोण करणार ? शोधा-शोध केल्यानंतर एक मुलगी मिळाली. ती तिची काळजी घेत होती. पण आईही सतत रंजनाच्या नावाचाच जप करीत असे. ती आपल्या नजरेआड होऊ नये असे सतत तिला वाटत होते. ज्या दिवशी आईला डिस्चार्ज दिला, त्या दिवशी रंजनाची रात्रपाळी होती. आणि म्हणूनच सकाळी ती आपल्या कॉर्टरसमध्ये गेली. आई सतत तिची आठवण काढत होती आणि रंजनाला भेटल्याशिवाय मी घरी जाणार नाही. आणि नाईलाजाने मला डॉक्टरांना सांगून तिला बोलावणे भाग पडले. रंजना आली. आईने तिला मिठी मारली आणि तिचे आईचे हृदय जागे झाले. खूप रडली ती. रंजनाने तिला समजावले, मी भेटेन तुम्हाला परत. आणि मी आईला डिस्चार्ज घेऊन घरी आणले.

पुढचे सहा महिने आईची तब्येत स्थिर होती. औषध-पाणी चालू होते. आता ती स्वत:चे काम स्वत:च करत होती. माझे आठवड्याच्या आठवड्याला गावी जाणे सुरूच होते. आणि पुन्हा वडीलांनी मला कळविले की आई

पहिल्यासारखेच झोपून असते. काय करायचे ते बघ. मी डॉ.नरीयानींना फोन केला ते म्हणाले, ‘‘तिला मुंबईला घेऊन ये आणि मी आईला पुन्हा मुंबईला आणून बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. ती तशी सिरीयस नव्हती, पण ती अस्वस्थ होती. हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर ती पुन्हा रंजनाला बोलाव असे सांगत होती. पण त्यावेळी तिची बदली दुसऱ्या डिपार्टमेंटला झाली आहे असे समजले. आई हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाली आहे जे समजल्यावर ती आईला येऊन भेटली. त्यानंतर अध्ये–मध्ये ती येऊन आईला भेटत असे.

आता आई दहा दिवस हॉस्पिटलमध्ये होती. एक दिवस डॉक्टरांनी मला त्यांच्या कन्स्लटिंग रुममध्ये बोलावले –

‘‘साहेब आता तुम्ही आईला आणलेत, ठीक केलेत पण एक ध्यानात ठेवा यापुढे जरी काही आजारपण वाढले तर मात्र तुम्ही ती कोणत्या अवस्थेत आहे हे पहा आणि मग ठरवा. डॉक्टर म्हणाले – जर ती घरात फिरत आहे तोपर्यंत ती ठीक आहे. पण जर तिने अंथरूण पकडले तर मात्र आठ दिवसाचाच तिचा सहवास आहे हे पक्के ध्यानात ठेवा.’’ डॉ.नरीयानी.

हे सगळे ऐकून माझी काय अवस्था झाली असेल हे मी सांगू शकत नाही. डॉ.नरीयानी यांनी जेव्हा मला बोलावले तेव्हा रंजनाही त्यांच्या कन्स्लटींग रुममध्ये होती. आणि हे सारे तिने ऐकले. न बोलताच ती निघून गेली. आणि पुन्हा तिने मागे वळून पाहिले नाही.

आईला समजले की आता उद्या मला डिस्चार्ज देणार आहेत. ती सारखी रंजनाची आठवण काढत होती. सकाळी डिस्चार्ज घेताना आई एकजात हॉस्पिटलमधून बाहेर यायला तयार नव्हती. मी आईला समजावले आता रंजना ड्युटीवर आहे आणि तुला भेटू शकणार नाही. पण तरीही ती आली. तिने आईला पाहिले आणि न बोलताच भरल्या डोळ्यांनी ती निघून गेली. तिला माहित होते आई पुन्हा आजारी पडली तर भेटणार नाही... आईने मला विचारले, ती काहीच का बोलली नाही ? बरं मी आईला कसे समजावू शकत होतो. मी काही बोललो नाही. आणि आईला घेऊन हॉस्पिटलमधून बाहेर पडलो. त्याच दिवशी मी स्पेशल गाडी करून आईला आमच्या गावी आणले. पण त्या गाडीतही रंजनाच्या नावाचा जप आई करीत होती.

रंजनालाही आईला भेटून जाताना काय वाटले असेल या विचाराने मी ही पार गलबललो. काय सांगणार होतो आईला मी. आता रंजना तुला कधीच

भेटणार नाही हे ...

एकदा मी डॉ.नरीयानी यांना भेटण्यासाठी मी हॉस्पिटलमध्ये आलो होतो. रंजना तेथेच होती. पण काहीच बोलली नाही. एवढेच म्हणाली जाता-जाता "आई कशी आहे?" मी काहीच उत्तर दिले नाही. मी आईची अवस्था डॉक्टरांसमोर मांडली.... ते म्हणाले "साहेब, तुम्ही आता आईला परत आणायची गरज नाही. ती आता पाच-सात दिवसाची पाहुणी आहे. सांभाळा तिला." आणि डॉक्टराचे हे बोलणे ही रंजनाने ऐकले. उभ्या उभ्याच तिच्या डोळ्यातून अश्रू धारा निघत होत्या हे मी पाहिले आणि माझेही डोळे पाणावले.

मी तातडीने गावी आलो आणि ठरविले आई आहे तोपर्यंत गावात रहायचे मुंबईला जायचे नाही. पण आई मात्र तू मला मुंबईला का घेऊन जात नाहीस असे सारखे विचारी? मी तिला काय उत्तर देणार होतो.....

आणि आई गेली..... पण शेवटच्या क्षणी ती रंजनाचीच आठवण करीत होती.

मी पुन्हा कधीही रंजनाला भेटलो नाही......

आईची माया काय असते याची अनुभूती मला या सगळ्या प्रसंगातून समजली एवढे मात्र खरे !!

०-०-०-०

# भूक

सकाळी लवकर उठून शंतनु म्हणजे आमचा शंन्तु आपल्या बांधणावर जायचा आणि शर्ट बाजूला काढून ठेवून ओल्या अंगाने बांधण्यात घुसायचा. एक एक टोका काढीत त्यात पडलेले मासे एका कोयनीत जमा करायचा. मग पुन्हा टोके जागच्या जागी लावून ठेवून पुन्हा पऱ्याच्या किनाऱ्यावर यायचा. पाठीला कोईन बांधलेली असायची. मग तसाच शर्ट घालून तो रस्त्यावर यायचा माशाना कोणी गिऱ्हाईक मिळते का पहात.

गेली ४/५ वर्षे तो हे बांधण गुरवाच्या वाड्याजवळ बांधायचा. मागच्या वर्षीचे बांधण पावसाळ्यात पाण्याच्या झोतात वाहून गेले व मग दिवाळी आली आणि पऱ्यातले पाणी कमी झाले की शंतनु त्याच जागेवर ४/५ दिवसाच्या अथक मेहनतीने बांधून बांधण पुरे करायचा... टोके ही नवे करावे लागायचे वेताच्या काठीचे. ७/८ तरी लागायचे टोके त्याला. तो स्वतःच वेत तोडून आणायचा आणि सुबक असे टोके तयार करायचा. आणि मग त्या बांधणाच्या खाली लावून ठेवायचा.

इतके सोपे नसायचे हे बांधण बांधणे. मोठे कसबीचे काम. प्रथम तो त्यासाठी अशी जागा निवडायचा कि पऱ्याच्या पाण्याचा स्त्रोत बांधण्याच्या बाजूने जाईल. कधी कधी त्यासाठी दगडाच्या गडग्याने अख्ख्या पऱ्याचे पाणी आडवावे लागे. ते पाणी बांधणासाठी तयार केले त्या माचीवरून पडत राहिल अशी व्यवस्था करावी लागे. कधी कधी २/३ गडगे करून त्यावर मेसकाटे टाकून, सायाची पाने अंथरून येणाऱ्या पाण्याचा ओघ पूर्णपणे त्या बांधणावरून जाईल व योग्य उताराकरून खाली जाईल. तो खाली जाणाऱ्या पाण्याखाली ८ खड्डे पाडून त्यावर लहान लहान दगड ठेऊन पाण्याचा वेग करावा लागे. शिवाय त्या खड्ड्यामधून जाणारे पाणी आवाज करणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागते. मोठे कसबीचे काम पण गेली ४/५ वर्षे शंतनु हे काम करून पोटापुरते पैसे कमवीत असे भूक भागविण्यासाठी. पण गोची होई ती उन्हाळ्यात, शेतीची कामे बंद, पण पोट थोडेच स्वस्थ बसून देणार, म्हणून शंतनुने हा मासे मारायचा उपाय यावर शोधला.

खरेच ही भूक महा बिलंदर, माणसाला स्वस्थ बसू देत नाही. आणि मग माणूस भुकेच्या ओढीने धडपडत असतो. पोटाची खळगी भरायला.

खरे तर ती इन मीन दोघेजणच. त्याची म्हातारी आई आणि शंतनु. शेतीही वर्षभरासाठी धान्य पिकवीत. दोन बैल होते, एक नांगर होता. शंतनु आपली शेती नांगरल्यावर ज्यांना गरज असे त्यांच्याकडे दिवसभर नांगरी म्हणून काम करी. पण शेतीची कामे संपली की पुढे काय ? हा प्रश्न शंतनुला पडे. त्यासाठी जेव्हा पऱ्याला पाणी जास्त असे तेव्हा तो गळाने मासे मारायचा पोटापूरते मिळायचे दोघांच्या. दररोज माशाचे कालवण आणि भात अगदी आठवड्याचे सात दिवस.

जेव्हा पऱ्याचे पाणी कमी होई तेव्हा शंतनु बांधनातून मासे मारून थोडी फार कमाई करून मासे घेऊन तो त्या जवळून जाण्याच्या रस्त्यावरच ठाण मांडून बसे. आणि येणाऱ्या जाणाऱ्यांना मासे विकी. पण त्याची किंमत योग्य की कमी हे ही त्या बिचाऱ्याला समजत नव्हते. वाटसरू जे पैसे देतील ते घेऊन तो घरी यायचा. बापटाच्या दुकानातून कधी तांदूळ, डाळ, कांदे-बटाटे घरी आणायचा.

पण हा धंदा जस जसा कमी होत जाई पऱ्यातले पाणी आहे. तोवर सारे खडक दिसायला लागत नी शंतनुचा चेहरा पडे.

आता पुढचा महिना दिड महिना म्हणजे मृगाची सर पडे पर्यंत अगदी अडचणीचा जाई. जेव्हा पाणी कमी होत जाते ना तेव्हा त्या बिचाऱ्या माशानाही समजते आपण खाली मोठ्या नदीकडे जावे. पण पाणी नसल्यामुळे ते तडफडत मरत. हे दृश्य शंतनुच्या फार मनाला लागे. एकदाचे पाणी आटले की सगळा पऱ्या ओसाड दिसायला लागला की शंतनु ही काळजीत होरपळून निघे. कधी कधी अवकाळी पाऊस पडे पण असे नेहमी होत नसे. आणि त्याचा काही उपयोग नाही नसे.

हे सारे शंतनु गेली ४/५ वर्षे अनुभवीत होता. एकदाच बांधनातून मासे मिळवायचे बंद होत. धस् होई त्याच्या काळजात. आता दिड-दोन महिने मृगापर्यंत दिवस कठीणचे. या भीतीने त्याच्या पोटात गोळा येई.

आता उद्यापासून या बांधणाकडे फिरकायचे नाही अशा विचाराने तो आज बांधणावर आला. खाली लावलेली टोके काढून घरी घेऊन जायचे होते. म्हणून एकदम टोका त्याने बाहेर काढला व त्यात पडलेले मासे त्याने एका मोठ्या टोपलीत जमा केले. आणि एक टक त्या बांधण्याकडे पहात. त्याने सुकलेल्या नदीकडे नजर टाकली. गेले दोन अडीच महिने याच पऱ्याने त्याला जगवले होते. पण पाण्याचा थेंबही आता उरला नव्हता. सारे खडक उघडे बोडके झालेले

त्याला दिसत होते आणि आता पुढचा दीड महिना, पुढे काय ? या विचाराने त्याच्या डोळ्यात पाणी उभे राहिले.

त्या बांधनातलेही ६ टोके त्याने पाठीवर मारले. टोपलीत एक सुतेरी व काही मळ्याचे मासे आज त्याला सापडले होते. तो रस्त्यावर आला आणि नेहमीप्रमाणे त्याने रस्त्यावरच बसकन मारली. समोर माशाची टोपली होती. त्या माशांकडे तो कृतज्ञता पूर्वक पहात होता. मध्ये मध्ये मागे वळून तो पऱ्यातल्या बांधनाकडे पहात होता.

रस्त्याने जाणारे येणारे त्याचे मासे पाहून पुढे जात, काहींनी ''केवढ्याला देणार ?'' असे विचारलेही. पण शंतनु स्वप्नातच हरवला होता.

''ऑ ? काय ?''

''किती घेणार... या माशांचे ?''

''काय घेणार ?''

''भूक भागवील एवढे ?''

''म्हणजे किती ?''

हलकेच त्याने हात पोटाकडे गेला.... आणि समोरचा माणूस चरकला...

''आज गुरुवार आहे ! उद्या येणार का मासे घेऊन ?''

''नाही.''

''का ?''

''बांधण बंद झालय. पाणी फार खपाटीला गेलय.... हे पहा टोके काढलेयत घरी न्यायला....''

''ठीक ! मग याचे किती घेणार ?''

''शंतनुला भडभडून आले... डोक्यावरून पाण्याच्या धारा लागल्या होत्या...

''किती घेणार ?''

''तुम्ही द्याल ते ! यात तांदूळ, डाळ नी कांदे यायला हवेत !''

म्हणजे ?

''भूक भागेल एवढे हवेत पैसे, अधिक नकोत.''

अरे पण किती ?''

मला फक्त पोटाची खळगी व त्यातली भूक समजते याची किंमत मला कशी कळणार ?

ऊन फार तापत होत डोक्यावर, पोटात भुकेने आग डोंब केला होता पोटात. त्याचा हात सारखा सारखा पोटाकडे जात होता.

''काय हे घ्या ! माझी आई घरी उपाशी असेल... काहीही द्या पण त्यात तांदूळ, डाळ नी कांदे येतील एवढे.'' शंतनु.

थोडावेळ निरव शांतता पसरली. आता उन्हे तापल्याने दुसरे गिऱ्हाईक येईल असे वाटत नव्हते...

''द्या काय द्यायचे ते ?'' शंतनु

त्या गृहस्थाने पाचशेची नोट त्याच्या हातात ठेवली...

माझ्याजवळ सुटे नाहीत !

असु दे .... केव्हा तरी नेईन जेव्हा मासे मारशील तेव्हा...

''यात तुझी नी तुझ्या आईची भूक भागेल एवढ्या जिनसा येतील ना ?''

''पण हे जास्त आहेत.''

''ही तुझ्या भुकेची किम्मत समज.''

तो गृहस्थ मासे घेऊन निघून गेला आणि शंतनु त्याच्याकडे पहात राहिला..

आता त्याचा चेहरा फुलला होता. त्याने ओलावलेले डोळे पुसले आणि टोपली उचलली... त्यात हिरव्या... निळसर रंगाची पाचशेची नोट होती ती तो पहिल्यांदाच पहात होता.....

आणि त्याची पावले आपल्या घराकडे आज निवांतपणे निघाली होती....

हसऱ्या चेहऱ्याने.... ! !

०–०–०

# पांडुरंग पावला

हे देवादी देवा ! पांडूरंगा !.. मी इतक्या वर्षानी प्रथमच तुला हात जोडलेयूत! तू गेली अनेक वर्षे या देवळीत बेवारशा सारखा बसला आहेस. ना पूजा, ना प्रसाद, ना आरती, ना हात जोडणे कोणी.. म्हणजे आमच्या घरातल्यांनी... तुला सांगतो ते ऐक, ''माझी उद्या एस.एस.सी ची परीक्षा आहे! तेव्हा जरा माझे भले करता आले तर बघा ! माझे आजोबां, बाप सगळे अनाडी. म्हणजे गावात शाळा नव्हती... पण माझ्या साठीच झाली असणार शाळा आणि आमच्या शाळेतली ही पहिलीच दहावीची बॅच !'' गंगाराम.

गंगाराम थोडा वेळ थांबला एकचित्ताने त्याने त्या मूर्तीतल्या पांडूरंगाचे स्मरण केले येवढी अनेक वर्षे ती मूर्ती त्या देवळीत आहे... पण त्याचे लक्ष तिच्याकडे गेले नाही.

''हे बघ पांडुरंगा... म्हणजे ही तुझी मूर्ती पंढरपूरच्या पांडूरंगाची आहे हे एकदा आजोबा मला म्हणाले होते. त्यांनी ती कोठून आणली याची मला कल्पना नाही. म्हणजे आजोबाने वा बाबाने सांगितले नाही आताच म्हणजे काल बाबा म्हणाले ही पांडुरंगाची मूर्ती आहे. तो पर्यंत कोणाचेच, म्हणजे माझेही लक्ष तुझ्याकडे गेले नाही. कारण तशी गरजच नव्हती. पण, काल सेंडॉपमधे गुरुजी म्हणाले, ''अभ्यास करा, मोठे व्हा ! देवाची कृपा होईल तुमच्यावर!... आणि मला, तुझी आठवण झाली. बाप्पा ! म्हटल एकदा मनातल सारं सांगाव तुला, तसा मी काही फार हुशार नाही. पण देवा ढकललेस ना मला पुढच्या वर्गात, तर बर होईल असे मास्तर म्हणाले ! आज रविवार. सोमवारी पहिला पेपर... मला पास कर दहावीतून... उपकार होतील माझ्यावर !'' गंगाराम.

आता गंग्याच्या मनावरचे परिक्षेचे दडपण, थोडे फार सैल झाले होते, आज रात्री त्याला चांगली झोप लागली होती. त्याच्या मनात त्या मूर्तीने आशेचा किरण निर्माण केला होता. रात्री ती मूर्ती त्याच्या स्वप्नात आली दोनदा...

''तू घाबरू नकोस ! बिनधास्तपणे पेपर लिही. मी बघून घेईन!'' अशी ती मूर्ती म्हणजे पांडुरंग म्हणाला नी गंग्याला पक्का विश्वास आता बसला होता. पांडुरंगावर. परीक्षेला जाताना गंग्याने पून: मूर्तीला नमस्कार केला पायाला हात लावून.. आणि मागे न बघता निघून गेला. त्याचा आत्मविश्वास त्या मूर्तीतल्या देवाने दुणावला होता. नाहीतर आपले शिक्षण बंद ! इथेच संपणार. नांगर घरावा

लागणार बापाबरोबर आणि सडणार या गावात. पण आता बाजू पलटली होती. गंग्या आता एकटा नव्हता, सोबतीला त्या मूर्तीतला पांडुरंग होता.

आठवडाभरात परिक्षा संपली. पण दररोज तो न चूकता त्या मूर्तीला नमस्कार करीत होता न चूकता. पण परीक्षा संपली नी गंग्या मूर्तीकडे बघेनासा झाला. आता आपण नक्की पास होणार याची त्याला खात्री होती.

मूर्तीतला पांडुरंग मात्र त्याच्याकडे रोज आशाळभूत नजरेने पहायचा. कारण गेल्या चाळीस वर्षानंतर त्याची गंग्याने दखल घेतली होती. देवळीत बसून तो मुळात कंटाळला होता. आता गंग्यामुळे आपल्याला चांगले दिवस येतील अशी आशा त्या मूर्तीतल्या पांडुरंगाला होती. कदाचित हे लोक गंग्याच्या सांगण्यावरून देव्हाऱ्यात ठेवतील. पूजा होईल, प्रसाद मिळेल. पण छ्या! गंग्याकाही त्या मूर्तीकडे पाहिनासा झाला. आता बघेल, मग बघेल, बोलेल माझ्याशी, पण गंग्या गुंतला होता स्वप्नांच्या राज्यात.

तसे पाहिले तर त्याचा बाप रामू एक शेतकरी. दोन वेळ जेवणा पलीकडे काही गोड धोड, काही घरात होत नव्हते, अपवाद गणपती, दिवाळी बस्, मग वर्षभर शिमगाच! गावातली मुले त्याला भेटत. काहीबाही बोलत, मुंबई, पुण्याला जाणार, रत्नागिरीला जाणार कॉलेजात आणि गंग्याचा चेहरा पार उतरे. कारण घरच्या दारिद्र्यामुळे ते अशक्य होते. हा प्रकार आठवडाभर रिझल्टपूर्वी चालू होता. आता आपण या गावातच सडणार, काहीही भवितव्य नाही आपल्याला. हे त्याने मनाशी पक्के ठरवून टाकले होते.

एक दिवस दुपारी तो ओटीवर बसून हाच विचार करीत होता. एका एकी त्याची नजर देवळीतल्या मूर्तीकडे गेली. दोन महिने आपण या मूर्तीकडे ढुंकून पाहिले नाही . त्याची चूक त्याला समजली. आणि डोळे पाणावले... तो उठला... मूर्तीपूढे आला.

''देवा! मला माफ कर ! मी पार विसरून गेलो होतो तूला. परिक्षा संपली नी खेळात रमलो मी. खोखो, आट्या-पाट्या, लगोऱ्या यात पूरा दिवस जायचा. देवा माफ कर मला !'' गंग्या.

आणि गंग्याने मूर्तीचे पाय धरले नमस्कार केला. तो जेव्हा त्याने केला तेव्हा त्याचा बाप, रामू, आई पण ओट्यावर बसली होती जेऊन खाऊन. त्यांचे लक्ष गंग्याकडे गेले. ''ये गंग्या, इकडे ये!''

''काय रे काय करतोस ? पडेल ती मूर्ती हात लाऊ नको. आजोबांनी

आणलेय तुझ्या आम्ही कोणीच त्या मूर्तीला हात लावीत नाही. ती कशाला आणली हेही माहीती नाही पण या घरची एक देवळी मात्र ती अडवून बसलेय. माझ्या बापानेही काही सांगितले नाही, पण तो बैल गाडीतून वारकऱ्यांना आळंदी, पंढरपूरला न्यायाचा. तिथूनच आणली असणार. ना पूजा, ना अर्चा, प्रसाद दिवाबत्ती काही नाही होत तेव्हा पासून ना त्याने केलं ना मी. पण आपल्या घरातही देवारा नाही. नाही परवडत आणायला. दातावर मारायला पैसा नाही तर हे देवाचे थेर कोणाला परवडणार बाबा ! ती श्रीमंतांची मक्तेदारी !'' रामू

हे काय बोलतायत ? हे गंग्या ऐकत होता आणि पुन्हा पुन्हा मुर्तीकडे बघत होता. आणि त्याला तिच्याकडे पून: पून: बघावेसे वाटत होते. पन्नास वर्षे ही मुर्ती येथे आहे? गंग्याला आता पान्हा फुटावा तशी अवस्था झाली. तो उठला त्याने 'निरांजनात तेल भरून आणले आणि मूर्ती समोर लावले. उदबत्ती लावली. आणि पेल्यात साखर ठेवली. देवळी उजळली. पांडुरंगाचा स्पष्ट चेहरा दिसायला लागला. पंढरपुरातल्या मूर्तीसारखा. त्याला खूप आवडला त्याने हात जोडले.

''देवा तू पन्नास वर्षे या देवळीत आहेस ! नी कोणाचे लक्ष नाही तुझ्याकडे?'' गंग्या.

आणि रामू आणि त्याची बायको उठले. देवळीतल्या देवा समोर हात जोडले. गंग्यालाही आनंद झाला. आता उद्या एस.एस.सी चा निकाल होता. सकाळी उठून शाळेत गेले... गुरुजी सगळ्या मुलांशी बोलत होते. सगळ्यांना पास झाल्याचे आणि मार्क सांगीत होते, शिवाय पुढच्या शिक्षणाविषयी सांगत होते. गंग्याचा विश्वास डळमळीत झाला. तो शेवटच्या बाकावर बसला होता. पांडुरंगाला आठवीत. येवढ्यात गुरुजीनी हाक मारली...

''गंग्या !''

''ओ ! गुरुजी''

''पुढे ये ! बस येथे... माझ्यासमोर !''

''होय गुरुजी !'' गंग्या

''तुझा निकाल लागला !''

गंग्याला धडकी भरली. काय बोलावे कळेना. त्याने पांडुरंगाला आठवले. म्हणजे त्यानेही काही केले नाही तर !

''तू पास झालायस !... आशा नव्हती तुझ्याकडून... पण पांडुरंगाची कृपा

म्हण ! साठ टक्के मार्क मिळायलेत !'' गुरुजी.

गंग्या उठला नि सरळ वर्गातून बाहेर पडला. गुरुजी थांब, थांब म्हणत होते पण, गंग्या घरी आला... प्रचंड वेगाने पळत... आणि त्याने पांडुरंगाचे पाय धरले. ओक्सा बोक्सी रडू लागला तो. कुठे ठेऊ आणि कुठे नको पांडुरंगाला असे त्याला झाले. त्याने मूर्तीला हात घातला तर ती हालेना. येवढ्यात त्याची आई आली....

''गंग्या ! काय झाल रे ! पास झालास कां ?''

''होय आई ! या पांडुरंगाची कृपा !'' गंगू

काहीही म्हणा गंग्या तसा सुमार विद्यार्थी. पण नियमित शाळेत जाणारा. दर वर्षी एस.एस.सी. चा निकाल ५५ / ६०% लागायचा. पण या वर्षी तो ९८% लागला आणि गंग्याला मटका लागला. तो एक्स्ट्रा चे २० मार्क मिळाले म्हणून.. पण काही म्हणा... ही किमया पांडुरंगाने केली अशी पक्की खात्री गंग्याला झाली आणि त्याची 'पांडुरंगाने पत वाढवली' म्हणून श्रध्दाही वाढली त्याने...

आज पून: गंग्याने देवासमोर दिवा लावला, प्रसाद ठेवला आणि का कोण जाणे त्याचे आनंदाने डोळे डबडबले...

तो दुसऱ्या दिवशी शाळेत गेला. गुरुजींना भेटला. शाळेचा निकाल या वर्षी १००% लागला, गुरूजन खूष होते. त्यानी गंग्याचे अभिनंदन केले आणि म्हणाले. या वर्षी गंग्या पांडुरंगाची कृपा झाली नाहीतर तुझे काही खरे नव्हते राव! गंग्याने हे ऐकले आणि त्याचे मार्कशीट, लीव्हींग सर्टीफिकेट घेऊन तो बाहेर पडला. शाळेच्या बाहेर येऊन त्याने शाळेला भावपूर्ण नमस्कार केला. ऑक्टोबर वारी करणारी सगळी मुलेही पास झाली होती. पण आतली गोम गंग्याला कुठे माहित होती दरवर्षी ग्रेस मार्क देऊन वरच्या वर्गात ठकलला जाणारा गंग्या यावर्षी चक्क ६०% मार्क मिळवून पास झाला होता. इतर मुलांना ७०/८०% मार्क होते. हे त्याला नंतर कळाले.

आता पुढे काय, हा प्रश्नच नव्हता. सुशिक्षित शेतकरी व्हायचे बापासारखे. पुढच्या सगळ्या वाटा बंद. नुकताच गंग्या १८ वर्षाचा झाला होता. अंगापिंडान ठीक म्हणजे मजबूत. शेतात राब राबून अंगकाठी कडक झाली होती. गेले दोन महिने पुरा दिवस बाहेर ऊंडगणारा गंग्या एका एकी सिरीयस झाला. आता आपण बाप्या झालो. आता सगळा पोरकटपणा सोडायचा. काहीतरी कामधंदा शोधायला हवा. हे त्याला आता मनोमन वाटू लागले होते...

एक दिवस संध्याकाळी फिरत फिरत तो सावकाराच्या घराकडून गावच्या देवळाकडे निघाला होता. येवढ्यात त्याच्या कानावर हाक आली...

"ओ ! गंगाराम !" सावकार

गंग्या चक्रावला, गंगाराम ! अहो मास्तरानीही त्याचे नाव 'गंग्या' केव्हाच केले होते नि अख्खा गाव गंग्यांच म्हणायचा... तो चपापला... इकडे तिकडे पाहु लागला ... पुन:

"ओ ! गंग्या !" सावकार.

मग मात्र गंग्याला खात्री पटली. ही हाक आपल्याला आहे... तर सावकार त्याच्या माडीवजा घरासमोर उभा! गंग्याच्या बापाने त्याच्याकडून कर्ज घेतले होते. गेली पाच वर्षे त्यातले पाच पैशेही तो परत करू शकला नव्हता, हा सावकार त्यासाठी तर हाक मारीत नाही ना? म्हणून त्याने पाय उचलले नि निघाला.... आता मात्र

"गंग्या! जोरदार आवाजातली हाक ऐकून गंग्या थांबला. दोन पावले पुढे आला... तोवर सावकारही पायऱ्या उतरून रस्त्यावर...

"चल! तू पास झालास असे मास्तर म्हणत होते. खरेतर तुझ्या पास होण्यानेच शाळेचा निकाल १००% लागला. तुला भेटून अभिनंदन करावेसे वाटत होते पण... तू अचानक भेटलास, अभिनंदन... कुठे चालला होतास ? सावकार

"देवळाकडे गावच्या !"

"कां ?"

"उगाच !"

"कसा काय पास झालास तू ?"

"पांडुरंगाची कृपा ! " गंग्या.

पांडुरंगाचे नांव ऐकल्यावर मात्र सावकार चमकलाच. सावकार स्वत: वारकरी हा गंग्याच्या आजोबा पासून त्याची त्या घराशी घसट. आता सावकाराचे वय ८० वर्षाचे. वारी बंद झाली ती आजोबा गेल्यावर. आज पांडुरंगाचे नाव ऐकून त्याच्या मनात गंग्या बद्दल गहीवर जागा झाला.

"चल घरात चल !" सावकार

"कशाला ?"

"तुला साखर पाणी देतो ! तू पास झालास ना ! म्हणून ! " सावकार

आणि सावकाराच्या मागून गंग्या त्याच्या घराच्या पायऱ्या चढून घरात गेला.

"बैस ! पुढे काय ठरवलेस?"

"कशाबद्दल ?"

"शिकण्याची इच्छा आहे काय?"

"हो ! पण ... आता विसरायचे ! कोण घालणार कॉलेजात. दातावर मारायला पैसा नाही!" गंग्या.

"मी गावात कॉलेज उघडतोय! तू कॉलेजात जायचे !" सावकार.

"पांडुरंग कृपा!"

"काय रे गंग्या ! तू सारखा पांडुरंगाचे नांव घेतोयस ! काय प्रकार आहे हा !" सावकार

"भाऊ! त्याच्याच कृपेने मी पास झालो आता पुढचे सारे त्याच्याच हातात".. गंग्या आणि त्याने हात जोडले डोळे मिटले नि देवळीतल्या पांडुरंगाला आठवले. त्याला डोळे मिटलेले पहाताच सावकारनेही डोळे मिटले नि हात जोडले..... अर्थात तोही वारकरी होता.

आज घडलेल्या सगळ्या प्रकारामुळे गंग्या चक्रावला होता. आता आपल्या जीवनाची गाडी पुढे जाणार असे दिसते... असे त्याला वाटले पण हे सगळे दिवास्वप्न असावे असेही त्याला वाटले. त्याला प्रश्न पडला... आता मी शिकणार, माझा खर्च कोण करणार? शक्यताच नाही. हे त्याच्या मनाने पक्के ताडले. आणि विचारात हरवून गेला,

"काय रे ! गंग्या कसला विचार करतोयस ?

"कसला नाही भाऊ!"

"अरे तुला मी शिकवीन! नाहीतरी माझे कोण आहे ? तू उद्यापासून माझ्याकडे ये ! माझी काळजी घे! आता मला काम होत नाही. एकटेपणा खायला उठतोय बायको गेल्यापासून, नाही झेपत. मला माहिती तू एक इमानदार मुलगा आहेस. मी ओळखतो तुला !" सावकार.

गंग्या गप्पच राहिला थोडा वेळ काय बोलावे त्याला कळेना ... ही, ही पांडुरंगाचीच कृपा असावी असे त्याच्या मनाने घेतले ... आणि तो घरी आला. पांडुरंगाला बत्ती केली. मनोभावे नमस्कार केला व ओटच्यावर बसला. आता तो एकटाच होता. भिंतीला डोके टेकून कितीतरी वेळ तो स्वप्नात रंगून गेला होता.

आठवीत पांडुरंगाला.

सावकाराने उद्या बोलावले खरे पण कशासाठी ? याचा उलगडा त्याला होत नव्हता. काय काम असावे सावकाराचे माझ्याशी? त्याला उत्तर सापडेना गंग्याने तो विषय झटकला आणि सकाळी सावकाराकडे जाण्याचा विचार पक्का केला.

न्याहारी करून गंग्या सावकाराकडे गेला, त्या वेळी सावकार देवघरात पूजा करीत होता. सगळ्या देवांच्या मूर्त्या होत्या त्यात पांडुरंगापासून गणपती, राम लक्ष्मण आणि सगळयाच. तो दूरून पहात होता आणि सावकार पुजेत मग्न होता. आपल्या घरात अशी पूजा कोण करीत नाही. पांडुरंगाची मूर्ती देवळात पन्नास वर्षे आहे. कसं कोणालाच त्याबद्दल वाटले नाही की पूजा करावी? येवढा मोठा देव, सुंदर मूर्ती आपल्या घरी आली आणि सगळेच ढम! आज आपल्या देवळीतली पांडुरंगाची मूर्ती येथे सावकाराकडे असती तर किती छान पूजा झाली असती. सावकाराला देवाबद्दल प्रेम आहे, तो वारकरी आहे. पुनः तेथून तो बाहेरच्या व्हरांड्यात येऊन बसला.

पूजा आटोपून सावकार बाहेर आला त्याने गंग्याला पाहिले मग पूनः किचनमधे गेला आणि एक बुंदीचा लाडू घेऊन बाहेर आला व गंग्याच्या हातात ठेवला. हा इतका सुंदर लाडू गंग्या प्रथमच पहात होता. त्याने मिटक्या मारीत तो खाल्ला. आज सावकार खूष होता. गंग्याला राहून राहून आपल्या ओटच्यावरील देवळीतल्या पांडुरंगाची आठवण येत होती.

''तू माझ्याकडे रहा, मलाही सोबत होईल. तू कॉलेजलाही जा. तुझा सगळा खर्च मी करीन रहायचे, जेवायचे येथेच. पण घरची आठवण आली की जायचे माझी काहीच हरकत नाही !'' सावकार.

गंग्याने थोडा विचार केला, येथे राहून सारे साधता येईल. पण माझ्या घरी राहिलो तर आयुष्य बरबाद होईल. त्याने येथे येण्याचा इरादा पक्का केला व घरी गेला.

''होय भाऊ, उद्या सकाळीच येईन, चालेल नां? गंग्या.

''हो ! पण नक्की ये हं ! सावकार.

दुसऱ्या दिवशी गंग्या सावकाराकडे आला येण्यापुर्वी त्याने आईला, बापूना समजाविले त्यांनी ना म्हटले नाही. कारण खाणारे एक तोंड कमी झाले. आता रामुच्याने शेती होत नव्हती. तोच कसत होता. पण तीच जमीन सावकाराकडेच गहाण होती. आता गंग्या सावकाराकडे गेला. तेव्हा तीही चिंता आता मिटली

होती.

गंग्या रुळला सावकाराकडे. ते दोघेच येवढ्या मोठ्या वाड्यात. कॉलेज सुरु झाले. गंग्याने एफ वाय ला प्रवेश घेलते, आर्टसूला. आपल्याला झेपेल तेच त्याने पत्कारले.

एक दिवस रविवारी सावकार व्हरांड्यात बसले होते. गंग्याने त्यांना चहा आणून दिला व त्यानेही आपल्यासाठी आणला.

''अरे गंग्या ! तू पांडुरंग, पांडुरंगासारखा म्हणतोय, काय कारण त्या मागे !'' सावकार

''तसे काही नाही अहो माझ्या घरात देवळीत एक पांडुरंगाची मूर्ती आहे. माझे बाबा म्हणाले की ती आजोबांनी आणली पंढरपुरातून !'' गंग्या.

आणि सावकारचे विचार चक्र सुरु झाले. त्याला आठवले ती मूर्ती सावकारनेच गंग्याच्या आजोबांना दिली होती.

''कशी आहे ती ?''

''छान ! हल्ली मी बत्ती, करतो तिला !''

''आणि पूजा अर्च्या ?

''नाही आम्हाला कुठे येतेय पूजा करायला !'' गंग्या.

सावकाराला आठवले त्यानेच गंग्याच्या आजोबाला ती दिली होती. गंग्याचा आजा भाविक, एकही वारी तो कधी चुकवीत नव्हता सावकार म्हणाला.

''मला बघायची आहे ती !'' सावकार

''ठीक उद्या जाऊ !'' गंग्या.

आणि दुसऱ्या दिवशी ते दोघे गंग्याच्या घरी आले. गंग्याचा बाप रामू घाबरला. चेहरा पार पडला त्याचा. पण घरी येताच सावकाराने रामुच्या खांद्यावर हात ठेवला. तेव्हा कोठे रामूचा बी.पी खाली आला.

''काय घेणार सावकार ?''

''काही नको ! सगळे झाले आहे !''

ओठ्यावर येऊन ती देवळीतली विठ्ठलरूक्मीणीची मूर्ती सावकाराने पाहिली. खूष झाला. खरेतर मूर्ती अत्यंत सुंदर, हुबेहुब, पंढरीचा पांडुरंग.

''तुम्ही या देवाची पूजा नाही करीत ?''

''नायबा !'' रामू

"मग ही मी घेऊन जातो माझ्या घरी. छान पूजा होईल पांडुरंगाची !" सावकार

"चालेल की !"रामू

पण गंग्या मात्र अस्वस्थ झाला. पण आता पूजा होईल, प्रसाद मिळेल, म्हणून तोही तयार झाला. आपला जागृत, आपले भले करणारा पांडुरंग सावकार घेऊन चालला याचे दुःख गंग्याला झाले, डोळ्यात अश्रू आले. पण इलाज नव्हता. सावकाराने ती मूर्ती हॉलमधेच एका आसनावर ठेवली. सावकाराचा लोकसंग्रह खूप. लोक येत ते मुर्ती पहात आणि तोंडात बोटे घालीत, सुंदर ! काही म्हणून गेले (डिक्टो) एकदम पांडुरंग पंढरीचा.

"सावकार तुम्ही मंदिर बांधा पांडुरंगाचे आपल्या गावातले बहुसंख्य लोक वारकरी. दर्शनाची सोय होईल सगळ्यांची ! " लोक

"ठीक ! पाहू विचार करू यावर !" सावकार.

या मूर्तीचे आता काही खरे नाही. यांचे बाजारूकरण होणार. मी मोठा गुन्हा केला सावकाराला सांगून. ती रात्र त्याने जागून काढली.

"तुम्ही ही मूर्ती देव्हाऱ्यात का ठेवीत नाही भाऊ !" गंग्या.

"नको ! मोठी आहे तिच्यासाठी मंदिरच बांधू या !" सावकार

ही मूर्ती नवसाला पावणारी आहे. ती माझे ऐकते ! आता मी हिला घरी कशी नेणार ? हे मंदिर होऊच नये. असे गंग्याला वाटत होते. पण सावकाराच्या घरी मंदिर बांधण्यासाठी लोक जमत, चर्चा होई, पण मामला फक्त चर्चेतच अडकला. लोक बदमाश, सावकारानेच आपला पैसा खर्च करावा. पण एक रूपयाही द्यायला लोक तयार होईनात. मामला बैलाच्या कोलू सारखा गर गर फिरायचा पण शेवटी काहीच निष्पन्न होईना. लोक मारवाडी. त्याना सावकाराकडूनच हे मंदिर बांधून हवे होते. सावकाराच्या घरात मिटिंग होत. चर्चा होत पण शेवटी निष्पन्न काहीच होत नव्हते. सर्वांबरोबर गंग्याही बसायचा, ऐकायचा आणि कष्टीही व्हायचा. त्याला वाटे ही मूर्ती मंदिरात गेली तर पूजा-अर्चा होईल. लोकांचे भले होईल कारण आता, आपल्याकडून शोडशोपचारे पूजा होणे कठीण.

गंग्या जेव्हा कॉलेजमध्ये शिकत होता, तेव्हा मंदिराच्या चर्चा चालूच होत्या. पण एकमत काही होत नव्हते. आराखडे कोटीचे.. या कोटीच्या उड्डाणाला गाव तयार होईना. येवढा पैसा कोठून आणायचा हा प्रश्न प्रत्येकाला

पडला होता.

गावात गणपतीला सगळे मुंबईकर आले. त्यांच्या समोर सहदेव सावकाराने सगळा प्लॅन ठेवला. खरेतर अशक्यप्राय होता तो प्लॅन. पण या मधून सावकाराला आवळ्याचा कोहळा करायचा होता. त्याची हाव आताही पूर्वीसारखीच या मंदिराच्या निमित्ताने उफाळून. हे सगळे गंग्याला कळत नव्हते असे नाही. पण तो बोलू शकत नव्हता. कारण तो होता सावकाराचा मानसपुत्र. तेव्हा तोंड बंद करून गप्प बसण्याशिवाय गंग्या काय करू शकत नव्हता. यात तोंड घालावे तर बाहेरचा रस्ता, सावकार काय? एक सोडून दहा नोकर ठेवील. पण सावकाराकडे असणेही ही पांडुरंगाची कृपा होती. कारण मामला मनासारखा पुढे चालला होता. गंग्याची समज एकाएकी वाढली तो हुशार मुलगा म्हणून. गंग्या जाऊ लागला होता कॉलेजात ही पांडुरागाचीच कृपा, हे तो पक्के जाणत होता. पण हा सावकार आता आमच्या पांडुरंगाच्या वर करोडोची कमाई करीत आहे हे ही त्याला कळून चुकले होते. पण मिंधेपणामुळे तो गप्पच होता. त्याला सावकाराचा कावा ध्यानात आला होता. कारण ह्या सावकाराने गावाला नाड नाड नाडले होते. गरीबांची पिळवणूक केली होती. त्यात गंग्याचा बाप रामुही होता. तेव्हा आता विठ्ठल मंदिराचा सावकाराला आलेला पुळका हाही खोटा फार्स आहे हेही त्याने ओळखले होते. पण, येथून बाहेर पडेपर्यंत गप्प रहावे असे त्याने ठरवले होते.

तुम्ही किती देणार पैसे सांगा सावकार मंदिरासाठी ! '' शेतकरी.

''देईन हजार भर !'' सावकार

''फक्त हजार ? अहो त्यासाठी का आम्ही तुम्हाला ह्यात उपाध्यक्ष निवडायचे ? '' गाववाले

सावकार चपापला. ''तुमची माझ्याकडून काय अपेक्षा आहे ?'' सावकार

''पंचविस लाख !'' एक गाववाला.

''बापरे ! नाही ! '' सावकार.

''कां ? !'' लोक

तुम्ही गेल्यावर ही करोडोची प्रॉपर्टी आहेना. त्यालाही वारस नाही. तेव्हा त्याचे काय करणार ?

''बघु या ! पण या मंदिराला १२४ कोटी खर्च येणार यात शंका नको. तुम्ही पैसे जमवायला सुरूवात करा. मी मंदिराच्या ट्रस्टचे पहातो !''

भराभर सावकार बोलून गेला. कल्पना भव्य होती पण पैसा? तो कोणीच काढायला तयार नव्हता. शेवटी योजना बारगळली. शिवाय सावकाराचा कावा लोकांच्या ध्यानात आला होता. तेव्हा लोकही सावध झाले. या मंदिर प्रकरणात तूप सावकार खाणार ताकही गावच्या लोकांना मिळणार नाही. म्हणून लोकही पांगली आणि त्यांची मनेही पांगली. गाडा जागेवरच रुतला मंदिराचा.

या सगळ्या चर्चेत सात वर्षे झाली पण फक्त चर्चाच चर्चा. आता सावकाराचे वयही नव्वदीत आले होते. ते थकले होते. गंग्या बी.ए. झाला चांगल्या मार्कांने आणि त्याला कस्टममध्ये नोकरी लागली तो इन्स्पेक्टर म्हणून रुजू झाला. आता सावकाराची खरेतर अबाळ होत होती. पण गंग्याने त्याच्या सेवेसाठी माणूस ठेवला दर तीन महिन्यांनी तो गावाला यायचा. सावकाराच्याच घरात रहायचा कारण मधल्या काळात गंग्याचा बाप, आई निवर्तले. त्यांचे जूने घरही मोडून पडले, या साऱ्या घटना गंग्या गावात नसतानाच घडल्या. गंग्या सावकाराचा मानसपुत्र होता आणि सावकारही गेला. गंग्याने त्यांचे अंत्यसंस्कार, सगळे विधी केले व तो पुन: ड्युटीवर गेला.

आता सावकाराच्या वाड्याला टाळे लागले होते.' पण गावात वेगळीच चर्चा सुरू झाली. लोक म्हणत कशाला नवे मंदिर बांधायचे सावकाराने जेथे ती विठ्ठल मूर्ती ठेवली तेथेच त्याची प्रतिष्ठापना करावी. आणि सावकाराच्या वाड्याचेच मंदिर करावे. लोक कामाला लागले. तेव्हा गंग्या मुंबईला होता. त्याला गावाने कळवले.

लोकांनी वाड्याचे कुलूप तोडले. पांडुरंगाची प्रतिष्ठापणा केली. आणि मात्र सोन्याचा धूर निघायला लागला. 'नवसाला पावणारा पांडुरंग' अशी त्या पांडुरंगाची जाहिरात लोकांनी सुरू केली. आणि अहो लोकांची गर्दी व्हायला लागली. प्रतिष्ठापणा गंग्याच्या हस्तेच केली गेली व तो मुंबईला गेला. त्याची नोकरी बदलीची. आता तो दिल्लीला गेला. मग तीन चार वर्षे गावात फिरकलाच नाही. इकडे पांडुरंगाची पूजा, अर्चा, उत्सव सारे होऊ लागले. लोक कामाला लागले. 'आणि त्यांची पिढी संपली. आता रामूही पन्नाशीत आला होता.

पूढची पिढी तशी नास्तिकच म्हणा. ७/८ वर्षात गर्दी ओसराया लागली. पूजा अर्चेची हेळसांड . अजून गंग्याच्या निवृत्तीला दहा वर्षे होती. तो आता येऊ शकत नव्हता, ना नोकरी सोडू शकत होता. त्याला समजले पांडुरंगाची रयाच गेली आहे. एकदा तो दिवाळीत गावात आला. तर सगळी अव्यवस्था पाहून

त्याला दु:ख झाले. त्या दिवशी त्याने पांडुरंगाची पूजा केली आणि वाड्याला कुलूप ठोकले नि गेला दिल्लीला.

त्यानंतर मध्ये ३ वर्षे गेली गंग्याला सारखी पांडुरंगाची आठवण येऊ लागली. रात्र रात्र पांडुरंग नजरेसमोर येई. असे पूर्वी कधी होत नव्हते. पांडुरंग मला बोलावतोय. काहीतरी गडबड जरूर आहे. तो मे महिना होता. आपण गावाला जावे म्हणून तो व त्याचे सगळे कुटूंब बायको मुले घेऊन तो दिल्लीवरून मुंबईला व मग त्याच्या गावाला आला. कणकवलीला येऊन पहातो तर सावकाराच्या वाड्याची झालेली वाताहात पाहून त्याला खूप दु:ख झाले. गावाच्या लोकांनी त्या वाड्याचा उकिरडा बनवला होता. आणि पांडुरंगाची मूर्ती वाड्याच्या व्हरांड्यात बेवारस अवस्थेत ठेवली होती, वर कोणास विचारावे असा प्रश्न त्याला पडला. पण जुन्या जमान्यातले वारकरी कोणीच नव्हते म्हणजे वारकऱ्यां सोबत पांडुरंगही पोरका झाला होता. कोणीच काही बोलेना, हा असा बदल का झाला. सावकाराला कोणी वारस नव्हता म्हणून. आणि गंग्या त्याचा मानसपुत्र. पण तो अडकला होता दूर दिल्लीत.

गंग्याला रहायला घर नव्हते तो सावकाराच्या वाड्यातच रहात होता. पण वाड्याची दुरावस्था पाहून तो चरकला येथे येताच. माणसे करून त्याने घर साफ करून घेतले व लोकांनी ठेवलेली सगळी अडगळ वाड्याबाहेर फेकून साफसफाई केली घर रहाण्या सारखे केले. त्याने बाहेर ठेवलेली पांडुरंगाची मुर्ती घरात आणली. ब्राम्हण बोलावला व शोडशोपचारे पुन: होती त्याच जागेवरच त्याची स्थापना केली.

त्यानंतर एक महिना गंग्या गावात होता. पांडुरंगाची पूजा करायला त्याने गावातला ब्राम्हणच नेमला, पगारावर. तो दररोज शोडशोपचारे पांडुरंगाची पूजा करीत असे. पूजेची सगळी सामग्री भरली ब्राम्हणाचा पगार ॲडव्हांस दिला आणि दर्शनाची वेळही ठरवून टाकली. सारे काही सुरळीत झाले होते.

आता गंग्याला गावातल्या त्याच्या पांडुरंग देवताची चिंता नव्हती, पण गावात मात्र अशांतता होती ती गंग्याने पुजेची व्यवस्था ब्राम्हणाला दिली. गुरव व गावातल्या लोकांना डावलले. अफवा उठत होत्या आणि गंग्यापर्यंत पोहोचत होत्या. तस तसा गंग्या अधिकच अस्वस्थ होत होता. रात्र रात्र त्याला झोप येत नसे. आपण येथे दूर गावापासून हजारो मैल दूर. गावात म्हणावा तसा पाठिंबा मिळेल असे वातावरण नव्हते. कोणी मित्र वा पाठीराखेही नव्हते. होता फक्त

पांडुरंग.

गावातल्या लोकांनी महिनाभरात त्या ब्राम्हणाला घालवला. पूजा अर्चा बंद झाली. देवाचा प्रसाद बंद झाला. वाड्याची साफसफाई बंद झाली. त्या मंदिरवजा वाड्यातली रयाच पार बहलून गेली होती. गंग्याने गावाच्या सरपंचाला फोन केला, पत्र लिहिले पण गाडी रुळावर यायला तयार नव्हती. गंग्या आता डी.वाय. डायरेक्टर या पोष्टवर होता. अजून निवृत्तीला सहा वर्षे बाकी होती. त्याने मुंबईला बदली करून घेतली व कोकण विभागाचा चार्ज घेतला. त्याचे आता कोकणातील तिन्ही जिल्ह्यात येणे जाणे वाढणार होते. पण अचानक बदली रद्द झाली. मुंबई या कर्तबगार माणसाला मुंबईच्या गोदीतच ठेवण्याचा विचार करीत होती. गंग्याला खूप दु:ख झाले. त्याने पांडुरंगाला हात जोडले. काही कर पण कोकणात ने. आणि काय आश्चर्य झालेली बदली पून: कार्यान्वीत झाली व पांडुरंग पावला अशी भावना गंग्याची झाली. आठच दिवसात सह कुटुंब गंग्या रत्नागिरीतील हेडक्वाटरमध्ये जॉईन झाला. त्याने पहिला मोर्चा आपल्या गावात वळवला. लाल दिव्याच्या १०/१२ गाड्या गावात आल्या नि गावातले पार टरकले. गंग्या कोठे नोकरी करतो, कोणत्या पदावर आहे हे गावात डंका वाजवून गंग्याने कधी कोणाला सांगितले नाही. आता त्याची ओळख पटली होती. गाव चिडीचीप. त्याने पहिला सरपंचाला धारेवर धरला. त्याच्या सोबत सिंधुदुर्गाचा कलेक्टर  पण आला होता. पुरी ग्रामपंचायतच रद्द केली आणि पोलीस खात्यातल्या सर पी.आय कडे गावचा चार्ज दिला. दोन दिवस तो गावात होता.

गंग्या गावातून जाताच गावात चर्चा सुरु झाली. आता लोकच पार वरमले होते. तो रत्नागिरीचा  पी. आय गंग्याला दररोज गावातली माहिती पाठवीत होता. ब्राम्हण पुजारी पुन: रुजू झाला नी सगळे वातावरण बदलले. लोक दर्शनाला येऊ लागले. आषाढी एकादशीला ह.भ.प कदम महाराजांचे कीर्तन ठरवले. त्याला प्रचंड गर्दी झाली. बुवांनी तरूणाना त्यांच्या किर्तनात उत्तम मार्गदर्शन केले व त्यांना पांडुरंगाकडे वळविले. देवळात येणाऱ्यांची गर्दी वाढली, अशी दर महिन्याच्या एकादशीला वेगवेगळ्या कीर्तनकारांची कीर्तने होऊ लागली. त्यात बाबा महाराज, भारती महाराज, शेट्ये महाराज यांची कीर्तने झाल्याने तरूण वर्ग भक्तीकडे वळला. कदम बुवांनी यावर्षी वारकरी संप्रदायाची दिंडी पंढरपुरला नेण्याचा निर्णय घेतला. त्याला ५०० लोकांनी

पाठींबा दिला व यात्रेवरून येऊन आपल्या मंदिरात काला केला. खूप गर्दी होऊ लागली, पैसा जमा होऊ लागला. तसे काही टगेही पांडुरंगाच्या पायाशी आले. तसे हे होणे अपेक्षीतच होते.

पांडुरंगाचे प्रकरण मार्गी लागल्यावर गंग्याने गावाची रया बदलण्याचा निर्णय घेतला व कलेक्टरच्या मदतीने तरूणांना रोजगाराची व्यवस्था केली. छोटे मोठे धंदे सुरु केले. गावात कॉलेज होते ते आता नव्या रूपात आले. वोकेशनल कोर्सेस सुरु झाले. गावात १०/१० एस.टी येऊ लागल्या. गावातले लोकच जेव्हा तालुक्याला नोकरीला जाऊ लागले. सगळा गावच बदलून गेला. गंग्याने ३ वर्षे अगोदर निवृत्ती घेतली व गावातच राहू लागला. मंदिराची व्यवस्था छान लागली. त्याने, गावातले मतभेद, तंटे-बखेडे संपवले. आता गंग्या मोठा अम्मलदार झाला होता, तेव्हा लोकही बदलले. शिवाय गावातल्या पाणी, स्वच्छता, संडास इ. ने गाव शहरासारखे दिसू लागले. लोकांनी त्यालाच सरपंच व्हा. आमदार व्हा अशी गळ घातली पण त्याने ती नाकारली. महिलांना सरपंच पद देऊन महिला वर्गाची मने जिंकली. आता गाव पूर्णपणे बदलला होता. तरूण पिढी भजन, किर्तनात खूपच भाग घेऊ लागले होते. गंग्यानेही आपल्या आजोबांसारखी वारी सुरू केली. सामान्य लोकांत वावरणे, वर्दीची त्याला जराही चरबी नव्हती. त्याचे पाय जमिनीवर होते हमेशा.

हा गावचा बदल पांडुरंगाचीच कृपा आहे. असे गंग्या व सगळा गावच समजू लागले नी गाव हा हा म्हणता बदलले. वाड्याची रया बदलली. गंग्याने त्या वाड्या मागे स्वत:साठी व पत्नीसाठी एक छोटे घर बांधले. त्याची दोन्ही मुले परदेशात गेली. मुलगी डॉक्टर तिने गावातच दवाखाना काढला आणि गावाची सगळीच सोय झाली. बाजारपेठ आली, बँक आली,पोस्टाची नवी इमारत झाली. या सगळ्या मागे गंग्याच आहे हा गावाचा समज. गंग्याने बदलला ''ही सारी कृपा त्या पांडुरंगाचीच असा समज लोकांपुढे ठेवत राहिला. लोकही बदलले आणि पांडुरंगा चरणी लागले.

गेली चार वर्षे वारीत सातत्याने माणसे वाढत होती. छान व्यवस्था, वयस्करांची काळजी, सोबत ॲमब्युलन्स, त्यामुळे लोक पार बदलले च पांडुरंगाच्या मंदिराला यात्रेचे स्वरूप आले. दर एकदशीला प्रचंड गर्दी होऊ लागली. लोकांचे जीवन निरामय होऊ लागले. शेतीतही अमुलाग्र बदल झाले. लोकांची कमाई वाढली, नोकऱ्या वाढल्या, हा सारा बदल पांडुरंगाच्या कृपेमुळे

यावर गंग्या ठाम होता.

मंदिरात प्रचंड पैशाची आवक सुरू झाली, ती गंग्याने एका ट्रस्टच्या माध्यमातून गावातील लोकांच्या कल्याणासाठी खर्च होऊ लागली. सरकारवर विसंबून न राहता गावात दिवा बत्ती, रस्ते वाडी वाडीवर झाले. अद्ययावत बालवाड्या झाल्या नि गाव बदलला. खरोखर ही सारी किमया 'पांडुरंग पावला' मुळेच होती. मंदिराला क वर्ग पर्यटन स्थळाचा मान मिळाला. शाळेतील. कॉलेजमधील विद्यार्थी गटा–गटाने दर्शनाला येऊ लागले. आणि मंदिर व गावचे महत्व वाढले.

आता गाव प्रतिपंढरपूरच झाले होते. ही किमया त्या पांडुरंगाची... 'तो पावला' म्हणून !

०–०–०

# उतराई

श्रीराम गेली ५० वर्षे अमेरिकेत वास्तव्य करून होता. प्रथम नोकरी आणि नंतर  व्यवसायाच्या निमित्ताने. मुलेही तिकडेच सेटल झाली आणि भारतात येणे तसेच होतच नव्हते. पण वडिलांच्या पश्चात आपल्या स्थावरजंगम मालमत्तेच्या कामासाठी त्याला यावेच लागले. आपल्या कामाच्या धबाडक्यात. पूर्वीचे, म्हणजे शाळा, कॉलेजातले नाजूक धागे पार सुकून गेले होते. अगदी काळजाला भिडणाऱ्या, प्रेमाचा नाजूक धागाही विस्मृतीत गेल्यासारखे झाले होते, पण त्याने आपल्या मायभूमीवर पाय ठेवले आणि साऱ्या घटनांनी तो गलबलून गेला. पण आता बराच काळ झाला तरी त्या आठवणींना कोंब फुटून त्या हिरव्यागार झाल्या होत्या, काळजात त्या आठवणींनी बरीच कालवाकालव झालेली त्याला जाणवली. पण आता वास्तव्य फक्त महिनाभराचेच होते, तसे काही पाश नव्हते व्यवसायाचे. तो ख्यातनाम वकील होता अमेरीकेला. सरकारने त्यांच्या कज्जे कानूनची जबाबदारी त्यांच्या सॉलीसीटर फर्मवर सोपवली होती. त्यात त्याचा मोठा मुलगाही हुशार वकील होता. तो साऱ्या गोष्टी आता स्वतंत्रपणे हाताळीत होता. श्रीरामला गेल्याच महिन्यात ७० वर्षे झाली होती. आणि हळू हळू त्याने ती जबाबदारी कमी केली होती. त्याचे कारण त्याची बायपास सर्जरी.

तर भारताच्या भूमीवर पाय ठेवल्या ठेवल्या त्याला आठवण झाली ती त्याच्या प्रेयसीची उल्काची आणि तिच्या विचाराने काळीज अगदी फाटून गेले. एवढ्या वर्षानंतर ती कोठे असेल, कशी असे आणि असेल की नसेल या विचाराने तो अगदी अस्वस्थ झाला होता. त्याचे उल्कावर जीवापाड प्रेम होते, अजूनही त्यात खंड पडला नव्हता. त्या सगळ्या आठवणी आता ताज्या झाल्या होत्या. तिला आपण भेटावे असे सारखे त्याला वाटे. पण तिचा शोध लावावा कसा ? पण तिचा शोध घ्यायचाच हे मनोमन त्याने ठरवून टाकले होते. मुंबईतले त्याचे घर त्याने भाड्याने दिले होते, नातेवाईक कोण, कोण कोठे आहेत याचाही संपर्क नसल्याने शोध घेणे कठीण, शेवटी तो रिझवी रिसॉर्ट या सांताक्रुजच्या हॉटेलमध्ये उतरला. पुढे कामे कशी उरकावीत याचे सगळे प्लॅनींग त्याने केले होते. त्यात प्रथम कोकणात जाऊन वडिलोपार्जित स्थावर जंगमची व्यवस्था लावणे, कारण खरेतर त्याचसाठी तो आला होता. पण या भूमीच्या स्पर्शाने साऱ्या आठवणी जाग्या झाल्या. आणि प्रथम उल्काचा शोध घ्यावा की

स्थावर जंगमची व्यवस्था लावावी यात त्याचे मन दुभंगून गेले. एक दिवस हॉटेलमध्ये राहिल्या काळात एफ बुक वगैरे माध्यमातून श्री ने उल्काचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. तिची एक मैत्रीण तिच्या ऑफीसमध्ये होती. तिचाही फोन, पत्ता सापडला नाही. श्री नाराज झाला. आता आपण कोकणात जावे. पाऊस सुरू होणार होता, तेव्हा ती कामे आटोपावीत आणि मग मुंबइला येऊन उल्काचा शोध घ्यावा असे श्रीने ठरवले. तिचा शोध कसा लागणार ? तिचे लग्न झाले असेल, नावही बदलले असेल, तेव्हा निवांतपणे मुंबईला येऊन तिचा शोध घ्यावा हे ठरवून श्री ने गावाला जाण्याचा निर्णय घेतला.

तो कोकणात रत्नागिरीला आला. तलाठी, प्रांत यांना भेटून सध्याचे ७/१२ चे उतारे घेतले व जमिन, जूने घर जे आता पडायला आले होते ते आपल्या नावावर करून घेतले. शिवाय त्या सर्व ठिकाणी आपली पत्नी, मुले यांची नावे लावून घेतली. घर बांधण्याची गरज होती. तेही मार्गी लावावे, छोटे, टूमदार घर-बंगला वजा बांधावा, निदान आपला मुलगा वा त्यानंतरची नातवंडे तरी आपले गावचे घर शोधीत येतील, यासाठी ताबडतोब गावातल्या अशोक साळवी यांना ते बांधण्याचे काम दिले. आता गावातले काम संपत आले होते. श्रीला मुंबईची ओढ लागली होती. येथे आल्यावर तो पुन: त्याच हॉटेलात राहू लागला. आता आपल्या इच्छा पूर्तीसाठी आपल्याला किती काळ येथे थांबावे लागेल हे निश्चितच नाही, हे त्याने जाणले आणि त्याचा जो फ्लॅट पार्ल्यात होता, तो भाडेकरू कडून खाली करून घेतला. तो वेल फर्निश होता व वापरात होता तेव्हा थोड्याशा साफसफाईने तो श्रीरामला वापरता येत होता. हॉटेल सोडून तो आपल्या घरी आला आणि मग आपल्या शोध कार्याला लागला.

प्रथम त्याने उल्काचे फोर्टचे ऑफीस गाठले. तेथे त्याला तिच्याबद्दल काहीच माहिती मिळाली नाही. पण तिचे नवे नांव मात्र समजले. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. ना फोन नं., ना मोबाईल, वा ना पत्ता. पण एका जुन्या गृहस्थांनी ती नालासोपारा येथे रहाते असे सांगितले. पण ही बातमी १० वर्षापूर्वीची. म्हणजे शोध घेण्यात आता अनेक अडचणी आहेत हे श्री ने ओळखले. आणि तिला असे शोधण्यापेक्षा तिच्यामुळे घरी वरळीला बी.डी.डी. चाळीत जावे असे त्याने ठरविले.

ओला टॅक्सी करून तो सहकार नगर मध्ये आला. त्या कॉलनीला ६० वर्षे होऊन गेली होती. अनेक इमारतीचे रि-डेव्हलपमेंट चालू होते पण त्यांच्या ई-

ब्लॉक चे बाकी होते त्याने पाहिले. इमारत डबघाईला आली होती. अर्धे अधिक भाडेकरू सोडून गेले होते. जे तेथे रहात होते, ते दुसरी व्यवस्था नसल्यामुळे, भाडे परवडत नाही म्हणून वा विकलांग झाले होते म्हणून त्याच इमारतीत रहात होते. उत्तरे कडून इमारतीचा प्रवेश होता. अनेक ठिकाणी इमारतीच्या बाहेरची परझड झाली होती. व बाहेर एक नोटीस लटकवली होती. धोकादायक. राहणाऱ्यांनी आपल्या जबाबदारीवर रहावे. म्हाडा कोणत्याही अपघाताला जबाबदार नाही. पण अजून काही लोक राहतात का ? अशी चौकशी त्याने केली. त्याचा एक शाळेतला मित्र अरुण देसाई रहायचा, त्याच्या बहिणीकडे चौशी केली, तेव्हा समजले तो तेथे रहात नाही, पण श्रीला ई – विंगमध्ये तळ मजल्यावर उल्का रहायची हे माहित होते. म्हणून तेथे चौकशी करता समजले. तिचे आई–वडील येथे रहातात. आता खूप म्हातारे झाले आहेत आणि एकाकी जीवन जगत आहेत. दरवाजावर पाटी होती श्रीरंग साळवी, श्री ने दरवाजावरची बेल वाजवली. जराही आवाज आला नाही. पण दरवाजा उघडा होता. त्याने पुन्हा दरवाज्यावर टक् टक् केली तरीही दरवाजा कोणी उघडला नाही. मग मात्र तो कमालीचा अस्वस्थ झाला. कोणीतरी त्या घरात आहे हे त्याने ओळखले. पण आपण दवाजा ढकलून आत जावे असे त्याला वाटेना, तो १५ मिनिटे बाहेर उभा होता. एवढ्यात एक वयस्क महिला बाहेर आली.

''कोण हवे आहे आपल्याला ?''

दारावरच्या पाटीकडे पहात त्याने सांगितेल – ''श्रीरंग साळवी !''

''आहेत आत या.'' ती

''आपण कोण ?'' ती.

''सांगतो ! सारे काही सांगतो. आपण देता आले तर एक ग्लासभर पाणी द्या!'' श्री.

''हो ! बसा !'' बाई.

''श्रीराम !''

हे श्रीरंग साळवी. त्यांच्याकडे बोट दाखवीत ती म्हणाली ! ते आजारी असतात. फार जुने दुखणे आहे. उठून बसू शकत नाही. सारे काही बेडवरच, मी करते त्यांची सेवा !'' बाई.

तिने आणलेले पाणी पिऊन त्याने ग्लास टीपॉयवर ठेवले.

''आपण ?''

''मी उल्काची आई !'' बाई

''अजून कोण असत घरात!'' श्री.

''आम्ही दोघेच, एक मुलगा होता, हँडी कॅप. तो आता उल्काकडे असतो. त्याचीही अवस्था वेगळी नाही. तो ही अधूच आहे. आमचेच होत नाही आम्हाला, त्याला कोण बघणार ?'' आई.

''तुमची मुलगी येते कां ?''

''नाही ! कधीतरी पैसे पाठवते. पण गेले अडीच वर्ष फिरकली नाही. तिचा काहीच संपर्क नाही !''

''उल्काबरोबर आणखी कोण असते ?''

तिची एक मुलगी होती. तिचे लग्न झाले आहे. पण लेकीच्या लग्नापूर्वीच उल्काचा घटस्फोट झाला. तो गुजराथी होता. गेला सोडून. पटेना दोघांचे, प्रेम विवाह ! पण जात आडवी आली आणि फाटले प्रेम. प्रेम कसले ते, ती एक सौदेबाजी होती. त्या एजंटची, हजार भानगडी त्याच्या त्या लग्नानंतर माहिती पडल्या आणि शेवटी पाच वर्षे कोर्ट कचेऱ्या, सुटली एकदाची तेव्हापासून एकाकी जगतेय !'' आई.

''कशी आहे तिची तब्येत ?'' श्री.

''सो ! सो ! आता वयही झाले आहे, बाहेर जाणे येणे कमी झाले आहे !'' आई.

''काही संपर्क आहे का तिचा ?'' श्री.

''नाही ! पण पत्र पाठवते, आम्ही ती महिना दोन महिन्यांनी १०००/१५०० पाठवते, तेवढाच आम्हाला आधार ! पण आता कोरोनाच्या दीड वर्षात ना पैसे, ना भेट. काही नाही ! काहीच आता पत्ता नाही तिचा !'' आई.

''बर आधी सांगा तुम्ही कोण ? आणि कसे आणि का येणे झाले'' आई.

'' उल्काला शोधण्यासाठी !'' बेधडक श्री बोलला.

येवढ्यात उल्काचे वडील झोपेतून जागे झाले.

''आपण ?'' ते

''मी ॲड. श्रीराम !''

''काही आठवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मग डोळे झाकले. आणि २/३ मिनिटे स्वस्थ पडून राहिले !''

''नाही आठवत !''

''मी सांगतो आपण भेटले आहोत जेव्हा मी ११ वीला होतो, तुम्ही आमच्या घरी आला होतात. माझे ते पत्र उल्काला लिहिलेल त्या प्रकरणात !'' श्री.

''आठवले ! आपण काय करता ?''

''मी यू.एस.ला असतो. तिथला नागरीक आहे. बऱ्याच वर्षांनी मी भारतात आलो आहे. २५ वर्षानंतर !'' श्री.

आणि त्यांनी डोळे मिटले. पुन्हा त्यांना सारे काही आठवले. त्यावेळी केलेला हंगामा, निर्माण केलेली दहशत वगैरे वगैरे.

''सॉरी ! मी तुमचा गुन्हेगार आहे. द्वैत निर्माण केले तुमच्या प्रेमात. माफ करा ! सारे सारे आठवते आहे मला. तेव्हा तुम्ही लहान मुले होता. ना समज. म्हणून मला मध्ये उभे रहावे लागले, एक बाप म्हणून! पुढे घडलेल्या उल्काच्या आयुष्यातील पडझडीला मी जबाबदार आहे. भोगतोय त्याचे परिणाम, मरण येत नाही, आजार जगू देत नाही...! साऱ्या बाजूंनी कुचंबना, मदतीला कोणी नाही. ना पैसा ना कोणाचा आसरा ! पण तुमचे आज कसे येणे झाले ?'' बाबा.

''मी माझ्या स्थावर प्रॉपर्टीची व्यवस्था लावण्यासाठी अमेरीकेतून येथे आलो. २५ वर्षानंतर. मी तेथेच स्थायिक असतो कुटुंबासह ! खरे तर मी उल्काला शोधण्यासाठी आलो ! तिच्या बद्दल काहीच समजेना. मी नाही विसरु शकलो तिला. त्या गोष्टीला साठ वर्षे झाली, पण एकही दिवस ती माझ्या नजरेआड नाही झाली. आता माझी ७० पार झाली आहे. मी खरे तेच सांगतो. माझे निस्सीम प्रेम आहे तिच्यावर! अजूनही मी नाही विसरलो तिला ! मी तुम्हा कोणालाच दोष देणार नाही. पण पुन्हा सांगतो आजही माझे तिच्यावर तितकेच प्रेम आहे आणि ते शेवटच्या श्वासापावेतो तसेच राहिल !'' श्री.

त्याचे बोलणे ते शांतपणे डोळे बंद करून ऐकत होते. दोन अश्रूंचे थेंब निखळले आणि गालावर घरंगळले. पुसले त्यानी आणि पुन्हा आडवे होउन ऐकत राहिले.

पण श्री ही शांतच होता. तिचा पत्ता त्यांच्याजवळ होता, पण मागण्याचे धाडस त्याना झाले नाही आणि आता तिला भेटायचे तरी कशासाठी आणि अचानक....

''हं ! पत्ता घ्या तिचा. तुम्ही भेटलात तर तिला भेटायला सांगा ! वाट पाहतोय आम्ही शेवटच्या घटका मोजत आहोत असे सांगा !'' वडील.

श्री ने तो पत्ता खिशात ठेवला आणि बराच वेळ कोणी कोणाशी काहीही बोलला नाही.

''चहा घेणार का ?'' आई.

''हो ! घेईन !'' खरे तर नको होती. पण नाही म्हणणे श्रीच्या जीवावर आले होते.

एका मळकट कपातून तिने कोरा चहा आणून दिला.

''दूध नाही ! नाही परवडत आम्हाला. आम्ही कोरीच पितो. तुम्हाला आवडेल का ?'' आई.

''का नाही ! छान !'' श्री.

ती कप टीपॉयवर ठेवला.

''मला हात द्याल का ? बसावेसे वाटत आहे'' बाबा.

श्री उठला. त्याने त्यांना उचलले. फक्त फाटे उरले होते. मागे ऊशी घातली आणि त्यांना बसवले. खूप आनंद झाला गेल्या २ महिन्याने प्रथमच तो उठून बसत होते.

''कसे वाटते आहे ?''

''आता ठीक ! तुम्ही आलात. माझ्या मनावरचा भार उतरला आहे ?'' बाबा.

त्यावेळी साडे पाच वाजून गेले होते. काही खास काम नव्हते, पण ट्रफीकमध्ये अडकायला नको आणि ओला संध्याकाळी मिळणे दुरापास्त, म्हणून आपण निघावे असे श्री ला वाटले. ''आम्हाला दूध घेणे परवडत नाही ! हे उल्काच्या आईचे बोल श्रीच्या मनाला खूप वेदना देऊन गेले... थोडा वेळ विचार करून ... त्याने आपल्या खिशातले ५०००/- काढून त्यांच्या हातात ठेवले.

''आई ! हे घ्या. नाही म्हणू नका. मी तुमच्या मुलासारखा आहे. मुलगाच समजा ! नाही म्हणू नका. आनंदात रहा. मी २/३ दिवसांनी पुन्हा येईन. हा माझा मोबाईल नंबर. काही अडचण असल्यास फोन करा !'' श्री.

आणि त्या उभयतांना नमस्कार करून खिन्न मनाने तो निघाला. त्या जोडप्याची अवस्था पाहून गलबलला. दु:खी झाला. डोळे डबडबले अश्रूंनी. शत्रूलाही असे जगणे नको ! आणि ओला करुन तो पार्ल्याकडे निघाला. घरी परतताना उल्काचाच विचार तो करीत होता. तिने का करावे दुर्लक्ष आई–

वडिलांकडे. ती ठीक असेल ना ? याच विचारात टॅक्सी त्याच्या इमारतीसमोर आली.

आणि दुसऱ्याच दिवशी श्री ला साळवी यांनी फोन केला.

''आमची इमारत उद्या खाली करायला सांगितली. बाकीचे लोक गेले आम्ही कोठे जावे हाच यक्ष प्रश्न आमच्या समोर आहे. उल्काला सांगावा काय? आमची तात्पुरती सोय करता आली तर करा. आम्ही हे तुम्हाला कसे आणि कां ? सांगावे. येथे तुम्ही फिरस्ते आहात. पण सामान काढून बाहेर ठेवतील. पाऊस आहेच काय करावे ?'' साळवी.

श्री काही वेळ गडबडला. आपण काल त्यांची भेट घेतली... आणि आज हा प्रकार ? काय याला योगायोग म्हणतात की काय ? रात्री नऊ वाजता फोन आला होता त्याला.

काहीही करून त्यांची काहीतरी व्यवस्था लावायला हवी. सकाळी ९ पूर्वी तेथे पोहोचायला हवे. या इराद्याने श्री ८ वाजताच घरातून बाहेर पडला. प्रथम एक टेम्पो ठरवला आणि त्या पत्यावर यायला सांगितले आणि आपण ओला करूनतो उल्काच्या घरी वरळीला पोहोचला. एवढ्यात टेम्पोही आला. भराभर सगळे सामान त्याने टेम्पोमध्ये घातले. सगळी कागदपत्रे, महत्त्वाचे डॉक्युमेंटस, बँक पास बुक त्यांनी कपाटात ठेवून तेही टेम्पोत घातले. टेम्पो निघाल्यावर श्री ने ओला बुक केली आणि त्या दोघांना गाडीत नीट बसवले आणि तो पार्ल्याला आपल्या फ्लॅटवर आला. तसे त्याचे घर प्रशस्त होते. थ्री बीएचके चे एक बेडरुम त्याने त्या दोघांना दिला आणि त्यांचे सामान तात्पुरते त्याच्या गाडीच्या पार्कींग लॉटमध्ये ठेवले. कारण त्या सामानाची काहींच गरज नव्हती. ते घरी पोहोचले तेव्हा दोन वाजून गेले होते. श्री ने दुपारचे जेवण समोरच्या 'रामकृष्ण' हॉटेलमधून मागवले. अर्ध्या तासात ते आले, मग त्याने डॉ.साठे यांना बोलावून उल्काच्या आईची आणि वडीलांची पूर्ण चेकअप करून घेतले व औषधेही समोरच्या मेडीकल स्टोअर्समधून मागविली. ही त्यांची अवस्था, खाण्यापिण्याची आबाळ औषधोपचार न मिळणे यामुळे झाली होती. असे डॉक्टर म्हणाले म्हणून त्या दोघांना टॉनिक आणले व औषधेही तातडीने सुरू केले.

श्री ने घरी जेवणाला आवश्यक ते सामान भरले. आठ दिवसात दोघांच्याही प्रकृतीत फरक पडला. बाबा घरातल्या घरात फिरू लागले आणि तिची आईही

आता ठीक होत होती. श्री ने एक बाई पूर्ण वेळसाठी जेवण, साफसफाई यासाठी ठेवली होती. त्यामुळे उल्काच्या आईला काम नव्हतेच. ती दोघेही ९२/९५ वर्षे वयाची असावीत. त्या दोघांची व्यवस्था नीट मार्गी लागल्यावर उल्काचा शोध आपण घ्यावा असे राहू राहून श्री ला वाटू लागले. ती त्याच्या मनातून जाईना. उलट अधिकच ओढ लागली तिच्या भेटीची. आणि श्रीने तिचा शोध घ्यायचे ठरवून एका रविवारी निघून मिरारोड गाठले.

ज्या बिल्डींगचा पत्ता होता ती इमारत नव्याने बांधकाम करण्यासाठी पाडली जाणार होती आणि इमारतीतील सगळे रहिवाशी इतरत्र रहायला गेले होते. मग आली का पंचाईत. त्यानी डेव्हलपर्सच्या ऑफीसचा पत्ता काढून कोण कोठे कोठे रहायला गेले याचा शोध घेतला. तेव्हा समजले की उल्का सध्या दहिसरला कांदळपाडा येथे रहात आहे. मग श्री ने दहिसर गाठले. डेव्हलपरने ती इमारत बांधली होती. म्हणून लवकर शोध लागला तिचा.

आता प्रश्न होता श्री पुढे तो म्हणजे आपण जातोय कशासाठी ? ५७ वर्षानंतर राहिली असेल का ओखळ, नाव तरी आठवेल काय ? आपले खरे नांव सांगितले तर ती भेटेल का नाकारील भेट. असे अनेक विचार त्याच्या मनात येऊन गेले. सरळ घरी न जाता श्री समोरच्या एका हॉटेलमध्ये गेला. बारा वाजले होते भूक लागली होती. म्हणून पोटभर नाश्टा करून जावे हे त्याने ठरवले व तोवर विचारांच्या अनेक फेरी मनात पिंगा घालून गेल्या. आणि काय करायचे याचा आराखडा तयार झाला. त्याने येताना आपले व्हिजीटींग कार्ड आणले होते. तो सिक्युरीटीना देऊन, चौकशी केली तर तो म्हणाला, ''मॅडम आताच घरी आल्या आहेत, मार्केटींग करून ! आहेत घरी ! म्हणजे अर्ध्या तासापूर्वी गेलो असतो तर ती घरी भेटलीच नसती म्हणा. नाश्टा करायला गेलो याचे श्रेय त्याने पोटाला दिले आणि तिच्या तिसऱ्या मजल्यावरच्या फ्लॅट समोर तो आला. बेल वाजवली आणि वाट पाहिली पण १० मिनिटांनी उल्काने दार उघडले.

''कोण ? आपण ?'' उल्का.

''आपण ... !''

''आपण कोण ?''

श्री ने आपले व्हिजीटींग कार्ड तिच्या हातात दिले. तत्पूर्वी सेक्युरिटीने तिला अमूक गृहस्थ भेटायला येत आहेत हे सांगितले. होतेच तेव्हा अधिक खुलासा करण्याची गरज पडली नाही.

''काय काम आहे आपले ?''

श्री तिच्या चेहऱ्याकडे पहातच राहिला. ती तीच होती, तशीच फक्त वयोमानाने थोडा फरक झाला होता तेवढाच !

''काय काम आहे ?'' उल्का

''आपणास भेटायला आलो आहे. मी यू.एस.मधून आलो. तिकडेच गेली चाळीस वर्षे रहातो, फक्त आपणास भेटण्यास आलो. आपण मला ओळखले का ?'' श्री.

''नाव ओळखीचे वाटते आहे, पण विस्मृतीत गेलेले आहे !'' उल्का.

''हो ! आता समजले ! पण काम काय आहे ?'' उल्का.

''खास काम नाही ! पण आपणास भेटावे असे वाटले म्हणून आलो. खूप आठवण येत होती आपली. तुम्ही माझ्या विस्मृतीतून गेला नाही.'' श्री.

''या ! आत या !'' उल्का.

उल्काला हळू हळू सगळा उलगडा होत गेला. ते प्रसंग आठवले. ते पत्र, त्याने झालेले रामायण–महाभारत, घरचे आकांड तांडव. पुढचे अकरावीच्या परीक्षेचे टेन्शन. सारे सारे आठवले तिला....

''बसा ! मी आलेच.'' उल्का.

श्री सोफ्यावर बसला. तो फ्लॅट वेल फर्निश होता. त्या मिरारोडच्या इमारतीतील ९०% लोक या इमारतीत रहात होते. साऱ्या जून्या आठवणी तरारून जाग्या झाल्या आणि ती भेटल्याचा आनंद मनात मावेना.

अश्रूंनी वाट करून दिली आणि त्याने डोळे मिटले तो किती वेळ त्याच अवस्थेत होता हे त्यालाही समजले नाही आणि उल्काने दोनदा हाक मारली पण त्याला जाग आली नाही.

एवढ्यात उल्का पाणी आणि थंड लिम्का घेऊन आली.

''हे घ्या!'' उल्का.

''थोडे गरम होऊ दे. मला थंड चालत नाही म्हणून मग घेतो.'' श्री.

''आजच सकाळी बाबांचा फोन आला होते... आपण येणार हे सांगितले. पण आपण कोण, याची माहिती नाही दिली'' उल्का.

तुमचे आई–बाबा माझ्या घरी सुरक्षित आहेत. तुमचा भाऊ ?

त्याला मी वृद्धाश्रमात ठेवले आहे ? त्याची देखभाल करणे कठीण झाले म्हणून. तो मला नको आहे म्हणून नाही. त्याच्या अनंत अडचणी आहेत... मी

या वयात हे प्रेशर घेऊन शकत नाही. त्यासाठी मी माझी एफ.डी. तोडली आणि ५ लाख रु. त्या आश्रमात भरले आहेत. तो तेथे ठीक आहे.'' उल्का.

मग बराच वेळ कोणी कोणाशीच बोलले नाही. श्री ने तिने घेतलेले पाणी आणि मग ड्रींक घेतले.

''कसे आहे आई-बाबा !''

''आजारी होते ट्रीटमेंट चालू केली आहे. त्यांना डिप्रेशन आले आहे ते चिंता करतायत तुमची. गेल्या अडीच वर्षात तुमचा संपर्क नाही ?

''तुम्ही कोठे रहाता ?''

''न्यूयॉर्क, यु.एस.ए.''

''नाही येथे !''

''पार्ल्यात. माझ्या घरीच ती दोघेही सुरक्षित आहेत. तुमची आठवण काढत आहेत. आपण एकदा त्यांना भेटावे.'' श्री.

''हो. येईन मी २/३ दिवसात. दोन दिवसापूर्वीच मी येथे शिफ्ट झाले आहे.'' उल्का.

''आज का नाही ?''

या प्रश्नाचे उत्तर द्यावे हेच तिला कळेना आणि ती विचारात हरवली.

आता तिचा बोलण्याचा टोन बदलला होता. शाळेतल्या त्या प्रेमाने तिच्या मनात कालवा कालव चालू केली होती. आता तर तिची खाली झालेली नजरही वर होत नव्हती. तशी ती मुळात नाजूक, लाजाळू होती. मितभाषी होती. त्यात समोरच्या व्यक्तीच्या समोर ती फार हबकून गेली होती. श्रीच्या नजरेतून हे कसे सुटेल. तिच्या त्या घटनेनंतर आयुष्यच बदलले. श्रीचा संपर्क तुटला. आणि नवनव्या गंधाळलेल्या लाटांनी ती बदलत गेली. हळूहळू ते बालवयातले अल्लड प्रेम ती पार विसरली नाही हे तिच्या आता झालेल्या फरकामुळे श्री ला जाणवले आणि उल्कालाही. त्याच गोष्टीच्या ती ही ज्ञात होती. तिच्या आयुष्यात जो गोंधळ झाला त्यामुळे प्रेमाची व्याख्याच तिच्या आयुष्यात बदलली होती. तिटकारा आला होता मनात. तो एक अपघातच होता. एका एजंटच्याच चपाट्यात ती सापडली. आणि फशी पडली वर्ष भरातच त्या प्रेमाची इती श्री झाली आणि एक जीव पदरात घेऊन पाच वर्षे झगडत राहिली न्यायासाठी. ती कमवती होती. पोटगी मिळाली नाही पण तिची सारी मिळकत घशात घातली त्या लुटारूने, एकटेपणाचे चटके गेली ३० वर्षे ती भोगत होती, त्याची कल्पना

जगाला नव्हती. तिने मान वर केलीच नाही. मात्र डोळ्यातून वहाणाऱ्या अश्रूंना नाही लपवता आले तिला. श्री च्या ही ध्यानात आले आणि तो उठला....

त्याने तिच्या खांद्यावर हात ठेवला मात्र तिनेही त्याला विरोध नाही केला... तिने ही पुन्हा एक हुंदका देऊन श्री चा हात पकडला....

थोड्या वेळाने ती शांत झाली आणि उठली...

''तुम्ही आता निघणार की थांबणार. आपण जेवूनच पार्ल्याला जाऊ. मी दुर्लक्ष केले आई–बाबांकडे. मी माझ्या दुःखाच्या कोषात अधिकाधिक अडकत गेले. पैसेही पाठवले नाही. मी चुकले. त्यात भाऊचा त्रास मला खूप झाला. मी एकटीच लढत होते. माझ्या एकटेपणाला कोणाची साथ नव्हती.'' उल्का.

''चला उठा ! काहीतरी खायला करते शॉर्टकट. आपण निघूया ! फक्त जरुरी पुरते कपडे घे बरोबर बस !''

''म्हणजे मला रहावे लागेल का तेथे !'' उल्का.

''हो ! आता तरी काही दिवस ! किंवा कायम तूच त्यांची काळजी घे.'' श्री.

''आणि तुम्ही'' उल्का.

''माझे पाहू. सध्या मी निवृत्त आहे. मी जाऊन कदाचित परत येईन आणि राहीन येथेच. तुमचा सहवास मला आवडेल कारण माझी पत्नी गेल्यावर मी गेली १० वर्षे एकाकी जीवन जगतो आहे. आता तुझ्या आई–वडिलांचे संगोपन, त्यांना आधार हाच विचार माझ्या मनात आहे. बाकी नाही. तुमचा सहवास मला आवडेल..!'' श्री.

ती काहीच बोलले नाही.

तिने पिटले भात केले. ते दोघांनी खाल्ले आणि ती श्री बरोबर पार्ल्याला निघाली. श्री ने एक ओला मागवली... आणि त्यांचा प्रवास पार्लेकडे सुरू झाला. आता ती खूपच फ्रेश होती. मनात वेगळ्याच भावना फेर धरून नाचत होत्या. ती त्रस्त होती या प्रवासात, शेजारी श्री होता. तिला तिची अस्वस्थता रोखता येईना... तिने त्याचा हात धरला...!

मला माफ करा ! चुका कोणाच्या ही असोत आपण दोघांनीही हा वनवास भोगला आहे. पैसा महत्त्वाचा नसतो असे मी म्हणणार नाही. तुम्ही–मीही पैसे कमविले पण मानसिक शांतता, सुख हरवून बसलो. मी कच खाल्ली त्यावेळी. आणि लाथाडले तुमचे प्रेम. श्री मला माफ करा.'' उल्का.

आणि तिने डोके श्री च्या खांद्यावर ठेवले. तुम्ही स्वप्ने पाहिलीत पण मी मात्र वहात गेले पार बरबादीच्या मार्गावर.... आणि ही अवस्था, मीच जबाबदार. मी ठामपणे घरच्यांना विरोध करायला हवा होता. पण त्या बालवयात, अपरिपक्व वयात, मी गप्प राहिले, तुमचे हळूवार प्रेम नाही हो समजले मला ! आता खूप उशीर झालाय... !!''

श्री ने ही तिला विरोध केला नाही. आणि गाडी पार्ल्याच्या त्यांच्या इमारती समोर उभी राहिली.... ते दोघे घरी आले.

''आई बाबा.. मला माफ करा ! माझी चूक झाली. मी माझ्या नशेच्या आहारी गेले आणि फसगत झाली... '' उल्का.

''तू नाही ! बाळा आम्हीच चुकलो. या देव माणसातले माणूसपणा नाही ओळखू शकलो आम्ही. तुझ्या बालवयाच्या काळजी पोटी ! बस दुसरे काही कारण नाही !'' बाबा.

एवढ्यात श्री त्या बेडरुममध्ये आला.

''आई बाबा तुम्ही जेवलात का ?''

''नाही तुमची वाट पहात होतो.'' आई

''आम्ही थोडे खाल्ले आहे. तुम्ही जेवून घ्या. मग आम्ही घेतो.'' श्री.

आणि त्या दोघांना उल्काने जेवायला वाढले. ती दोघे डायनिंग टेबलवर बसले आणि जेवत होते. उल्का त्यांच्यातला फरक पहात होती. आज ही दोघे आनंदात आहेत केवळ श्री मुळे. त्यानेच यांना पुर्नजीवन दिले आहे. मी निष्ठूर झाले मला त्यांची अडचण झाली होती म्हणून गेले अडीच वर्ष मी ढुकूनही त्यांना पाहिले नाही, चुकले मी. माझ्या आयुष्यातला, जगण्यालाच दोष देत होते. खरच श्री चे आभार कसे मानावे असे तिला वाटले.

संध्याकाळच्या जेवणाला आईला उल्काने मदत केली. छान जेवण झाले. श्री ला ते खूप खूप आवडले. बऱ्याच वर्षांनी असा भारतीय जेवणाचा अनुभव तो घेत होता.

रात्री १० पर्यंत सगळे गप्पा मारीत होते. मग आपापल्या बेडरुमध्ये झोपायला गेले. बेडरुम वेल फर्निश होते. छान, स्वच्छ उल्काच्या आईबाबानाही आवडली. उल्काला बरेच काही बोलायचे होते श्री सोबत, पण तो नेहमीच्या सवयीप्रमाणे दहा वाजता बेडरुममध्ये गेला. मग यू.एस. मध्ये फोन करून त्याने सगळे अपडेट्स घेतले. आणि तो झोपणार तेवढ्यात दरवाजावर टक टक असा

आवाज झाला. त्याने दार उघडले तर उल्का समोर उभी होती. आज ती खूपच फ्रेश आनंदी दिसत होती.

''श्री मला तुझ्याशी बोलायचे आहे.'' उल्का

''मग ये ना आत !''

''नको आपण बाहेर हॉलमध्येच बसू !''

''का ? तुला भिती वाटते माझी, या वयात ! घाबरू नकोस. ये आत ये.'' श्री.

आणि ती आत आली... त्याने तिला पलंगाच्या समोरच्या खुर्चीत बसायला सांगितले, तिने खुर्ची पुढे ओढली.. आणि बसली श्री मात्र पलंगावरच बसला होता.

''बोल!''

''श्री तू होतास म्हणून आज माझ्या आई–बाबांना मी पाहू शकले ! नाही तर काय झाले असते त्यांचे ? कोठे गेले असते ते ? पैसेही सोबत नव्हते ; खरेच तुझे आभार कसे मानावे कळत नाही...'' उल्का.

आणि तिला रडू कोसळले. नाना प्रकारे श्री तिला समजावीत होता... बऱ्याच वेळाने तिचे रडे थांबले आणि ती परत जायला निघाली.

''हे बघ ! मी काही कोणावर उपकार नाही केले. मी तुझ्यावर तेव्हाही प्रेम करीत होतो, आजही आणि पुढेही करीत राहीन. माझा राग ना तुझ्यावर ना तुझ्या आईबाबांवर. त्यांना मी आपले मानले. आता तुम्ही सगळे माझे आहात आपण एका कुटुंबातले आहोत. तुमच्या शिवाय येथे जीवाभावाचे कोणी नाही.'' श्री.

उल्का त्याचे बोलणे शांतपणे ऐकत होती.

''ठीक'' उल्का.

श्री आणि ती आपापल्या बेडरुमध्ये गेली.... जाताना तिने दरवाजा बंद केला.

सकाळी उल्काने, आईने छान नाश्ता केला. ब्रेड पकोडे केले होते. घरातलं वातावरण अगदी छान, घर भरल्यासारखे वाटत होते.

सकाळी उल्का व श्री बाजारात भाजी व इतर सामान आणायला जोडीने गेले, चालत चालत. आज दोघांचाही मूड चांगला होता... चालताना...

''उल्का ! मी पुढच्या आठवड्यात यु.एस.ला जायचे म्हणतो. गेले दोन महिने मी येथे आहे. आता पाऊस कमी झाला आहे... मात्र तू इथेच आई–

बाबांबरोबर रहायचे... मी दोन-तीन महिन्याने परत येईन. तिकडे थंडी खूप म्हणून येथील उबदार वातावरणात येऊन रहायचे म्हणतो.

''का जाता तुम्ही ! रहा की आमच्याबरोबर मी येथे रहावे असे तुम्हाला वाटते ना .... मग तुम्ही कां जाता !'' उल्का.

''अरे ! मी येणार ना, तिथे खूप कामे अडली आहेत. मी यू.एस. सरकारचा वकील म्हणून आहे तेव्हा जावे लागेल.'' श्री.

''पण दोन महिन्याने यायचे, नाहीतर मी निघून जाईन!'' उल्का.

''असे काही करू नकोस ! ते जसे तुझे आईबाबा आहेत तसे माझे ही ! मी असे करतो एक बँक अकाऊंट तुझ्यानी माझ्या नावावर खोलू या. मी पैसे पाठवित जाईन. तुम्ही मात्र येथेच रहाचे हं !'' श्री.

''ठिक'' उल्का. संध्याकाळी दोघे जोडीने मार्केटला गेले.

सगळ्या लागणाऱ्या गोष्टी घेऊन ती दोघे घरी आले. श्री ने सेक्रेटरीकडे संपूर्ण वर्षाचे फ्लॅटसचे चार्जेस भरले आणि इलेक्ट्रीसीटीचे बील भरण्याची व्यवस्था केली. शिवाय बी.एम.सी. ला प्रॉपर्टी चार्जेसही भरले. जेणे करून येथे रहाणाऱ्यांना जराही त्रास नको. त्याच दिवशी श्री ने विमानाचे तिकीटही बुक केले. सहा दिवस नंतरचे विमान होते. तो परत जाणार या काळजीने उल्काचे आई बाबा हवालदील झाले होते. हे एकदा गेले तर पर येतील ना ? याच विवंचनेत त्यांचे दिवस परत जात होते. श्री ने एक एन.आर.आय. जॉईन्ट अकांऊंट उघडले त्यात एक लाख रु. जमा केले.

एक गोष्ट मात्र घडली होती, ती म्हणजे श्री ला भारताच्या भूमीची ओढ लागली होती कारण त्याचे प्रेम. जिच्यावर आपण आयुष्यभर प्रेम करतोय तिचा सहवास हा उत्युच्च आनंद त्याला वाटत होता. दुसरी गोष्ट म्हणजे उल्काच्या आई-वडिलाना आपले आई वडील मानण्याने त्यांची शेवट पर्यंतची जबाबदारी एक नैतिक जबाबदारी म्हणून स्वीकारून, त्या प्रेमाचे 'उतराई' होण्याचे. तिचे प्रेम होते सोबत म्हणून श्री चे आयुष्य सुखात गेले होते. त्याने स्वत: प्रगती केली ती तिच्या प्रेमाच्या साथीने. ही भावनाच अर्थात उल्काच त्याची स्फूर्ती देवता झाली होती. त्या तिच्या प्रेमातून उतराई होण्याचे पुण्य त्याने स्वीकारले. श्रीचे जीवनही एकाकी होते., त्याची पत्नी १० वर्षापूर्वीच गेली, एक गोंडस मुलगा जन्माला देऊन. त्याला त्याने लहानाचा मोठा केला, बॅरिस्टर केला व तो आता त्याच्या सॉलिसीटर फर्म चा कारभार पहात होता. तशी त्याने निवृत्तीचा विचार

केला होताच पण अजून काही वर्षे तेथे काय करावे, पण उल्काच्या येथे येण्याने त्याचा विश्वास डळमळीत झाला होता.

शेवटी त्याचे यु.एस.ला प्रयाण झाले, पण त्याचे चित्त मागेच अडकले होते. तिच्या जीवनातल्या प्रवेशाने तो मोहरला होता. नवी पालवी फुटली होती प्रेमाला. जगण्यात आता खरी उभारी आली आहे असे क्षणाक्षणाला वाटत होते.

खरेतर भारतात येण्यापूर्वी उल्का आपल्याला भेटेल की नाही, तिची कौटुंबिक स्थिती कशी असेल, ती या जगात असेल की नाही असे अनेक प्रश्न त्याला सतावीत होते. पण आता या प्रश्नांची सोडवणूक झाली होती. आणि जहाज किनाऱ्याला लागले होते.

श्री अमेरिकेला गेला खरा. पण लवकरच परत आला. त्याचा एक पाय अमेरीकेत होता त दुसरा भारतात. आणि शिवाय मन ही उल्काच्या भोवती पिंगा घालीत होते. आपल्या जीवनाच्या जगण्याला आता खऱ्या अर्थाने चार चांद लागले होते आणि त्या दोघांनी शेवटच्या श्वासापर्यंत बरोबरीने जगण्याचा निर्णय घेतला होता. अगदी एकमेकासाठी.

श्री ने जीवनभर जपलेल्या उल्काच्या प्रेमाची आता स्वप्नपूर्ती झाली होतीच पण त्याच बरोबर तिच्या शोधासाठी आलेल्या उल्काच्या आई-वडिलांची भेट झाली आणि त्यांच्या प्रेमाचे उतराई होण्याचे भाग्य श्री ला लाभले. आणि त्याच्या उर्वरित आयुष्याचा जगण्याचा मार्ग आता सुसाट वेगाने पुढे निघाला होता, सहजीवनाची स्वप्ने पहात.

०-०-०



लेखक

## ॲड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक सदस्य आणि गेली तीस वर्षांहून अधिक काळ साहित्यिक चळवळीत हिरीरीने कार्यरत असलेले तसेच मराठा मंदिर साहित्य शाखेत सतत सक्रिय असलेले साहित्यिक यशवंत कदम यांनी मराठी साहित्यात कवितांबरोबरच कथांचीही मोलाची भर घातली आहे.

**'आडवळणाची वाट'** हा त्यांचा नवीन कथासंग्रह प्रकाशित होत आहे. या कथासंग्रहात **'आडवळणाची वाट'** ही दीर्घ कथा आणि **'माया आईची'**, **'भूक'**, **'पांडुरंग पावला'** आणि **'उतराई'** या चार लघुकथा असा साहित्य ऐवज सामावलेला आहे.

कुणाचेच आयुष्य सरळ नसते. प्रत्येकाच्या जीवनाची वाट वळणावळणाची, घडल्या – बिघडल्याची, सुख – दुःखाने भरलेली असते. ज्याला त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पण त्यावर मात करून माणूस यशस्वी होऊ शकतो हेच तर कथांचे बीज असते.

कथाकार यशवंत कदम यांनी त्यांच्या आजूबाजूला जे घडले – बिघडले, दिसले – जाणवले ते 'आडवळणाच्या वाटा' या कथांमधून टिपले आहे. त्याचप्रमाणे आजूबाजूला घडलेल्या घटना, संपर्कात आलेल्या व्यक्ती. माणसाची भूक त्याला कसे कोठे घेऊन जाते, एखाद्याचे कर्तव्य आणि त्यांनी गाठलेले यश, आईची माया आणि नर्सने केलेले सहकार्य. पांडुरंगाच्या मूर्तीच्या भक्तीचा परिणाम. असे त्यांच्या कथांचे विषय आपल्याला बरेच काही दृष्टांत देऊन जातात.

यशवंत कदम यांची भाषाशैली सरळ, सोपी असल्याने त्यांच्या कथा वाचताना कोणतेही कष्ट पडत नाहीत. तसेच त्यातील कथानक सहज लक्षात राहते. किंबहुना त्यातील पात्रेही आपल्या आजूबाजूचीच आहेत असे आपल्याला जाणवत राहते. या कथांमधील पात्रांचे संवाद आपल्या परिचयाचे वाटावे एवढ्या बेमालूम त्या कथा झाल्या आहेत.

या कथा मानसशास्त्र आणि लैंगिकशास्त्र समीक्षेच्या दृष्टीने पाहिल्यास त्यातून त्यातील पात्रांचे मनोविश्लेषण करताना पुरुष आणि स्त्री यांची मानसिक, लैंगिक आणि भावनात्मक गुंतागुंत कशी होते याची जाणीव आपल्याला होते. तसेच पात्रांची मैत्री, कर्तव्य, प्रेम आणि वासना यातील ताणतणाव दिसून येतात. कथांतील पात्रांच्या मनावर झालेले विविधांगी परिणाम. अतृप्त प्रेम, सफल प्रेम, जीवनातील संघर्ष, समस्या, कोकणामधील गावात आणि शहरात आल्यावर शहरात तत्कालीन परिस्थितीचे त्यांच्यावर झालेले नैसर्गिक आणि वातावरणीय परिणाम, गरिबी आणि हलाखीच्या परिस्थितीतून त्यांनी काढलेला मार्ग यांच्या सांगोपांग वर्णनातून तत्कालीन एकूण परिस्थितीची जाणीव होत राहते. काही श्रीमंत व्यक्तींच्या त्यागामुळे काही गरिबांचाही उद्धार होऊ शकतो याची जाणीवही यातून होते.

यशवंत कदम यांनी साध्या सोप्या शैलीत संवेदनशीलतेने आणि सूक्ष्मतेने टिपलेल्या या कथा आपले सहज लक्ष वेधून घेतात. एवढेच नव्हे; तर या कथा आपल्याला दृष्टांत देऊन जातात. म्हणून त्या वाचवायला हव्या. यानंतर अशाच अनेक सक्षम आणि उद्बोधक कथा कथाकार यशवंत कदम यांच्या हातून लिहिल्या जाव्यात याकरिता त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**शिवाजी गावडे**
लेखक, समीक्षक

कोमल प्रकाशन